शनिवार । २१ जून १९८० । ७५ पैसे

# माणूस

आता पाहताना खरंच वाटत नाही की आत्ता जिथे हिरवीगार वनश्री आहे तिथे पन्नासच वर्षांपूर्वी डबकी, डास आणि मलेरिया याशिवाय काहीही नव्हतं........

## गाझा ते गॅलिली

पृष्ठ....५

इंदुरीपासून दिल्लीपर्यंत 'गाढवाचं लग्न' लावत अथक फिरणारा हा सोंगाड्या. विजेसारखा रंगमंचावर वावरणारा. एवढी मोठी कारकीर्द, पण कलेच्या इतिहासात त्याला मानाचं पान कुठे आहे ?

पृष्ठ....२

## एक साहस कथा

पृष्ठ....१०

# सप्रेम नमस्कार

◻ 'गाझा ते गॅलिली' या लेखमालेतील पहिला लेख वाचला. त्यावरून पुढील निष्कर्ष निघतात–

१ : स्वसंरक्षणासाठी शत्रूचा बळकावलेला प्रदेश ताब्यात ठेवणे आवश्यक असेल तर तो सोडू नये. उदा० भारत आपल्यावर आक्रमण करेल या भीतीने पाकिस्तानने हल्ला करून दिल्लीवर ताबा मिळवला व आमच्या संरक्षणाखातर दिल्ली ताब्यात ठेवणे आवश्यक आहे असा दावा केला, तर तो सर्वांनी मान्य करावा.

२ : ज्यांना माघार घ्यायला पुरेसा प्रदेश नाही त्यानी आक्रमण करून शेजारचा प्रदेश ताब्यात घ्यावा

३ : युनोच्या ठरावानुसार स्वतंत्र राष्ट्र स्थापन करावे; पण आक्रमण मागे घेण्याच्या त्याच युनोचे सर्व ठराव कचऱ्याच्या टोपलीत टाकावेत.

४ : जे लोक हिंसेला वाहिलेले आहेत, त्यांचा प्रदेश खुशाल बळकावून ठेवावा, नव्हे आत्मसात करावा.

५ : कोणीही कोणाचाही वाळवंटी प्रदेश बळकवावा. मात्र तेथे नंदनवन फुलवावे म्हणजे झाले !

६ : एकाच प्रदेशातले व वंशाचे लोक केवळ भिन्न धर्माचे अनुयायी झाले म्हणून एकमेकांचा गळा घोटू लागले तरी त्याना शांततेचा उपदेश करू नये.

७ : 'यापुढे या देशात ज्यू धर्माचे राज्य चालेल. ज्यांना हे पटणार नसेल त्यांनी या देशातून चालते व्हावे !' असे धमकावल्यावर देश सोडणारे ते निर्वासित नव्हेत. त्याची जबाबदारी शेजारपाजारच्या दरिद्री राष्ट्रांनी घ्यावी. कारण ते त्याचे धर्मबंधू ! आणि आता तर ह्यांना मुबलक पैसा मिळतो आहे !

८ : 'सर्व जगातील कुठल्याही ज्यूने इस्राइलमध्ये यावे. त्याला येण्याचा खर्च, भरपूर द्रव्य, फुकट जमीन, घर, नागरीहक्क-सर्व दिले जाईल' असे जाहीर करून अमेरिकी ज्यूंच्या आणि सरकारच्या पैशाच्या जोरावर नाना सुष्ट–दुष्ट प्रकारांनी इस्राइलमध्ये बेकायदासुद्धा घुसवण्यात आलेल्या ज्यूंना बेघर निराश्रित म्हणावे !

९ : परकीय राज्यकर्त्यांनी आपल्या देशातून निघून जावे याकरता आततायी मार्ग पत्करणाऱ्या चाफेकरबंधू, खुदिराम बोस, भगतसिह इ. लोकाना क्रांतिकारक म्हणावे; पण शतकानुशतके इतर देशांत रहाणाऱ्या परक्या लोकानी आपला देश व्यापून आपल्याला हाकून लावले, ती आपली शतकानुशतकांची मातृभूमी परत मिळवण्याकरता आततायी मार्ग पत्करणाऱ्या अरबांना दहशतवादी म्हणावे.

१० : या लोकानी केलेल्या कृत्याचा बदला म्हणून इस्राइलने १०० वर हिंसाचार किंवा हत्या केल्या तरी त्याकडे दुर्लक्ष करावे. किंवा 'पुरुषार्थ', 'मर्दुमकी', 'पराक्रम' या शब्दात त्याचा गौरव करावा.

११ : या मातृभूमीच्या मुक्तीसाठी धडपडणाऱ्या लोकाचे भारत सरकारने स्वागत केल्यास, त्याची 'मुस्लिम अनुनय' म्हणून हेटाळणी करावी.

कळावे, चूकभूल द्यावी-घ्यावी.

७ जून ८०. डॉ. शरद अभ्यंकर, वाई

◻ श्री. विनय सहस्रबुद्धे यांची आसाम बाबतची लेखमाला फार चांगली होती. इतर प्रांतातील नागरिकाना अनेक गोष्टींची जाणीव झाली. सहस्रबुद्धे यांच्या लेखमालेत एक महत्त्वाची उणीव आहे. आसाममधील १० लाख चहा-कामगारांबद्दल या लेखात उल्लेखही नाही. ('साप्ताहिक दिनांक'च्या १ जून १९८० अंकातील 'आसाम लढ्याचे पांगळे पाय' हा लेख वाचावा.)

या कामगारांत एकही आसामी नाही. या कामगारांना ही चळवळ आपली वाटत नाही. आजचा हा कामगार अत्यंत पिळला जात आहे. आसामीयानी हे कामगार आसाममधलेच आहेत, परकीय नाहीत, त्यांच्या समस्या या आसामीयांच्याच आहेत, असा दृष्टिकोन पहिल्यापासून ठेवला असता तर आज चित्र फार निराळे दिसले असते. आज आसामी स्वयंसेवक तेल बाहेर जाऊ देत नाही; पण त्यांनी देशाला होणारा चहाचा पुरवठा थांबवलेला नाही.

आसाममधील चळवळीचे चित्र आज पालटत आहे. जातीय भावनांना खत घालून अल्पसंख्यांक व आसामी यांच्यात लढे होण्यास उत्तेजन दिले जात आहे. याचा शेवट काय होणार हे समजणे आज तरी कठीण आहे. चळवळीच्या नेत्यांचे चातुर्य पणाला लागण्याचा हा क्षण आहे.

१ जून ८० ह. य. बाकरे, जळगाव


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : तिसरा
२१ जून १९८०
किमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

# नव्या मुख्यमंत्र्यांची निवड

## एकत्वाचा देखावा

वा. दा. रानडे

नऊ राज्यांतील विधानसभा निवडणुकीनंतर तेथे नवे मुख्यमंत्री निवडण्यात येऊन त्याची मंत्रिमंडळे अधिकारावर आली आहेत. तामीळनाडूमध्ये मुख्यमंत्रिनिवडीचा प्रश्नच नव्हता. तेथील निवडणूक म्हणजे मुख्यमंत्री एम्. जी. रामचंद्रन याच्यावर विश्वासाचा कौल होता. त्याची आघाडी बहुमताने निवडून आल्याने ते मुख्यमंत्री होणार हे उघडच होते; पण त्याचा पक्ष पराभूत झाला असता तरीही पर्यायी मुख्यमंत्री आधीच ठरलेला होता. इंदिरा काँग्रेस द्रमुक आघाडीला बहुमत मिळाले तर करुणानिधी मुख्यमत्री होतील असे इंदिरा गांधीनी निवडणुकीपूर्वीच जाहीर केले होते.

येथे एक तात्त्विक मुद्दा उपस्थित होतो; भावी मुख्यमंत्र्यांची निवड ज्येष्ठ नेत्यानी आधीच ठरवून टाकणे व तसे जाहीर करणे कितपत योग्य ? पक्षनेत्याची म्हणजेच मुख्यमंत्र्याची निवड करण्याच्या बाबतीत विधिमंडळातील सत्तारूढ पक्षाला पूर्ण मोकळीक हवी. ज्येष्ठ नेत्यानी किंवा केंद्रीय नेतृत्वाने आपला कल दर्शविणे म्हणजे आमदारावर एक प्रकारे दडपण आणणेच होय. तसे करावयाचे नाही हा संकेत ज्येष्ठ राजकीय नेत्यांनी पाळायला हवा; पण इंदिरा गांधीपुढे मुख्य प्रश्न होता तो संकेतपालनापेक्षा तामिळनाडूत द्र. मु. क. शी केलेली आघाडी टिकविण्याचा. करुणानिधीना मुख्यमंत्रिपद देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नसते तर ही आघाडी मोडण्याचा धोका दिसत होता म्हणून त्यानी तसे जाहीर आश्वासन देऊन टाकले; पण कित्येकदा अशी निवड आधी जाहीर करणे अंगलट येते. जानेवारी १९८० मधील लोकसभा निवडणुकीचे मोहिमेत जगजीवनराम आमचे पंतप्रधान असे जनतानेत्यानी जाहीर केले होते. त्यामुळे हरिजनांची मते जनता पक्षाला मोठ्या प्रमाणात पडतील असा त्याचा अंदाज होता; पण हरिजन मते तर मिळाली नाहीतच उलट ज्यांना हरिजन पंतप्रधान नको होता अशा सवर्णांची मतेही विरुद्ध गेली. तामिळनाडू निवडणुकीत असेच घडले. भ्रष्टाचाराच्या आरोपाबद्दल सरकारिया कमिशनने ज्यांना दोषी ठरविले असे करुणानिधी तामीळनाडूच्या मतदारांना मुख्यमंत्रिपदी नको होते. ते पुनः मुख्यमंत्री होणार असतील तर आम्हाला इंदिरा काँग्रेस द्र. मु. क. आघाडीच नको असे त्यानी ठरविले व त्या आघाडीचा पराभव केला.

आठ राज्यांत नवे मुख्यमंत्री निवडताना इंदिरा काँग्रेसने काही चांगले पायंडे पाडण्याऐवजी अनिष्ट प्रथाच पाडल्या. बाह्यतः या साऱ्या मुख्यमंत्र्याची निवड एकमताने झाल्याचा देखावा करण्यात आला. विधिमंडळ सत्तारूढ पक्षाच्या सभा भरून त्याची निवड बिनविरोध झाल्याचे ठराव पास करण्यात आले. पण प्रत्यक्षात मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेला सुरुवात उमेदवारनिवडीपासूनच झालेली होती. आपल्या गटाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणावेत अशी मुख्यमंत्रिपदाच्या प्रत्येक इच्छुकाची धडपड होती. साधारणपणे मुख्यमंत्री कोणाला करावयाचे हे श्रीमती इंदिरा गांधीनी आधीच ठरविले होते; पण आपल्या मनाचा कल स्पष्ट दिसू द्यावयाचा नाही अशी दक्षता त्यांनी घेतली होती. महाराष्ट्रातील उमेदवार निवडीत मराठा समाजाला या वेळी कमी जागा देण्यात आल्या म्हणून वसंतदादा पाटील नाराज होते; पण हे इंदिरा गांधीनी विचारपूर्वक ठरविलेले धोरण होते. महाराष्ट्रातून यशवंतराव चव्हाणाच्या नेतृत्वाचा प्रभाव पूर्णपणे नष्ट करावयाचा असेल तर मराठा समाजाचे प्रभुत्व नष्ट केले पाहिजे असे ठरवून महाराष्ट्रातील उमेदवारांची निवड या वेळी करण्यात आली. महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री मराठा असणार नाही हे त्या वेळीच ठरले होते; पण आपला कल विशिष्ट नेत्याच्या बाजूने आहे हे दिसून देण्याची दक्षता घेण्यात आली. अंतुले आणि वसंतदादा या दोघांनाही तिकिटे देण्यात आली नाहीत ती याच उद्देशाने; पण हेच मुख्य स्पर्धक असल्याचे नंतर स्पष्ट झाले. आपल्यामागे बहुमत नाही आणि मुख्य म्हणजे इंदिरा गांधीचा कल आपल्या बाजूला नाही हे दिसून आल्यावर वसंतदादानी स्पर्धेतून माघार घेतली. त्याना केंद्रीय मंत्रिपद देऊ करण्यात आले; पण ते त्यांनी स्वीकारले नाही. इतर काही राज्यातल्या मुख्यमंत्रिपदाचे स्पर्धकानी ही तडजोड मान्य केली. बिहारमध्ये जगन्नाथ मिश्रा मुख्यमंत्री झाले तर त्याचे स्पर्धक केदार पाडे केंद्रीय मंत्रिमंडळात गेले.

वसंतदादांनी जो ठामपणा दाखविला तो त्यांच्या पत्नीने दाखविला नाही. सौ. शालिनीबाईंनी उपमुख्यमंत्रिपदाचा आग्रह धरला; पण या भूमिकेवर ठाम न राहता अखेर साधे मंत्रिपद स्वीकारण्यास त्या तयार झाल्या. उपमुख्यमंत्रिपद निर्माण करण्यास अंतुले याचा विरोध होता. मंत्रिमंडळाचा कारभार सहकार्याने चालवण्याच्या दृष्टीने याबाबतीत मुख्यमंत्र्याचे मतच निर्णायक मानायला हवे. त्यानी विरोध दर्शविल्यावर हा प्रश्न वास्तविक तेथेच निकालात काढायला हवा होता; पण शालिनीबाईंनी आग्रह धरला आणि त्याचा रोष नको म्हणून हा प्रश्न केंद्रीय संसदीय मंडळाकडे सोपविण्यात आला. मंडळाने महाराष्ट्रात उपमुख्यमंत्रिपद नको असा निर्णय दिला; पण याबाबतीत निश्चित सूत्र किंवा संकेत मात्र ठरविला नाही. उपमुख्यमंत्रिपद असावे की नाही हे मुख्यमंत्र्यानीच ठरवावे हा स्पष्ट पायंडा संसदीय मंडळाने घालून दिला; असता तर ते अधिक चांगले झाले असते. उपपंतप्रधानपद, उपमुख्यमंत्रिपद ही पदे म्हणजे वास्तविक सत्तास्पर्धेतील प्रतिस्पर्धी गटाचे समाधान करण्यासाठी निर्माण केलेल्या जागा असतात. १९६७ च्या निवडणुकीनंतर केन्द्रीय मंत्रि-

मंडळात मोरारजीभाईंना उपपंतप्रधानपद देण्यात आले होते. जनता सरकारच्या काळात तर जेवढे स्पर्धक तेवढी पदे निर्माण करण्यात आली. चरणसिंग आणि जगजीवन राम या दोघानाही उपपंतप्रधान करण्यात आले आणि हे लोण मग राज्यपातळीवर आले. उत्तर प्रदेशात दोन उपमुख्यमंत्रिपदे निर्माण करण्यात आली. इंदिरा काँग्रेसने राज्यात मंत्रिमंडळे बनविताना फक्त मध्यप्रदेशातच उपमुख्यमंत्रिपद निर्माण केलेले आहे.

मुख्यमंत्रिपदासाठी खासदारांनी उभे रहायचे नाही अशी प्रथा जनता पक्षाने पाडली होती. सर्वसाधारणपणे ही प्रथा योग्य म्हणता येईल; पण ती पाळली जाण्यासाठी एक दक्षता घ्यावयास हवी. विधानसभा आणि लोकसभेचे उमेदवार निवडताना दोन्हीकडे चांगल्या माणसांचा तोल योग्य प्रमाणात राखला जावयास हवा तसे घडले नाही म्हणजे मग खासदारांना राज्यपातळीवर आणण्याची,केंद्रीय मंत्र्यांना राज्यात पाठविण्याची वेळ येते. या वेळी तसे घडले आहे.

नेतानिवडीच्या बाबतीत विधिमंडळ सत्तारूढ पक्षाला काही स्वातंत्र्य राहिले नाही ही गोष्ट लोकशाही मनाला खटकते; पण इंदिरा काँग्रेस आमदारांना यात काही वावगे होत आहे, अयोग्य होत आहे, असे वाटत असल्याचे दिसत नाही. केन्द्रीय नेतृत्वाने लादलेला नेता आम्ही मानणार नाही, आम्हाला पाहिजे तो नवा आम्ही निवडू, तो आमचा हक्क आहे असा बाणा दाखविण्याचे धैर्यच विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षामध्ये राहिलेले नाही. गटबाजी, गटस्पर्धा एकमताच्या वरवरच्या देखाव्याने तात्पुरती झाकली गेली तरी काही काळाने ती डोके वर काढतेच. या वेळीही काही निराळे घडेल असे वाटत नाही.

□

# सोंगाड्याला सलाम !

दादू इंदुरीकर !

एक अभिजात सोंगाड्या !

स्वर्गात जायच्या कल्पनेनंही 'गाढवाचं लग्न 'मध्ये रडायला लागणारा आणि रडता रडता असंख्य रसिकांना खळखळून हसायला लावणारा हा सोंगाड्या आता पुन्हा दिसणार नाही. रडणार नाही. हसणार नाही ! तुम्हा–आम्हाला हसवणार नाही. दादूसारखा सोंगाड्या पुन्हा कधी होणार नाही !

दादू इंदुरीकर हरहुन्नरी होता. सोंगाड्यापासून राजापर्यंत आणि नाच्यापासून सेनापतीपर्यंत कुठलीही भूमिका करायला तो मागे सरला नाही. सगळीच 'सोंगं' त्याला सारखी असायची. कारण सोंग कुठलंही असलं तरी ते दादूनं वठवलेलं असायचं. त्याचा सोंगाड्या त्याच्याच खुमारीनं यायचा आणि त्याचा बादशहा त्याच्याच रुबाबानं साकार व्हायचा. याचा अर्थ दादूचा अभिनय साचेबंद किंवा एकसुरी होता, असा नव्हे. दादूच्या हसण्यासारखाच त्याचा अभिनय मोकळा होता, खळाळता होता; पण त्यात एक खास 'दादू' पण होतं. ते सर्वत्र असायच.

दादू कुठल्या 'अभिनय शिक्षणवर्गा'त वगैरे तयार झालेला नव्हता. तमाशाच्या फडातच त्याच्या अभिनयाची शाळा सामावलेली होती. 'काहीच करता येत नाही' म्हणून आम्ही कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात कसली तरी सोंगं घेत असतो. आपापल्या परीनं ती यशस्वी किंवा अयशस्वी झाल्याचे शिक्केही मोजमापानं मारत असतो. दादूच तसं नव्हतं. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी 'व्है. फा.' झालेला इंदुरीचा हा इंदुरीकर चांगला शाळामास्तर झाला होता; पण पोरांचं गोकुळ सोडून तो कृष्णाच्या गोकुळाकडे वळला आणि अखेरपर्यंत त्याच गोकुळात रमला! अनेक वादळं आली. त्यातून निभावत त्यानं आपलं गोकुळ जपून ठेवलं. आपल्यातला सोंगाड्या कधी हरवू दिला नाही !

सोंगाड्या म्हणूनच दादू तमाशाच्या बोर्डावर आले. मास्तरकी सोडून ते बाबुराव पुणेकराकडे शिष्य म्हणून दाखल झाले. तिथे जवळजवळ वीस वर्षं काम केल्यावर मुंबईला गेले आणि त्यानी स्वतःचा फड काढला.

'न्यू हनुमान थिएटर लालबाग' मध्ये त्याचे प्रयोग होत असत. तिथे आपल्या फडातर्फे दादूनी कै. पठ्ठे बापूरावकृत 'मिठ्ठाराणी' हा वग काढला. दादू पुढे 'वगसम्राट' म्हणून गाजले, पण या सम्राटाची दृष्टी 'मिठ्ठाराणी'च्या निवडीतही दिसून येते. त्या काळी 'मिठ्ठाराणी' चा प्रयोग कुणीही करत नसे. दादूनी तो केला. एवढंच नव्हे, तर गाजवलाही.

पठ्ठे बापूरावाचे शिष्य श्री. बापूसाहेब जिंतीकर यांच्याकडे असलेली या वगाची एक मोठी मनोरंजक जाहिरात 'आर्यभूषण थिएटर' मधले श्री. रामभाऊ देशपांडे यांनी मला काल–परवा दाखवली. सुरुवार फेटा घालून कमरेवर हात ठेवून दादू मोठ्या तोऱ्यात उभे असलेलं इतर दोघाबरोबरच 'मिठ्ठाराणी' तलं एक दृश्य त्यात मध्यभागी छापलेलं आहे. १९५७ मधलं हे हँडबिल आहे. २५ डिसेंबर १९५७ रोजी पठ्ठे बापूरावाच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त हा प्रयोग झाला होता. श्रीमती दुर्गाबाई भागवत तेव्हा महाराष्ट्र तमाशा परिषदेच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रयोग झाला होता. हँडबिलात म्हटलं आहे–

**"कै. शीघ्रकवी पठ्ठे बापूराव कुलकर्णी रेटरेकर यांच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त !**

न्यू हनुमान थिएटर, लालबाग

बुधवार ता. २५–१२–५७ रोजी रात्रौ

महाराष्ट्र तमाशा परिषदेच्या अध्यक्ष माननीय श्रीमती दुर्गा भागवत यांच्या अध्यक्षतेखाली

सुप्रसिद्ध दादू मारुती इंदुरीकर सह शंकरराव शिवणेकर.... "

आणि पुढे या वगातल्या पात्रांचा परिचय दिला आहे. दिग्दर्शनापासून संगीतापर्यन्त सर्वांचा त्यात उल्लेख आहे. 'विनोदमूर्ती दादोबा इंदुरीकर' या वगात 'पंचवीस' ची भूमिका करीत असत.

या सगळ्याच्या शेवटी आवर्जून एक नोद केलेली आहे, " या खेळाला थोर थोर साहित्यिक तसेच सिनेमाक्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती त्याचप्रमाणे कै. पठ्ठे बापूराव याचे शिष्य श्री. बापूराव जितीकर पुण्याहून येणार आहेत. तरी आमचे आश्रयदाते असली अनमोल संधी दवडणार नाहीत अशी आशा आहे.'

'मिठूराणी' या अक्षरांच्या दोन्ही बाजूना 'प्रभात' ची तुतारी आहे.

'मिठूराणी' वग चांगला चालला; पण 'दादू इंदुरीकर' हे नाव सर्वतोमुखी झालं ते 'गाढवाचं लग्न' मुळे ! 'गाढवाचं लग्न' नं त्यांना अमाप कीर्ती-प्रसिद्धी दिली. पैसा दिला. मानमरातब दिला. कऱ्हाडजवळ एका दौऱ्यात स्वत.चा फड जळल्यावर कर्जबाजारी झालेल्या दादूनी लालबाग थिएटरचे मालक मधूशेठ नेराळे याच्याकडे नोकरी पत्करली आणि तेव्हाच हा वग सुरू केला. तो गाजला आणि बघता बघता त्याचे हजारावर प्रयोग होऊन गेले. सरकारनं पद्मश्री देऊन गौरव केला. मराठी संगीत नाटक अकादमीनं सन्मान केला; पण या सन्मानानी दादू अंतराळी चालायला लागले नाहीत. त्याचे पाय जमिनीवरच राहिले. अलिकडे त्यांनी मधू कडूबरोबर पुन्हा एकदा स्वत.चा फड सुरू केला होता. आपल्याला प्रसिद्धी–कीर्ती मिळाली म्हणून तमाशा त्यांनी सोडला नाही किंवा चित्रपटासारख्या जास्त पैसा देणाऱ्या माध्यमाकडे ते वळले नाहीत. फड हाच त्यांचा जीव होता.

दादूबद्दल या सगळ्या ऐकीव गोष्टी. राजाभाऊ थिटेंसारख्या तमाशा परिषदेच्या जुन्या–जाणत्या मंडळीकडून, रसिकांकडून ऐकायला मिळालेल्या; पण दादूच्या हजरजबाबीपणाचा एक इरसाल मासला मी स्वत: अनुभवला. काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. इचलकरंजीच्या पंचगंगा साखरकारखान्यावर गणेशोत्सवात 'गाढवाचं लग्न' होतं. जत्रेपासून गणेशोत्सवापर्यंत आणि निपाणीपासून सदाशिव पेठेपर्यंत 'गाढवाचं लग्न' गाजलेलं. उत्सुकता होतीच. दोन-तीन मैल पायपीट करून मी काही मित्रांबरोबर गेलो. गणेशोत्सवातला मोफत प्रयोग असल्यामुळे गर्दी जास्तच होती. नऊ–दहा हजारांचा समुदाय असावा ! वग सुरू झाला. रंगत गेला. समोरच्या श्रोत्यांतूनही प्रतिसाद यायला लागले. रात्रीची वेळ होती. दादू बायकोला झोपायला सागतो आणि म्हणतो, 'आता 'जवळ–जवळ' झोपायची वेळ झालीच.' बायको झोपते आणि दादू शेजारी तंबाखू मळत बसतो, असा प्रसंग होता. दादू तंबाखू मळत बसल्याबरोबर समोरून जोरात आवाज आला, 'आयला, कर मजा आता !' श्रोत्यात खसखस पिकली आणि दादू मात्र शातपणान तंबाखू मळत समोर बघत बसला. क्षणभरच आणि, तंबाखू तोंडात टाकत टाळी वाजवत समोर बघत उद्गारला, 'काय मंडळी, या कुणाचा उपास असला तर सोडायला !' हास्याची लाट उसळली आणि नंतर पुन्हा समोरून शेरेबाजी झाली नाही !

हे दादूचं एक प्रमुख वैशिष्टच होतं. रूढार्थानं कुठलंही असामान्यत्व नसलेला हा माणूस अशा अनेक वैशिष्टयामुळंच जनमानसात ठसला होता. रंगभूमीवरचा त्याचा विजेसारखा चपळ सोंगाड्या बघणं हा एक अवर्णनीय आनंद होता. दत्तोबा तांब्यांपासून छोटेखानपर्यंत अनेकाचे लोकनाटच–तमाशे मी पाहिले आहेत; पण असा बेरकी, बुद्धिमान आणि तथाकथित उच्चभ्रूंच्या मनातल्या चावटपणाला खुलवून वाट देणारा दादूंसारखा दुसरा सोंगाड्या मला दिसला नाही आणि आता दादूंचा सोंगाड्याही दिसणार नाही !

राहून राहून वाटतं, अशा गावरान कलावंताची कला तमाशाच्या तंबूबरोबरच गावोगावी जाते; पण तिला कायमचं स्थान लाभत नाही. नामवंताच्या मालिकेत दादूसारख्यांची कला अजूनही खऱ्या अर्थानं बसवली जात नाही. नुसत्या पदकाच्या आणि सरकारी किताबांच्या मान्यतेनं काय साधणार? त्यांच्या कलेचा गंभीर विचार व्हायला हवा, त्याची इतिहासात्मक नोद व्हायला हवी आणि कलाकाराच्या कार्यकर्तृत्वाच्या स्मृतीचंही जतन या कलेबरोबरच व्हायला हवं ! उद्योगपतीची आत्मचरित्रं होण्यासाठी आम्ही धडपडतो, ते ठीकही आहे; पण दादूंसारख्यांची आत्मचरित्रं आयुष्याचं केवढं वेगळं दर्शन घडवतील ! त्याच्यासाठी मात्र आम्ही काहीच करत नाही. एखाद्या मुलाखतीतच त्याची सारी सोंगं आम्ही संपवून टाकतो !

दादूच्या निधनानं एक अस्वस्थ जाणीव जागी केली. तेवढं सामर्थ्य त्याच्या सोंगाड्यात होतं. त्याला माझा सलाम !

–विजय कुवळेकर

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार..



कुशल लेखक, कुशल कुंभाराने मातीला
आकार द्यावा तसा शब्दांना आकार देतो.
त्यांना प्रवाही बनवतो.
कुशल लेखकाप्रमाणे चतुर माणूस आपल्या
आयुष्याला नव्हे तर आपल्या मुलाबाळांच्या
आयुष्यालाही आकार देतो.....
त्यासाठी पैशाची बचत हवी, योग्य
गुंतवणूक हवी, पैशाची वाढ हवी.....
आमच्या सगळ्याच योजना यासाठी
आदर्श आहेत.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कार्यालय: लोकमंगल, पुणे ४११००५.

बँकिंग सेवा

व्यक्तिगत जिव्हाळा

पद्मजा

# गाझा ते गॅलिली

## लेखांक तिसरा । राजू पटवर्धन

## " माझ्या निष्ठावान अनुयायांनो ! खूप वर्षांपूर्वीच आपण ठरवलंय.... "

इस्राइलमधल्या प्रशिक्षणाचा पहिला आठवडा होता. गाईंचं वंशशास्त्र खाद्य, उत्पादनक्षमता इत्यादीचा काथ्याकूट संपून एकदाची शुक्रवार संध्याकाळ झाली होती. काय की असो, पण रोज शेकडो एकत्र जेवतात, ते 'रूपिन इन्स्टिटयूट' चं भोजनगृह आज एकदम काही तरी लोभस वाटलं. टेबलावर परीटघडीच्या पांढऱ्याशुभ्र चादरी, मध्ये मेणबत्त्या आणि चादरीच्या शुभ्रतेला आपल्या गहिऱ्या रंगानं जणु पुसून टाकणारी मोठी वाइनची बाटली आणि कधी तुटून पडतो असे ( पाश्चिमात्यांच्या मानाने ) चविष्ट पदार्थ– वा ! दृश्य कसं 'इन्व्हायटिंग' होतं; 'पण हे आजच असं का ?' हा प्रश्न प्रत्येकाला पडला होता– 'रोज का नाही ?' एवढ्यात आमच्या प्रशिक्षण-सत्राच्या सांस्कृतिक विभागाच्या सौ. सँड्रा कॅमिन्स्की सर्वांना उद्देशून उद्गारल्या, 'शाबास शालोम !'

शुक्रवार संध्याकाळपासून ज्यूंची 'शाबाथ' ( विश्राती ) सुरू होते ती शनिवार संध्याकाळपर्यंत टिकते इस्राइलमध्ये परिश्रम करण्याची लोकांना इतकी सवय झाली आहे की, 'शाबाथ' ही धर्माधिष्ठित विश्राती पाळण्यासाठी प्रचंड कष्ट घेतले जातात! पहिल्यादा मला इस्राइलीच्या कठोर धर्मपालनाबद्दल एवढी माहिती नसल्यामुळे शनिवार ही साप्ताहिक सुट्टी एवढाच अर्थ घेऊन मी त्यासंबंधी विसरूनही गेलो होतो.

नाखुमशी खूप मैत्री झाली, दिलखुलास गप्पा झाल्या. त्याच्या घरी यायचं त्यानं आग्रहाचं निमंत्रण दिलं. पुढं आम्ही गोलान हाइट्समध्ये जाणार होतोच, त्यामुळे 'अगदी नक्की येऊ हं' असं त्याला मी आणि माझ्याबरोबर अभ्याससत्रासाठी आलेल्या डॉ मोडकांनी आश्वासन दिलं. पुढं आमचा दौऱ्याचा कार्यक्रम जाहीर झाला, तेव्हा लक्षात आलं की, नाखुमच्या किबूट्झमध्ये आम्ही शनिवारी जाऊ शकत होतो. खूप बरं वाटलं, कारण शनिवार म्हणजे 'शाबाथ' आणि नाखुम नक्कीच घरी भेटणार ! मीपण हे जेव्हा नाखुमला सांगितलं तेव्हा त्यानं असा हताश चेहरा केला की बोलायची सोय नाही. 'अरेरे ! अगदी शनवारच गाठलात ना तुम्ही लोकांनी माझ्याकडे यायला ! अगदी गोचीच झाली; कसं जमणार हे ?' अशा अर्थाच तो आम्हाला बोलला. पुढे आम्हाला समजलं की, त्याचं किबूट्झ हे कडवं धार्मिक आहे, त्यामुळं 'शाबाथ' दिवशी कोणी पाहुण्यानी तिथे गेलेलं त्याना चालत नाही तसा हा विनोदच वाटावा, कारण किबूट्झ् म्हणजे समाजवादाचं अंतिम टोक म्हटलं जातं; तर कट्टर धार्मिक किबूट्झ् असणं हे कुणाला विषम युगुल वाटेल, पण इस्राइलमध्ये अशी कट्टर धार्मिक किबूट्झ् बरीच आहेत. ज्यू धर्माच्या कडवेपणाची ही एक झलक जरी मिळाली, तरी त्याचं पूर्ण स्वरूप अजून कळायचंच होतं.

खूप दिवसांनी आम्हाला शनिवारची एक पूर्ण सुट्टी मिळाली– कुठेही पर्यटन नाही, कुठलाही शैक्षणिक तास नाही, काही नाही. मग आमच्या सगळ्याच्याच डोक्यात आलं की, दुपारी जरा हिंडायला जाऊ या. आमच्या इन्स्टिटयूटजवळचं मोठं शहर म्हणजे 'नेतानिया.' फक्त ६ च मैल दूर होतं, पण बसला पडायचे १२ पौंड ( जवळजवळ तीन रुपये ! ) त्यामुळं खूप दिवसांनी आम्ही एकदा नेतानियाला जायचो. अगदी उत्साहानं त्या शनिवारी बाहेर पडलो, पण बघतो तर बस बंद ! मला वाटलं, संप वगैरे असेल; पण नंतर लक्षात आलं की, 'शाबाथ' म्हणून दर शनिवारी बस–सेवा बंद असते ! आहे की नाही ? यामध्ये मला आधुनिक काळाला जुळून घेणारा एक भाग दिसला, तो म्हणजे बस–वाहतूक बंद ठेवल्यामुळं होणारी इंधनाची बचत! आपल्या एस्. टी. महामंडळाला ही कल्पना सुचवायला हरकत नाही.

पुढे जेरुसलेमला गेलो, तेव्हा शनिवारी उठून बघतो, तर वाटलं की, आज शहरात कर्फ्यूच आहे ! सगळं चिडीचूप– माणसं नाहीत, मोटारी नाहीत, बसेस नाहीत. मी श्री. सिडनी रूबेन या मूळच्या पुणेकर, परंतु आता बेने इस्राइली म्हणून इस्राइलमध्ये स्थानिक झालेल्या अत्यंत अगत्यशील गृहस्थाकडे पाहुणा म्हणून गेलो होतो. ते मात्र मला मोटारीतून शनिवार असूनही हिंडायला घेऊन गेले होते. त्यांनी मला कडवा ज्यूधर्म म्हणजे काय आणि ते आचरणारे कडवे ज्यू हा काय प्रकार आहे हे प्रत्यक्ष दाखवून दिल.

हे कडवे ज्यू इस्राइलमध्ये एकूण लोकसंख्येच्या दोन टक्केसुद्धा नाहीत. मात्र त्याचा पगडा धार्मिक कायदेकानून आणि विशेषतः जेरुसलेममध्ये फार दिसतो. आम्ही हिंडत होतो, तर ठिकठिकाणी रस्त्यात युद्धात शत्रूचं सैन्य अडवायला वापरतात, तसले अडथळे उभे केलेले ! सिडनीसाहेबानी मग सांगितलं की, हा कट्टर ज्यू राहतात तो भाग. शबाथमध्ये सगळ्यानी विश्राती घेतलीच पाहिजे हा त्यांचा खाक्या. उगीच कोणी 'पाखंडी' आपल्या वस्तीत गाडी घेऊन येऊ नये म्हणून हे अडथळे होते. आणखी म्हणजे जर कोणी असलं साहस केलंच, तर हे लोक त्याच्या गाडीवर दगडसुद्धा फेकून मारायला

कमी करणार नाहीत.

गोरा रंग, काळी टोपी, लांब काळा कोट, शेंडीवजा मागे लोंबते केस, गालांवर ( अगदी तीन वर्षांच्या मुलाच्या सुद्धा ) लांब कल्ले अशा खास वर्णनाचे हे कट्टर ज्यूलोक म्हणजे जेरुसलेमचा प्रेक्षणीय भागच आहेत. ज्यू धर्मगुरु ( 'रॅबाय' ) हे याच्यातलेच असतात. त्यामुळे अल्पसंख्य असूनही त्याच्या म्हणण्याला डावलून चालत नाही. कट्टर मुस्लिम–विरोध, संतति–नियमनाला विरोध, सक्तीच्या लष्कर-भरतीला विरोध ( इस्राइलमध्ये फारसं हे बोललं जात नाही, पण खास धार्मिक कारणांवरून या कट्टर ज्यूना सक्तीच्या लष्करभरतीतून माफी मिळते. ) इत्यादी प्रतिगामी धोरणांचे हे लोक पुरस्कर्ते आहेत. सुदैवाने ते इस्राइलमध्ये अल्पसंख्य आहेत, त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या आड ते येऊ शकलेले नाहीत. आता 'पुरोगामित्वाच्या दिशेचं 'मोठं' पाऊल म्हणून त्यानी बहुपत्नित्व बेकायदा ठरवलं आहे ! या लोकांची धार्मिक श्रद्धा ( जी भारतीयांनी दाखवली की 'अंधश्रद्धा' होते. ) मात्र अगाध आहे. जेरुसलेमला सुप्रसिद्ध अशी 'रडणारी भिंत' आहे (वेलिंग वॉल् ). हिचं असं नाव पडण्याचं कारण असं की, शतकानुशतकं जगभरच्या ज्यूंचे टाहो ( 'आम्हाला जेरुसलेमला जायचंय्') ती ऐकून आहे आणि तिलाच अश्रू आवरत नाहीत. तर या ज्यूंची श्रद्धा अशी की, या भिंतीत लिहून ठेवलेल्या चिठ्ठयावरचे संदेश ताबडतोब देवाला पोहचतात. या भिंतीपाशी हे सनातनी ज्यू लोक तासन्तास आपल्या धार्मिक ग्रंथाचं वेदासारखं 'पठण' करीत बसतात. पठण झाल्यावर त्यांच्या चिठ्ठया भिंतीच्या दरवाज्यामधून ठेवून देतात.

मुलांच्या सुंतेची पद्धती, बहुपत्नित्वाला मान्यता (ही जुन्या परंपरेत होती ). मूर्तिपूजा अमान्य. एकच देव मानणारे ही सर्व परंपरागत ( ज्यूधर्माची तत्त्वं मुस्लिम धर्माप्रमाणेच किंवा ख्रिश्चन धर्माप्रमाणेच काहीशी वाटतील. (अर्थात् बळाच्या जोरावर धर्माचा प्रचार आणि विस्तार हे तत्त्व मात्र ज्यूधर्मात नाही. ) ज्यूधर्म आणि ख्रिश्चन किंवा मुस्लिम धर्म यांच्यात मूलभूत असा एकच फरक आहे, तो म्हणजे प्रेषिताबद्दल, गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, प्रेषिताची ( ज्याला 'मसाया' म्हटले जाते) कल्पना तिन्ही धर्मांत आहेच. फक्त प्रेषित येऊन गेला की अजून यायचा आहे हे मानण्यापुरताच फरक आहे. ख्रिश्चन लोक असे मानतात की, येशू ख्रिस्त हाच तो प्रेषित, तर मुसलमान धर्मीय मानतात की मुहंमद पैगंबर हाच तो प्रेषित ! ज्यू लोक मानतात की देवाचा प्रेषित अजून यायचाच आहे-आतापर्यन्त जे प्रेषित म्हणवून घेणारे झाले ते जणू तोतयेच होते. इतकाच वैचारिक फरक; पण त्यामुळे आज केवढा कलह दिसतो ! याचे कारण की ज्यू, ख्रिचन आणि मुसलमान हे नेहमीच एकमेकांचे राजकीय शत्रू राहिले. त्यामुळे आपले वेगळेपण दाखवण्याची स्पर्धा लागली.

अल्पसंख्य सनातनी ज्यू लोक आपल्या धर्माचे पालन कसंही करोत किंवा त्यांच्या धर्माची तत्त्वं काहीही असोत, पण आज इस्राइल राष्ट्रामध्ये जो ज्वलंत राष्ट्राभिमान दिसतो व अस्मिता दिसते, तिचे कारण सर्वसाधारण 'ज्यू' या शब्दाचा राजकीय व सामाजिक पूर्वपीठिकेतून निर्माण झालेला अर्थ हे एकच आहे. एखादा इस्राइली नागरिक निरीश्वरवादी असला तरी त्याला 'मी ज्यू आहे' हे म्हणताना अभिमानच वाटेल. आपल्याकडे तथाकथित 'दुहेरी' सदस्यत्वाच्या वादावरून जनता पक्ष फुटला; संघाचे सदस्य म्हणजे हिंदुत्वनिष्ठ प्रतिगामीच असे म्हणण्याची फॅशन आपल्याकडे समाजवादी व पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या नेत्यांमध्ये आहेच; या पार्श्वभूमीवर इस्राइलने 'ज्यू' या शब्दातून प्रतिध्वनित होणाऱ्या अर्थातून केवढी किमया केली आणि मानवाच्या अविरत प्रयत्नातून कसे नंदनवन उभे केले आहे हे मार्गदर्शक ठरेल. आपल्याकडे 'हिंदू' हा शब्द आहे, तसाच 'ज्यू' हा शब्द आहे म्हटले तर तो व्यापक अर्थ दाखवतो, म्हटले तर सकुचित म्हटले तर अस्मितादर्शक , म्हटले तर पूर्वग्रहदर्शक, म्हटले तर सामाजिक, सांस्कृतिक, म्हटले तर आध्यात्मिक, धार्मिक, म्हटले तर वैचारिक, म्हटले तर राजकीय. 'हिंदू शब्दाची मात्र आपल्या बहुसंख्य पुढाऱ्यांना अडचण वाटते. (कारण 'पुरोगामित्वाला बाधा येते ना ! ) तशी 'ज्यू' शब्दाची इस्राइलींना वाटत नाही. राजकीयप्रणाली एखाद्याची कट्टर साम्यवादी असेल, पण त्याला 'ज्यू' शब्दाची अडचण वाटत नाही!

श्री. मोशे हे एक ७४ वर्षाचे मिस्किल, हसरे पण कट्टर समाजवादी असे गृहस्थ आम्हाला भेटले. त्यांना टक्कल होते हे सांगण्याची जरुरी नाहीच. कारण इस्राइलच्या हवेत किंवा पाण्यात बिनटकलाचे लोक दुर्मिळच आहेत ! आपल्या चष्म्याच्या कार्डाशी चाळा करीत मोशेसाहेब आपल्या किबूट्झमधल्या गाई आम्हाला दाखवीत होते. कपडे इतके मळके होते की, आपल्याकडे असते, तर 'तुमचा हा म्हातारा 'गडी' बरा दिसतोय् बर का ! अशिक्षित असू दे, पण चलाख आहे–सोडू नका ! ' इतपत प्रशस्तिपत्रके पाहुण्याकडून घेतले असते असे वाटणारे. मग कळले की हे गृहस्थ 'रॅडिकल' किबूटझ्वादी होते. वयोमानाप्रमाणे शेतकीतंत्रविस्तारसेवक, जलसिंचनतंत्रज्ञ, जमीन-शास्त्रज्ञ, हवामान–संशोधक इत्यादी अनेकविध कामे त्यांनी केली होती. आता सत्तरीनंतर भटकणे जमत नाही, म्हणून गाईंची रेकॉर्डस ठेवण्याचं लेखनिकाचं काम ते करीत होते. किबूट्झ्मधील मुलांना वेगळया वसतिगृहात वाढवणे,त्याचे वैचारिक मनोच्छेदन करणे (Indoctrination) लग्नसंस्था ही फोल कल्पना आहे असे मानणे वगैरे अगदी दुर्मिळ पण जहाल मत असलेले हे समाजवादी, आग्रही निरीश्वरवादी आणि साम्यवादी होते; तरी 'ज्यू' असण्याबद्दल अभिमानी होते. 'ज्यू' शब्दाचे असे लोकांना उद्युक्त (Motivate) करण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे. त्यामुळे भाषा, धार्मिक मत, राजकीय प्रवाह, जमातींचे पूर्वग्रह, आर्थिक मतप्रणाली इत्यादी अडसर दूर होऊन राष्ट्रजागृती आणि अस्मिताजागृती ही दोन्ही उद्दिष्टे साध्य झाली आहेत.

'ज्यू' शब्दाचे हे सामर्थ्य इस्राइलने उभे केले आहे ते त्या शब्दाला एक विशिष्ट कायदेशीर, धार्मिक आणि राजकीय असा एकत्रित अर्थ देऊनच. या अर्थाचे मूळ तत्त्व हे आहे की, इस्राइलमधेच काय, पण जगभर कोणत्याही देशात 'ज्यू' कुटुंबात मूल जन्माला आले, की ते 'ज्यू' आहे, म्हणूनच आपोआप इस्राइलचे नागरिक होते. भारतातले 'बेने इस्राइली' तिकडे जाऊ शकले, कारण इस्राइल राष्ट्र जन्माला आल्यावर आपोआपच ते इस्राइलचे नागरिक झाले. आपखुषीने जरी असे जगभरचे ज्यू नागरिक इतर देशाचे नागरिक म्हणून राहिले (उदा. आज सर्वाधिक ज्यू ६० लाख अमेरिकेत आहेत) तरी त्यांच्या मनात 'आपण इस्राइलचे-

ही नागरिक आहोत बर का' अशी भावना आपोआपच निर्माण होते. त्यामुळे ते प्रत्यक्ष गेले जरी नाहीत, तरी इस्राइलला प्रतिवर्षी वर्गणी पाठवतात. 'केरेन हायसोड' 'युनायटेड इस्राइल अपील,' 'वर्ल्ड ज्यूइश फंड' अशा शेकडो संघटना जगभर वर्गणी गोळा करून इस्राइलला पैसा पाठवतात!

अशा संघटनानी उभारलेल्या प्रचंड निधीमधून इस्राइलमध्ये आपण सर्वसाधारणपणे 'नदनवन' असा शब्दप्रयोग करू, अशा तऱ्हेची भौगोलिक रचना निर्माण करण्याचे प्रकल्प हाती घेतले गेले आहेत. उदाहरणार्थ, एक संघटना फक्त नवी झाडे लावण्यासाठी आणि त्याचे जतन करण्यासाठीच पैसे गोळा करते. यामधील सगळ्यात सस्मरणीय असे स्मारक, हिटलरच्या पाशवी हत्याकांडात मृत्युमुखी पडलेल्या ६० लक्ष ज्यूसाठी उभारलेले 'स्क्रॉल ऑफ फायर' हे होय. एका मोठ्या टेकडीवर या नावाचे प्रचंड (जवळजवळ तीस फूट उंचीच्या दगडातून कोरलेले) शिल्प उभे आहे. या शिल्पासभोवती ६० लक्ष ज्यूसाठी ६० झाडे लावली आहेत. आश्चर्य म्हणजे ही सगळी जिवंत आहेत! तसेच दक्षिणेच्या नेगेव्ह वाळवंटामध्ये जो काय ४–५ इंच पाऊस पडतो, तो साठवण्यासाठी कृत्रिम तळी निर्माण करून त्यात २०–२५ झाडाची छोटी छोटी अरण्ये निर्माण केली आहेत. (यामध्ये एक गर्भित हेतू हा आहे की सैन्याच्या हालचाली इजिप्तपासून लपवून ठवायला वाळवटात काही आडोसा निर्माण करणे).

हे झाडाचे प्रेम कुठल्या पातळीवर गेले आहे ते बघणे मनोरंजक होईल. इस्राइली कायद्याप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक झाडाला किंवा फुलझाडाला हात लावायला सक्त मनाई आहे. आमच्या वर्गाचो गालिलापाशी सफर चालू असताना एकदा उगीच वेळ घालवायला बस थांबली होती. लागलीच आमच्यापैकी काहीनी जवळ पिवळी–तांबडी फुले दिसली. ती झाडावरून तोडून आणली आणि 'प्रेमपूर्वक' बरोबरच्या युवतीना भेट म्हणून दिली. झालं! आमच्या डायरेक्टरानी हे पाहिलं मात्र आणि क्षणभर का होईना, पण जणू फुल तोडली म्हणजे त्यानी कुणाचा खूनच केला अशा संशयी नजरने पाहिले. अर्थात स्वतःला सावरून लागलीच हसून म्हणाले, 'एवढे पुन्हा लक्षात ठेवा. आमचे सरकार निसर्गाबद्दल फार जागरूक आहे. तुर्की अमदानीत फुलं, झाडं, जमीन–सगळ्याचा इतका विध्वंस झाला की, १९४८ नतर सगळ्यानी चंग बांधला की, निसर्गाची हत्या बंद झालीच पाहिजे! मग हे कायदे झाले.'

इस्राइलमध्ये येणाऱ्या परदेशी प्रवाश्यासाठी 'तुमच्या हाताने झाड लावा' हा कार्यक्रम मुद्दाम आखलेला असतो. आजच्या २० जणाच्या वर्गासाठी 'शेफायाम' नावाच्या वस्तीत प्रत्येकाच्या देशाच्या नावाने एकेक झाड लावण्याचा कार्यक्रम झाला. 'Fraternity Forest' (बंधुत्व–वन) असे नामकरण झाले. हीच फॅशन उचलून आम्हा वीस जणानी आमचे डायरेक्टर आणि रूपिन इन्स्टिट्यूट याना प्रत्यकी एक झाड भेट दिले.

तुर्की साम्राज्य असताना कैरोपासून तुर्कस्तानपर्यंत एक रेल्वे चालू होता. हा रेल्वे चालूपेक्षा बंदच जास्त असायची. कारण भोवतीची वाळवटाची रेती सारखी रुळावर यायची आणि मार्ग झाकून टाकायची. पुढ इस्राइलला हाच प्रश्न नवे रस्ते बांधल्यावर भेडसावू लागला. विशेषतः समुद्रकिनाऱ्यालगत ही डोकेदुखी फार होती. मग यातून मार्ग असा काढला की, या वाळूत येतील अशी कमी पाण्यावर उगवणारी झुडपे तिथे लावण्यात आली. आता पाहिले तर असे दिसते की, रेती क्वचित्‌च दिसते, एवढी ही झुडपे पसरली आहेत. त्यामुळे रेती अडकून बसली आहे. यामुळे आणखी एक फायदा असा झाला की निसर्गालाच एक शिस्त लागली. पूर्वी नुसतीच रेती उडत होती असे नव्हे, तर या अस्ताव्यस्त रेतीत आणि साचलेल्या पाण्यात डास आणि मलेरिया याचे साम्राज्य होते, आता रेती घट्ट बसली, सतत प्रयत्नाने डबकी सपाट केली गेली. आपोआपच मलेरिया नाहीसा झाला. आता पाहताना खरेच वाटत नाही की, आत्ता जिथे हिरवीगार वनश्री आहे तिथे पन्नास वर्षांपूर्वी डबकी, डास आणि मलेरिया याशिवाय काहीच नव्हते!

## एकही गोचिड नाही

अर्थात ही शिस्त लागताना सर्वच काही सुरळीत पार पडले असे नव्हे. टक्केटोणपे, गटंगळ्या, ठेचकाळणे–सव झाले. १९०० च्या सुमाराला जे 'पहिले' वसाहतवाले होते ते सगळे स्वप्नाळू होते. 'प्रयत्न केले की यश आपलेच' असा भोळा भाव होता. हे लोक युरोपतला सर्वांत धनवान कारखानदार रॉथचाइल्ड् याच्याकडे गले. अर्थातच याचना करण्यापूर्वीच रॉथचाइल्डनं त्याना प्रचंड पैसा देणगी म्हणून दिला. ह्या पैशातून वसाहतवाल्यानी हॉलस्टाइन फ्रीझियन जातीच्या खूप दुधाळ आणि भरपूर महाग अशा गाई हॉलडमधून विकत घेऊन पॅलेस्टाइनमध्ये आणल्या. त्या गाईंची रोगप्रतिकारशक्ती किती, त्याना आवडणारे हवामान कोणते, त्याना लागणारे खाद्य काय, त्याचे रोग कोणते याचा अभ्यास न करताच धडाक्याने या गाई (काही हजार होत्या) आणल्या गेल्या. आणल्याबरोबरच गोचिडीच्या तापाने या सगळ्या गाईंना पछाडले आणि बहुतेक सगळ्या त्यात मेल्या! हा अनुभव लक्षात ठेवून १९४८ नतर इस्राइली शेतकऱ्यानी 'सीरियन' आणि 'दमास्कनीज' या स्थानिक गाईंपासून सुरुवात करून, त्याना हॉलस्टाइन फ्रीजियनचा संकर करून तीस वर्षांत 'इस्राइली फ्रीजियन' हा आतरराष्ट्रीय मान्यतेचा वंश तयार केला आहे. मुख्य म्हणजे आता इस्राइलमध्ये एकही गोचिड सापडणे मुष्किल आहे!

तर अशा या जगभरच्या ज्यूंच्या पैशातून इस्राइलने 'नंदनवन' उभे केले आहे. इस्राइलचा सुदैवाने अगणित आणि अमर्याद स्वरूपात दान करू शकणाऱ्या ज्यूंचा सख्या प्रचड आहे. न्यूयॉर्क टाइम्स कंपनी, रॉथचाइल्ड समूह अशा अनेक आतरराष्ट्रीय कपन्याचे मालक ज्यूधर्मीय आहेत. याशिवाय अमेरिकेतील ज्यू लोकानी अमेरिकन सरकारचे इस्राइलविषयक धोरण कसे असावे हे जणू ठरवणारी एक सुसंघटित यंत्रणाच निर्माण केलेली आहे. स्थानिक राजकारणापासून अमेरिकन राष्ट्राध्यक्षापर्यंत संबंध ठेवून, मात्र लोकशाहीतीलच सर्वमान्य असे मार्ग अवलंबून ही यंत्रणा अमेरिकन लोकमत इस्राइलपोषक असे जागृत ठेवते.

यावरून असे लक्षात येईल की, 'ज्यू' या एका अक्षरातूनच ही जगव्यापी अशी ज्यूंची संघटना उभी राहिली आहे. 'ज्यू' ही तशी धार्मिक संज्ञा म्हणता येणार नाही; अर्थात इस्राइलमधले अल्पसंख्य

सनातनी ज्यू सोडले तर! 'ज्यू' ही संज्ञा एका विशिष्ट इतिहासातून निर्माण झाली आहे, की जिच्यामुळे एका 'ज्यू'ला दुसऱ्या 'ज्यू'बद्दल आत्मीयता वाटते आणि नकळत दोघे 'जेरुसलेम' किंवा 'इस्राइल' या ध्येयाप्रत येतात तो इतिहास म्हणजे जगभरातून ज्यूंच्या झालेल्या हकालपट्टीचा असल्यामुळे 'आपण ज्यू आहोत' ही भावनाच एकजूट निर्माण करते. या भावनेत मात्र रूढ अर्थाने मुल्ला-मौलवीसारखा धार्मिक नियमांचा पगडा दिसत नाही ही विशेष गोष्ट आहे. किंबहुना धार्मिक नियम तरी काय आहेत हे सर्व ज्यूंना माहीत आहेत की नाही कोण जाणे!

वीस वर्षांच्या 'रॉनिट्झ्' या मुलीचेच उदाहरण घेऊ. रॉनिट्झ्चे आजोबा पोलंडहून १९१५ साली इस्राइल-भूमीत आले. ते कर्मठ ज्यू होते. वाळवंटाचे नंदनवन करण्याच्या प्रेरणेने ते भारलेले होते. त्यांचा मुलगा म्हणजेच रॉनिट्झ्चे वडील. इस्राइलच्या जन्मानंतरच्या सर्व लढायात त्यानी भाग घेतलेला. एका सहकारी वस्तीचे (मोशाव्ह) ते सभासद आहेत. १९४८ मध्ये अगदी टाकाऊ असलेली, मलेरियाने ग्रासलेली अशी जमीन त्यांच्या ह्यातीत सुपीक आणि समृद्ध झाली आहे. १९६० साली-ज्या वर्षी रॉनिट्झ्चा जन्म झाला-घरी मोठी गाडी आली. नंतर फ्रीज आला. रंगीत टेलिव्हिजन आला. मोशाव्हची सुंदर शाळा सुरू झाली. हळूहळू शेतात ट्रॅक्टर, मळणी-यंत्र, गोठ्यात मिल्किंग मशीन आले. रॉनिट्झ्ला समजू लागेपर्यंत घरातले, शेतातले कष्टच संपले!

## रॉनिट्झ् अशी का?

रॉनिट्झ्चे वडील आणि आजोबा तिला आपलं खडतर आयुष्य, दहशतवाद्याचा केलेला प्रतिकार, पंधरा-पंधरा तास कामात गेलेले दिवस, मोशाव्हच्या उभारणीत झालेले मतभेद, इस्राइल-अरबांच्या अनेक युद्धात आपण केलेले पराक्रम आणि आपला पवित्र ज्यूधर्म इत्यादी अनेकविध गोष्टी सांगतात. रॉनिट्झ्ला या सर्वच गोष्टींचं आश्चर्य वाटतं. कारण तिला टी. व्ही. गाडी, प्रगत शाळा, यांत्रिक शेती या गोष्टी लहानपणापासूनच दिसल्या असल्यामुळे त्या गोष्टी मिळविण्यासाठी काही कष्ट उपसावे लागतात हे तिला चटकन् समजून येत नाही. बरं, तिच्या मानानं ती खूप काम करते, पण ते यंत्राच्या मदतीनं होत असल्यामुळं तिला शारीरिक परिश्रम होत नाहीत, मोकळा वेळ भरपूर मिळतो. मोठ्याच्या लढाईतल्या शौर्याच्या गाथा तिला रोमांचकारी वाटत नाहीत. कारण तिला माहीत आहे की, तिच्या प्रियकराकडेही अशा खूप गोष्टी आहेत. पुन्हा तिला स्वत:ला सक्तीनं सैन्यात जावं लागत असल्यामुळे आपल्या वडिलानी, आजोबानी काही खास केलंय असं तिला वाटत नाही!

रॉनिट्झ् फावला वेळ कसा घालवते हे बघण्यासारखं आहे. आपण 'ज्यू' आहोत हे तिला माहीत आहे इतकचं, त्यामुळं आपल्याला सैन्यात जावं लागतं, कष्ट करावे लागतात, अरबाशी युद्ध करावं लागतं इतपत तिला समजतं. तसंच मार्च-एप्रिलमध्ये येणाऱ्या ज्यूंचा 'सेडर' सारख्या सणामध्ये सर्व कुटुंबानं करायच्या सामूहिक धर्मग्रंथ-पठणात प्राचीन काळपासून ज्यूंच्यावर झालेल्या अत्याचारांची माहिती तिला मिळालेली आहे. मात्र यापलीकडे धार्मिक गोष्टीत तिला फारसा रस वाटत नाही. कदाचित् तिच्या बुद्धीची कुवतच नसेल म्हणून म्हणा किंवा गरज वाटत नसेल म्हणून म्हणा किंवा इतर काहीही कारणं असतील म्हणून म्हणा, पण तिला अध्यात्माचा गंधही नाही!

रॉनिट्झ्ला सध्या सगळ्यात आकर्षण वाटतंय् ते पाश्चिमात्यांच्या विविध उपभोग्य वस्तूंचं. चैनी जग आणि त्याबरोबर आलेल्या स्वातंत्र्याच्या (म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या) कल्पना! जीन्स सतत घालणं, मुलांचं लक्ष सतत वेधून घेणं, कर्णकटू संगीताबरोबर अनिर्बंध नाचणं, पुरुषांबरोबरीनं धूम्रपान करणं, वेडेवाकडे केस राखणं-इत्यादी गोष्टी रॉनिट्झ्नं कधीच आत्मसात केल्या आहेत. तिचे वडील हे सर्व बघतात. त्यात काही चूक आहे असं त्यांना वाटत नाही. काळाचा महिमा म्हणून ते हे सर्व समजतात. मात्र कुठे तरी ते अस्वस्थ आहेत. त्याना आपल्या कन्येकडे बघून सारखं असं दिसत की ती काही तरी हरवून बसली आहे. आपल्या पिढीची ध्येयनिष्ठा तिच्याकडे नाही. (कारण तिला तशी ध्येयंच नाहीत). आपल्या पिढीचं गांभीर्य तिच्यामध्ये नाही आणि तिच्या पिढीचं असं दैदीप्यमान असंही तिच्याकडे काही नाही, यामुळे ते रॉनिट्झ्विषयी साशंक आहेत. आपल्याबद्दल तिच्या मनात आदर असेलच अशी त्याना खात्री वाटत नाही. तिच्याबद्दल त्यांच्या मनात जेवढं प्रेम आहे, तेवढं तिच्या मनात आहे असं तिच्या वागण्यावरून शंभर टक्के दिसत नाही. ती स्पष्टवक्ती आहे. बाहेरच्याशी फटकून क्वचित् तुसडेपणाने ती बोलेल-तसंच उत्तर मिळाल तरी तिला पर्वा नाही! तिच्या वडिलाना सारखं वाटतं, आपण इतके वेगळे कसे होतो? आपलीच मुलगी असून रॉनिट्झ् अशी 'वेगळी' का? याचं उत्तर त्याना एकच वाटतं-आपण फार कष्ट करून खूप फार थोड्या वेळात मिळवलं. रॉनिट्झ्ला आपण सगळं आयतं, सोपं करून दिलं. विपरीत कालाच्या भट्टीत तावूनसुलाखून ती कधी निघालीच नाही, म्हणून असं झालं असेल. रॉनिट्झ् कशीही वागली, तरी तिच्या वडिलांना एक माहीत आहे की, ती 'ज्यू' आहे आणि अरबांबरोबर कधीही युद्ध झालं, तरी लढायला जायला ती एका पायावर तयार आहे!

रॉनिट्झ्सारख्या मुली इस्राइलींना 'सिनिक्' वाटतील, पण तुम्ही 'मसादा'चं नाव घ्या, रॉनिट्झ्च काय, पण तिच्याहून 'आधुनिक' कोणी इस्रायली भेटला, तरी नकळत तो किंवा ती उल्हसित होऊन जाईल. 'मसादा' ची कहाणी ही जुन्या-नव्या, सनातनी, आधुनिक सगळ्या इस्राइलींना एकत्र आणते, आपल्यात काही मतभेद नाहीतच अशा भावना दृढ करते. आपल्याकडच्या पद्मिनीराणीचा जोहार आणि आत्मसमर्पणाची कहाणी जशी भारतीय जनमानसावर विशेष ठसलेली आहे, तशीच ही 'मसादा'ची कहाणी आहे.

## धगधगते हौतात्म्य

इसवी सन ६६ साली रोमन साम्राज्याविरुद्ध ज्यूंनी बंड केलं. हे बंड रोमनांनी अत्यंत क्रौर्यानं मोडून काढलं. ७० साली जेरुसलेम पडलं; तिथलं ज्यूंचं पवित्र देऊळ उद्ध्वस्त झालं. शेवटी मृत समुद्राच्या किनाऱ्यावरचा मसादा किल्ला हे एकच ठिकाण असं

राहिलं की, रोमनाना ते जिंकणं अशक्य झालं. बंडाची ज्योत मसादावर तेवत राहिली. 'मसादा' हे बंडाचं प्रतीक झालं. यामुळं ते जिंकणं हे रोमनांचे प्रतिष्ठास्थान होऊन बसलं. ७२ सालाच्या शेवटी 'सिल्व्हा' या रोमन सेनापतीनं १०००० ते १५००० फौज घेऊन मसादावर निकराचा हल्ला चढवायचं ठरवलं. सरळ हल्ला चढवणं अशक्यच होतं, कारण किल्ला एक तर अतिशय उंच (जवळजवळ ४५०० फूट; पायथा मृतसमुद्राच्या किनाऱ्यापाशी—म्हणजे समुद्रसपाटीच्या खाली १२०० फूट ) आणि बिकट कड्यानी वेढलेला. किल्ल्यावर संरक्षण करणारे होते ९६७ ज्यूलोक. ( पुरुष, स्त्रिया, मुलं धरून ) त्यांचं नाव पडलंय् 'झीलट्स्'. रोमनांनी ठरवलं की कितीही काळ लागो, पण झीलट्स्ना आपण शरण आणायचंच म्हणून त्यांनी संपूर्ण किल्याभोवती पंधरा फूट उंच भिंत बांधली आणि वेढा देऊन खाली आपल्या सैन्याचं गावच वसवलं. झीलट्स् काही केल्या शरण येईनात. शेवटी भिंतीत खिंडार पाडून रोमनांनी हल्ला केला. मसादा पडणार हे निश्चित झालं. तेव्हा झीलटसचा प्रमुख एलाझार याने अंतिम निर्णय घेतला की, सर्वांनी आत्महत्या करायची—पण रोमनाना शरण जायचं नाही! पहिल्यांदा त्यांनी आपलं सर्व सामानसुमान गोळा केले आणि त्याला आग लावून दिली. रोमनांना शेवटची भेट म्हणून अन्न—पाण्याचा साठा मात्र जसाचा तसा ठेवला ! नंतर त्यानी चिठ्ठ्या टाकल्या आणि त्या कर्तव्यासाठी दहा जणांची निवड केली. ९६७ पैकी ७ जण फुटीर निघाले. त्याना सोडून इतर ९५० जणाना या दहांनी आपल्या तलवारीनी स्वर्गाची वाट मोकळी करून दिली. त्यानंतर शेवटच्या चिठ्ठ्या टाकल्या गेल्या आणि त्या दहामधल्या एकाची निवड झाली. त्याने इतर नऊ जणांना मृत्यू दिला आणि शेवटी स्वतःच्या तलवारीच्या पात्यावर उडी घेतली !

जोसेफूस नावाच्या प्राचीन लेखकाने आपल्या 'ज्युइश वॉर' या पुस्तकामध्ये मसादाच्या संरक्षकांचा प्रमुख एलाझार याचे शेवटचे भाषण संपूर्ण दिले आहे. त्यातला एक उतारा—

**'माझ्या निष्ठावान अनुयायांनो, खूप वर्षांपूर्वीच आपण ठरवलंय की आपण गुलाम फक्त एकाचेच होऊ— देवाचे ! इतर कोणी असो, रोमन असोत किंवा आणखी कोणी शत्रू असो, त्याचे गुलाम आपण कधीही होणार नाही ..आता अशी कसोटीची वेळ आली आहे की आपले शब्द आणि आपली कृती यामध्ये काहीही विसंगती नाही हे दाखवून देण्याची....बंड करणारे आपण पहिलेच होतो, लढा शेवटपर्यन्त देणारे आपणच ठरू असा मान आपल्याला देवानेच देऊ केला आहे. आपण उद्या पहाटे मरणार तर आहोतच; पण आपण मरू ते स्वतंत्रतेत मरू, गुलामीत नाही !'**

'*शरणागतीपेक्षा मरण बरे*' हा मसादाचा संदेश आता १९०० वर्षानंतरही इस्त्राइली नागरिकांना देशभक्ती शिकवून जातोय्. इस्त्राइलच्या चिलखती गाड्यावरच्या सैनिकांना त्याचे प्रशिक्षण संपण्याआधी 'मसादा' वर नेले जाते. ९६० झीलट्स्च्या हौतात्म्याच्या धगधगत्या वातावरणात त्यांना कर्तव्यनिष्ठेची शपथ देवविली जाते. समारंभ संपण्याच्या वेळी सगळे नवसैनिक गर्जना करतात—

" Masada shall not fail again. "

मसादाचा शोध ऑक्टोबर १९६३ ते मार्च १९६५ या काळात हजारो कामगारानी केलेल्या अविश्रांत उत्खननात लागला. जोसेफूसच्या पुस्तकातले उतारे शंभर टक्के खरे असल्याचे दाखले उत्खननात सापडले उदाहरणार्थ, ज्या दहा वीरानी इतर ९५० जणाना मृत्युदान केले, त्या दहा जणांची शाईने कोरलेली नावे भिंतीवर मिळाली. खोल्यामधून राख, कोळसा, लाकडी फर्निचरचे भग्नावशेष सापडले. हळूहळू राजा हेरॉडनं निर्माण केलेल्या जलयोजनेचा मार्ग सापडला; पश्चिमेकडचा राजमहाल सापडला. न्हाणीगृह सापडले. या अफाट कामाचा लक्षावधीचा खर्च रॉथचाइल्ड कुटुंब, इंग्लंडचे 'संडे ऑबजर्व्हर' साप्ताहिक, वूल्फसन प्रतिष्ठान, टेरेन्स केनेडी, इस्त्राइल सरकार यानी केला.

उत्खननानंतर संशोधन, जतन आणि पुनरुज्जीवन ही कामे किती कसोशीने व पद्धतशीर केली आहेत हे प्रेक्षणीय आहे. जिथे जिथे जुन्या पडक्या भिंतीना जोड देऊन नव्या भिंती बांधल्या आहेत, तिथे तिथे काळ्या रंगाची रेघ दिसेल. ज्या ज्या ऐतिहासिक जागा आहेत, त्यांना क्रमांक दिलेले आहेत. त्याच क्रमांकांप्रमाणे सर्व टूरिस्ट गाइड्स्, माहितीपत्रक, इतिहासाची पुस्तके यांच्यामध्ये क्रमांक दिलेले आहेत. हिब्रू विद्यापीठ, इस्त्राइल सरकारचे पर्यटन खाते, संस्कृतीखाते यांच्यात सतत समन्वय असल्यामुळेच हे शक्य झाले आहे. परदेशी पर्यटकांना आकर्षण म्हणून खालपासून वरपर्यंत 'केबलकार' सुरू आहे.

हिटलरने दुसऱ्या महायुद्धात केलेले ज्यूंचे हत्याकांड अजूनही सर्व इस्त्राइलीच्या डोक्यात सतत असते. हा हबका एवढा प्रचंड होता की मोशेसाहेब असोत, रॉनिट्झ् असो किंवा तिचे वडील असोत, हिटलरच्या नावामध्ये एवढे पाशवी सामर्थ्य ज्यूंच्या लेखी आहे की, ते एकदम जवळ येतात. आता जर्मनी देश ह्या हत्याकांडाबद्दल कितीही क्षमाशील असला, तरी इस्त्राइलीना जर्मन लोकाविषयी अजूनही भीती वाटते. हिटलरच्या हत्याकांडातूनही जे जर्मन ज्यू जगू शकले, त्यांच्यासाठी पश्चिम जर्मन सरकार सर्व खर्च करून त्याना दरवर्षी एक महिना सुट्टीसाठी इस्त्राइलला पाठवते. इस्त्राइलच्या जडणघडणीत पश्चिम जर्मनीने मुबलक मदत दिली आहे. विली ब्रांटसारख्या जर्मन राष्ट्राध्यक्षांनी ज्यूंची अनेकदा क्षमा मागितली आहे. असे असूनही अजून जर्मन माणूस भेटला की इस्त्राइलमध्ये साशंकता उत्पन्न करतो.

अरब गनिमाचा दहशतवाद, हिटलरने केलेले हत्याकांड, 'मसादा'सारखी प्रतीके, एकजुटीने आणि ध्येयवादाने निर्माण करून दाखवलेली आश्चर्ये, या सगळ्यामुळे 'ज्यू' हा शब्द अजून तरी जादू करून दाखवतो. रॉनिट्झ्च्या पन्नासाव्या वर्षापर्यंत काय होणार हे *भविष्यकालच* दर्शवील.

इस्त्राइलमधले ज्यू लोक हे इस्त्राइलचे इस्त्राइली म्हणून नागरिक आणि ज्यू म्हणूनसुद्धा नागरिक आहेत. ज्यूसोडून जे इतर इस्त्राइली नागरिक आहेत—यामध्ये अरब मुस्लिम, अरब ख्रिश्चन आणि ड्रूज याचा समावेश आहे—ते धर्माने आपापल्या धर्माचे पण जन्माने इस्त्राइलचे नागरिक आहेत. ज्यूंप्रमाणेच नागरिकत्वाचे सर्व हक्क त्यांना आहेत. मात्र अरबाना लष्करी-सेवा सक्तीची नाही या धार्मिक व्याख्येवरून एक किस्सा आठवतो. एक इस्त्राइली ख्रिश्चन मनुष्य होता. तो एका ज्यू मुलीच्या प्रेमात पडला दोघांना लग्न करायचे होते. ज्यू धर्मात प्रवेश करणे हे महाकठीण काम—कारण एक तर आधी सुंता करायला पाहिजे आणि नंतर ज्यूधर्मगुरूशी वाद घालून आपले 'ज्यूत्व' सिद्ध करायला पाहिजे. या दोन्ही गोष्टींना हे गृहस्थ घाबरले ! त्यानी एक नवीनच शक्कल काढली. त्यांनी कोर्टाला सांगितले, 'तुमचे रॅबाय काही म्हणोत ! मी ख्रिश्चन असलो तरी मी ज्यूच आहे; कारण मी येशू ख्रिस्ताला मानीत नाही ! शेवटी ज्यू आणि ख्रिश्चन धर्मातला फरक म्हणजे येशूच नाही का ? तर कोर्टाला माझी विनंती आहे की आपण असे जाहीर करावे की अर्जदार धर्माने आणि जन्माने ख्रिश्चन आहेत, पण विचाराने 'ज्यू' आहेत !' अर्थात कोर्टाने या सद्गृहस्थांचा अर्ज फेटाळून लावला !

ज्यूनी तरी दुहेरी सदस्यत्वाचा वाद मिटवला आहे ! [ क्रमशः ]

# एका फ्रेंच गुप्तहेराचे साहस

अनुवाद
विजय देवधर

माझ्या टेबलावरील टेलिफोन घणघणला. मी रिसिव्हर उचलून कानाला लावला.

'बॉनिक्, इकडे ये !'

बस् ! इतकेच शब्द त्यातून उमटले अन् कनेक्शन बंद झालं. फोन आमच्या प्रमुखांचा होता नि त्यांचा स्वर काहीसा तुटक होता. त्याबद्दल नवल करत मी माझ्या कॅबिनमधून बाहेर पडलो. लाकडी जमीन असलेल्या कुबट कॉरिडॉरमधून चालत ५२२ नंबरच्या कॅबिनशी मी पोचलो. दारावर अगदी हळूच मी दोनदा टकटक केलं.

'आत ये !' आतून शब्द आले.

दार लोटून मी आत शिरलो. एका मोठ्या टेबलापलीकडे आमचे प्रमुख–सूरेट नॅशनल डिटेक्टिव्ह एजन्सीचे चीफ डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर –ह्यूबर्ट व्हिचि बसलेले होते. गरगरीत देहयष्टी, गुलाबीसर वर्णाचा गोल गुबगुबीत चेहरा, चापून–चोपून बसवलेले काळेभोर केस असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. त्यानी गर्द निळ्या रंगाचा सूट घातलेला होता. त्यांच्या गरगरीत देहयष्टीमुळं आम्ही त्यांना 'ढोलबा' हे टोपणनाव दिलेलं होतं. आपल्या लठ्ठ पण सुबक बोटांमध्ये त्यांनी एक तारेचा कागद धरलेला होता नि त्याचं ते बारकाईनं निरीक्षण करत होते.

'एमिल ब्यूसन निसटलाय् !' गंभीर स्वरात ते म्हणाले नि तो तारेचा कागद त्यानी मला दिला. मी त्यावरून नजर फिरवली.

'पोलीस प्रिफेक्चर, सूरेट नॅशनल, जेंडरमेरीच्या सर्व सेक्शन्स-साठी–स्टॉप–एमिल ब्यूसन याला तातडीनं शोधून काढण्याची विनंती, हा मॉसियर एमिल म्हणूनही ओळखला जातो. वय पंचेचाळीस, उंची एकशेसाठ सें. मी., किरकोळ शरीरयष्टी, काळे डोळे, काळे केस–स्टॉप–विलिज्यू मेंटल हॉस्पिटलमध्ये देखरेखीखाली असताना ३ सप्टेंबर रोजी हा पसार झाला ! याला सक्तमजुरीची शिक्षा झालेली होती.–स्टॉप–आणखीही एकजण निसटला आहे : नाव रेने गिरियर, हा 'रेने द केन' या टोपण नावानंही ओळखला जातो. वय सत्तावीस, उंची एकशेऐंशी सें. मी , मध्यम बांधा, तपकिरी डोळे, कुरळे करडे केस–स्टॉप–दोन्ही गुन्हेगार बाहेरच्या साथीदारांच्या मदतीनं निसटले–एंड.'

ढोलबा आपल्या खुर्चीत मागं रेलले. पूर्ण विचाराती अखेर ते मला म्हणाले, 'हे दोन्ही गुन्हेगार तू शोधून काढावेस अशी माझी इच्छा आहे; ते पण प्रिफेक्चर एजन्सी त्याना पकडण्यापूर्वी, जेंडरमेरीच्या हाती ते गवसण्यापूर्वी किंवा अन्य कुणीही त्याना धरण्यापूर्वी ! समजलं ? सूरेट नॅशनल काही स्वस्थ बसलेलं नाही हे मला दाखवून द्यायचंय आणि एक सावधगिरीची सूचना बॉनिक् : ब्यूसन एक खुनी गुंड आहे. तेव्हा त्याचा माग सांभाळून घे !'

मी माझ्या ऑफिस–कॅबिनमध्ये परतलो. बारा बाय दहाच्या या कॅबिनमध्ये वॉर्निश नसलेली दोन लाकडी टेबलं, दोन खुर्च्या, एक केराची टोपली आणि एक टेलिफोन–बस् एवढ्याच गोष्टी होत्या. मी आणि माझा सहकारी–इन्स्पेक्टर जीन हिदोनी–असे दोघं या कॅबिनमध्ये बसत असू. हिदोनी चांगला उंचनिंच होता; पण व्यक्तिमत्त्वानं एकदम नाजुक होती स्वारी. तो पोलिसखात्यातला वाटतच नसे !

'हुं ! काय म्हणतायत ढोलबा ?' त्यानं मला विचारलं.-

'ब्यूसन.'

'हा कोण प्राणी बुवा ?'

'काही कल्पना नाही. पूर्वी कधी हे नाव ऐकलं नाही; पण आपण त्याला त्वरेनं शोधून काढावं अशी ढोलबांची इच्छा आहे. मी वरती रेकॉर्डरूममध्ये जातोय. या ब्यूसनची काय माहिती मिळते का ते पहातो.'

त्या वेळपर्यंत प्रिफेक्चर ही आमची प्रतिस्पर्धी डिटेक्टिव्ह एजन्सी त्या गुन्हेगाराच्या मागावर पूर्ण वेगान सुटली असणार असा मी कयास केला. याचा अर्थ तीनशेहून अधिक डिटेक्टिव्हज् त्या दोघा बदमाषांना पकडण्यासाठी त्यांच्या मागावर सुटले असणार ! आमची परिस्थिती मात्र या उलट होती. आरामखुर्चीत विसावलेल्या आमच्या ढोलबाव्यतिरिक्त–सूरेट नॅशनलतर्फे पॅरिसचा संपूर्ण परिसर सांभाळणारे–आम्ही दोघेच डिटेक्टिव्ह होतो–हिदोनी आणि मी !

पायऱ्या चढून मी वरच्या मजल्यावरील रेकॉर्डरूममध्ये गेलो. रु डी सॉस्सा रस्त्यावरील, सूरेट नॅशनल हेडक्वार्टर्स बिल्डिंगच्या सहाव्या मजल्यावरील या रेकॉर्डरूममधूनच नेहमी कोणत्याही प्रकरणाची सुरुवात होत असे. या रेकॉर्डरूमची व्याप्ती प्रचंड अशीच आहे. या रेकॉर्डरूममध्ये कपाटांच्या लांबच्या लांब रांगा आहेत नि त्या कपाटांमधून लक्षावधि फायली रचलेल्या आहेत. पॅरिसमधलं सारं गुन्हेगार जगतच या फायलिंगमध्ये सामावलेलं आहे.

रेकॉर्डरूममधल्या इन्स्पेक्टरजवळ मी एमिल ब्यूसनच्या फायलीची मागणी केली. एका कपाटातून त्यानं ती फाइल काढली. फाइल कसली ती? अनेक फोल्डर्सचा एक जाडजूड गठ्ठाच होता तो!

'हं! ही बघा मॉसियर एमिलची फाइल!' ते बाड मला देत तो इन्स्पेक्टर म्हणाला, 'या खेपी काय उपद्व्याप केलायन् या चोरानं? तो 'आत' असेल अशीच माझी कल्पना होती!'

'तो 'आत' होता; पण आज सकाळीच गिरियर नावाच्या एका साथीदाराबरोबर तो पसार झालाय्!' मी उत्तरलो.

'अच्छा! म्हणजे आता तू त्याच्या मागावर सुटणार एकूण? ठीक! पण सांभाळून हं बॉनिक्! हा साधासुधा गुंड नाही! त्याला अगोदर गोळी झाडण्याची संधी कधीच देऊ नकोस! फार तल्लख आहे तो अन् तितकाच घातकी. डुक्करच आहे लेकाचा!'

फायलीचं ते बाड खाकोटीला मारून मी माझ्या ऑफिस–कॅबिनमध्ये परतलो. ते बाड सोडून त्यातल्या फोल्डर्समधली माहिती वाचण्यास मी सुरुवात केली. जसजशी ती माहिती मी वाचू लागलो, तसतसं ब्यूसनचं स्वरूप माझ्यासमोर साकार होऊ लागलं. त्या फायलीत 'मॉसियर एमिले'चं दहा वर्षांचं रेकॉर्ड साठवलेलं होतं. १९३७ सालापासून त्यानं धिंगाणा घालण्यास सुरुवात केली होती. बँकदरोडे, पगारवाटपाच्या रकमा लांबवणं, खून असे अनेकविध गुन्हे त्याच्या नावावर जमा होते. एमिलबरोबर नेहमी दोन, तीन किंवा चार साथीदार असत. त्याचा प्रत्येक दरोडा योजनाबद्ध असे. ज्या भागात तो हात 'साफ' करी त्या भागाची त्याला खडान् खडा माहिती असे. त्याच्या मोहिमा घड्याळाच्या काट्याबरहुकुम चालत. त्याच्याकरवी लुटले गेलेले लोक नेहमी त्याचं ठराविक वर्णन देत असत: गडद रंगाचे कपडे घातलेला एक बुटका इसम, काळे डोळे, नजर विलक्षण भीतिदायक! त्याच्या थंड, भेदक नजरेचा विशेष बोलबोला झालेला होता. जो तो त्याच्या भयप्रद नजरेबद्दल बोले. त्याची तीक्ष्ण, भेदक नजर रक्त गोठवणारी असते असं लोक म्हणत!

एका दरोड्याच्या वेळी काही तरी गफलत होऊन तो पोलिसांच्या हाती लागला नि त्याची तुरुंगात रवानगी झाली; पण अनेक हिकमती करून तो तुरुंगातून निसटला आणि फ्रान्सबाहेर पळाला! काही काळ त्याची काहीच बातमी कळू शकली नाही. पुढे तो जर्मन पोलिसांच्या हाती लागला नि त्यांनी त्याला पुन्हा फ्रेंच पोलिसांच्या ताब्यात दिला. एमिलवर खटला भरला गेला आणि त्याला आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली गेली! पॅरिसच्या सेन्ट तुरुंगात त्याची रवानगी झाली....

ती फाइल मी मिटली आणि खुर्चीत रेलत एक सिगरेट पेटवली. मॉसियर एमिलसारखा कुख्यात ठग मोकाट सुटणं अत्यंत धोक्याचंच होतं. त्यामुळं पॅरिससारख्या सुरेख शहराचं दुसऱ्या शिकागोतच रूपांतर झालं असतं...!

¤

ठीक, मॉसियर एमिल ब्यूसन अंडरवर्ल्डचा राजा असेलही; पण मीही एक शिकारी होतो. गुप्तहेरगिरीच्या माझ्या पेशाचं मला जबरदस्त आकर्षण होतं. गुन्हेगाराचे माग घेणं, त्यांना पकडणं, त्यांच्या उलटतपासण्या घेणं, एखाद्या कामगिरीला चिकटून राहणं या माझ्या आवडीच्या गोष्टी होत्या. मी एक डिटेक्टिव्ह होतो; पण तरीही माझं स्वत:चं खास असं वैशिष्ट्य म्हणून मी कधीही पिस्तुल अगर हातबेड्या जवळ बाळगत नसे. त्याऐवजी मी माझ्या हातांनी 'काम' घेत असे. गुन्हेगार पकडायची माझी स्वत:ची अशी एक खास पद्धत होती. सावजाच्या मागावर राहायचं. ते कुठं रस्त्यात दिसलं की, अचानक त्याच्यावर उडी मारून त्याला खाली पाडायचं नि नंतर एखाद्या मोठ्या फुलपाखरागत त्याला हेडक्वार्टर्सवर घेऊन जायचं असा माझा खाक्या होता!

असं असलं तरी हा पेशा स्वखुषीनं स्वीकारला होता असं मात्र नव्हे! एक तर मला वेतन कमी मिळत होतं. शिवाय लोकांच्या नजरेत डिटेक्टिव्हच्या नोकरीला खास स्थानही नव्हतं. सुरुवातीला मी एक–म्युझिक हॉल सिंगर–होतो. पुढं जर्मनांनी फ्रान्स व्यापला त्यामुळं माझ्या व्यवसायावरच गदा आली. माझ्या करियरची पार वाटच लागली! मग मी काही हलकीसलकी कामं केली आणि अखेर स्टोअरडिटेक्टिव्हची नोकरी मिळवली. या नोकरीत मिळणाऱ्या पगारात माझं जेमतेम भागत होतं. अशातच एक दिवस मला एक भयंकर बातमी समजली. स्थानिक धडधाकट तरुणांना पकडून जर्मन लष्करी अधिकारी त्यांची रवानगी जर्मनीतल्या सक्तीच्या श्रमछावण्यांमध्ये करीत होते! जहाजं भरभरून असे तरुण जर्मनीला जबरदस्तीनं पाठवण्यात येत होते. अशा तरुणांच्या यादीत माझंही नाव होतं नि काही दिवसांनीच एका जहाजानं माझी जर्मनीला रवानगी करण्यात येणार होती!

'पोलिसदलातील लोकांना ते जर्मनीला पाठवीत नाहीत!' माझ्या एका मित्रानं मला मोलाची माहिती पुरवली.

काहीही करून या सक्तीच्या उचलबांगडीतून सुटका करून घेणं भाग होतं. म्हणून नॅशनल पोलिसखात्याच्या डिटेक्टिव्हच्या परीक्षेकरिता मी प्रवेश मिळवला. या परीक्षेकरता पत्रद्वारे पाठवण्यात येणारा अभ्यासक्रम मी पुरा केला नि नंतर या परीक्षेत उत्तीर्णही झालो. ही गोष्ट आहे १६ डिसेंबर १९४३ ची. त्या वेळी माझं वय अवघं २४ वर्षांचं होत.

१ मे रोजी ऑलिन्समधल्या–राजकीय विभागातल्या पाचव्या सुरक्षा पोलिसदलात–माझी नेमणूक झाली. माझ्याकडे काम होतं, भूमिगत प्रतिकारकांना शोधून काढणं! स्वदेशबांधवाविरुद्ध पावलं उचलायला लावणारी नोकरी पत्करणं ही अतिशय नामुष्कीचीच गोष्ट होती. –पण माझा नाइलाज होता. हे नामुष्कीचं पातक माझ्या हातून घडण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. कारण या नव्या नोकरीत स्थिर होण्यापूर्वीच रक्षक म्हणून एका तुरुंगात माझी बदली झाली.

पण आगीतून उठला अन् फोफाट्यात पडला अशीच माझी अवस्था झाली.

कारण इथलं कामही भयंकरच होतं. पकडून आणलेल्या फ्रेंच कैदी बांधवावर मशीनगन रोखून पहारा करणं! एक दिवस मारहाणीमुळं जर्जर झालेल्या एका भूमिगत क्रांतिकारी कैद्यावर पहारा करण्याची माझ्यावर वेळ आली. त्याला इतकी निर्दयपणं मारपीट करण्यात आली होती की, त्याचा चेहरा ठेचून निघाला होता. तुरुंगातल्या भिंतीशी त्याला साखळदंडांनी जखडून ठेवण्यात आलं होतं. तो जवळजवळ अर्धमेलाच झाला होता! जर्मन चौकशी–अधिकारी

रात्रभर त्याची उलटतपासणी घेत असत अन् दिवसा त्याला फ्रेंच पोलिसरक्षकांच्या पहाऱ्याखाली तुरुंगाच्या कोठडीत डाबून ठेवण्यात येई.

आमचा सेक्शनचीफ त्याचा 'गलिच्छ फ्रेंच कुत्तरडा' असा उल्लेख करत असे.

या सर्व प्रकाराचा मला अतिशय वीट आला अन् एक दिवस कुणाच्या नकळत मी तिथून गुपचुपपणं पळ काढला. आता मागे पोलिसाचा ससेमिरा लागण्याची माझी पाळी होती! म्हणून आलिन्समधून निसटून मी पॅरिसला आलो नि तिथे भूमिगत झालो.

नंतर दोस्तांनी नॉर्मंडीत पदार्पण केलं. २ सप्टेंबर १९४४ रोजी जर्मन्स फ्रान्स सोडून गेले. पॅरिस मोकळं झालं अन् मग सूरेट नॅशनल डिटेक्टिव्ह एजन्सीमध्ये डिटेक्टिव्ह ट्रेनी म्हणून मला परत घेण्यात आलं. पॅरिसच्या 'फर्स्ट डिव्हिजन फ्लाइंग स्क्वाड 'मध्ये माझी नेमणूक झाली. आमच्या खात्याकडून मला एक रिव्हॉल्व्हर, एक धातूचा बिल्ला आणि तिरंगी फीत असलेलं एक ओळखपत्र मिळालं. या ओळखपत्रावर पॅरिसच्या भुयारी रेल्वेमधून नि बसेसमधून मला मोफत प्रवास करता येत होता आणि—अरे हो! एक गोष्ट मी विसरलोच! हातबेड्यांची एक जोडीही मला मिळाली होती. युद्धकाळात फ्रान्स जर्मनांद्वारे व्यापला गेल्याने अनाचारास ऊत आला होता. त्यामुळं अनौरस संतती आणि गर्भपाताच्या दुष्टचक्रात फ्रेंच महिला सापडल्या होत्या. गर्भपातास कायद्यान बंदी होती. तेव्हा गर्भपाताच्या बेकायदेशीर केसेस हुडकून काढण्याचं काम मला देण्यात आलं होतं. या फालतू कामात मला अर्थातच रस नव्हता.

माझ्या ऑफिसच्या पुढल्या ऑफिसमध्ये मात्र डिटेक्टिव्हांना लायक अशा कामगिऱ्या मिळत असत. देश-विद्रोह करणाऱ्या फितुराना पकडण्याच्या कामगिऱ्यांवर डिटेक्टिव्ह मोहीमशीर असतात असं मला कळलं होते. एक दिवस मी त्या ऑफिसमध्ये सहजच गेलो. तियलं एक बंद दार केवळ कुतूहलापोटी मी लोटून उघडलं. आत मला एक विलक्षण दृश्य दिसलं. दोरीनं छताला टांगलेल्या सायकलच्या एका रीममध्ये संपूर्ण नग्नावस्थेत एक माणूस लोंबकळत होता. पोट रिमवर, एका बाजूला हात नि एका बाजूला पाय अशा अवस्थेत लोंबकळणाऱ्या त्या माणसाच्या दोन्ही हातांत एकक जड टेलिफोनबुक दिलेलं होतं. शरीराला ताण बसून त्या माणसाला वेदना व्हाव्यात म्हणून एक पोलीस त्या सायकलरिमला लाथा घालून तिला झोके देत होता! हे दृश्य मला काही क्षण दिसलं न दिसलं तोच माझ्या तोंडावर ते दार खाडदिशी बंद झालं.

त्या माणसाचे चाललेले हाल पाहून मला कससंच झालं. 'या सर्वांची तुला सवय व्हायला हवी बॉनिक्!' माझी अवस्था पाहून माझ्याजवळ उभा असलेला आमचा ग्रुपलीडर पुटपुटला, 'तो हरामखोर देशद्रोही आहे. देशाविरुद्ध कट करणारा तो एक हलकट फितुर आहे!'

या असल्या गोष्टींची 'सवय' होणं मला शक्यच नव्हतं. कारण या गोष्टी मला रुचतही नव्हत्या नि पचतही नव्हत्या. गर्भपात करवून घेणाऱ्या स्त्रिया, गर्भपात करवणारे डॉक्टर्स, पकडलेल्या कैद्यांचे निर्दयतेनं केले जाणारे हाल या कशा कशात मला स्वारस्य नव्हतं. या गोष्टींना मी विटलो होतो अन् म्हणूनच या नोकरीचा राजीनामा देण्याचं मी ठरवलं नि राजीनाम्याचं पत्रही लिहिलं.

पण त्याच सुमारास माझ्यायोग्य अशी एक कामगिरी माझ्यावर सोपवण्यात आली. डिटेक्टिव्हला साजेल अशी नि त्याला आव्हान देईल अशीच ही कामगिरी होती. एका तरुण युवतीचा खून झाला होता नि तिचा खुनी शोधून काढण्याचं काम माझ्यावर सोपवण्यात आलं होतं. या रहस्याचा गुंता सोडवताना एक प्रकारचा विलक्षण थरार मला अनुभवण्यास मिळाला. खुनाच्या रहस्याची उकल करून खुन्याला मी तुरुंगाचा रस्ता दाखवला नि अशा प्रकारे माझा पहिला गुन्हेगार मी पकडला. खुन्याचा माग घेण्यात नि खुनाची ही केस सोडवण्यात मिळालेल्या थरारक अनुभवांमुळे डिटेक्टिव्हच्या कामातली खरी गोडी मला कळली अन् माझं राजीनाम्याचं पत्र मी फाडून टाकलं.

गुप्तहेराच्या जगात बातम्या पुरवणाऱ्या, महत्त्वाच्या टिप्स देणाऱ्या खबऱ्यांना फार महत्त्व असतं, किंबहुना अशा खबऱ्यांच्या मदतीविना डिटेक्टिव्ह आपलं कामच करू शकत नाही हे अगदी सुरुवातीपासूनच मला माहिती होतं. म्हणून अशा खबऱ्यांशी दोस्ती जमवण्यासाठी रोज संध्याकाळी निरनिराळ्या बारसमध्ये नि मंद दिवे असलेल्या डान्सिंग हॉल्समध्ये मी नियमितपणे चकरा मारू लागलो. रात्रीच्या काळोखात एखाद्या सराईत गुंडाप्रमाणे बदमाषांच्या अंडरवर्ल्डमध्ये फिरू लागलो. या भ्रमंतीमध्ये दिसणाऱ्या प्रत्येक बदमाषाचा चेहरा नीट लक्षात ठेवण्याचा उपक्रमच मी सुरू केला. माझ्या अपेक्षेप्रमाणे या भ्रमंतीचा मला खूप फायदा झाला. अंडरवर्ल्डमध्ये माझ्या बऱ्याच उपयुक्त ओळखी झाल्या. अंडरवर्ल्डमधला एखादा गुंड काही तरी लफड्यात सापडून अखेर माझ्याच ऑफिसमध्ये माझ्यासमोर यायचा. अशा गुंडांचा माझ्या कामासाठी मी युक्तीने उपयोग करून घ्यायला सुरुवात केली. उदाहरणादाखल एखादी वेश्या आमच्या स्क्वाडनं उचलली तर तिच्या सुटकेची व्यवस्था मी करत असे; पण मोबदल्यात मला उपयोगी ठरेल अशी माहिती तिनं दिली तरच तिची सुटका होईल अशा स्वरूपाचा तो करार असे. मग अशा वेश्येकडून अगर तिच्या एखाद्या मित्राकडून मला एखाद्या संभाव्य दरोड्याची अगर एखाद्या गुप्त कटाची बातमी आगाऊच लागे नि गुन्हा घडण्यापूर्वीच आमचं स्क्वाड संबधित गुन्हेगारांना पकडून त्यांची रवानगी तुरुंगात करीत असे. एखाद वेळी फरारी झालेल्या एखाद्या कुप्रसिद्ध गुंडाचा ठावठिकाणा अशाच एखाद्या पकडलेल्या गुंडाकडून—सुटकेच्या मोबदल्यात—मला कळे. पकडलेल्या हलक्यासलक्या गुंडाला अशा तऱ्हेनं ऋणाच्या ओझ्याखाली ठेवून अंडरवर्ल्डमधली महत्त्वाची माहिती, टिप्स मिळवण्याची माझी ही युक्ती विलक्षण यशस्वी ठरली. माझ्या या 'उदार धोरणाचा' लौकिक गुन्हेगार-जगतातही पसरला. हळूहळू माझ्या खबऱ्यांची संख्या वाढू लागली. ते मला अट्टल चोरांचे माग देऊ लागले नि असे पकडलेले अट्टल चोर मला खुनी, घातकी गुंडांपर्यंत पोचवू लागले. अर्थात हे काम धीम्या गतीनं चालणारं होतं. धीराला त्यात महत्त्व होतं. मी कोणत्याही पद्धतीचा, युक्त्या-प्रयुक्त्यांचा अवलंब करीत असलो तरी गुन्हेगारांनी तुरुंग भरण्यास माझी मदत होते आहे हे खुद्द आमच्या ढोलबानीही मान्य केलं होतं.

माझ्या नोकरीतल्या यशामुळं माझ्या व्यक्तिगत विवंचनांचा मला विसर पडू लागला. या महिन्यात पैशाची तंगी आहे, पुढल्या महिन्यात ख्रिसमसनिमित्त मार्लिसला (माझी गर्लफ्रेंड) काही तरी प्रेझेंट द्यायचंय, मॉंटमार्त्रे इथं आम्ही दोघांनी भागीत घेतलेल्या तीन रूम्सच्या फ्लॅटच्या हप्त्याचं काय करायचं? या नि अशा अनेक खाजगी अडचणी–मला मिळणाऱ्या या यशामुळं–माझ्या मनाच्या कोपऱ्यात बसू लागल्या. हे झालं माझ्यापुरतं; पण आमचे चीफ–'ढोलबा'–अस्मादिकांचं मूल्याकन 'प्रमोशन चार्ट'वर जमा होणाऱ्या पॉइंटस्वर करत होते. एखादी बारीकसारीक कामगिरी मी नीट पार पाडली तर ते औपचारिकपणं माझं अभिनंदन करत, माझ्याशी हस्तांदोलन करीत; पण तेवढंच. नियमाप्रमाणे ठराविक वेळी मिळणारा बोनस मला मिळत होता आणि ढोलबांकडून दर वेळी एक आश्वासन: 'जर तू एखादं मोठं सावज पकडून काही विशेष कामगिरी बजावलीस तर मी तुला चीफ इन्स्पेक्टरचं प्रमोशन देईन!' काहीही असो; पण ही डिटेक्टिव्हची नोकरी मला आवडू लागली होती आणि मी तिला चिकटून राहिलो होतो, एवढं मात्र खरं.

¤

अन् ढोलबा म्हणत होते तसं मोठं आणि खतरनाक सावज आता माझ्यासमोर होतं: ब्यूसन!

माझ्यासमोर असलेल्या फाइलीमधून मॉंसेयर एमिल ब्यूसनच्या ताज्या पलायनासंबंधी मला अर्थातच काही कळू शकलं नाही. त्यामुळं शेकडो ठिकाणी चौकशा करून, परिश्रमपूर्वक शोध घेऊन त्यातून निष्पन्न होणाऱ्या गोष्टींच्या आधारे ही केस मला सोडवावी लागणार होती. त्याकरता मला महिनोन्‌महिने परिश्रम करावे लागणार होते. ही कामगिरी भलतीच अवघड होती!

पॅरिसमधल्या सॅन्ट तुरुंगात दाखल झाल्याबरोबर लगेचच आपल्याला तिथून सहजी निसटून जाता येईल, याचा ब्यूसनला अंदाज आला होता. कारण पॅरिसमध्ये त्याचे आप्त, नातलग आणि मित्रमंडळी होती. ते लोक त्याला तुरुंगातून पळून जाण्यास मदत करणार होते नि नंतर सुरक्षित आश्रय देणार होते. तेव्हा तुरुंगात दाखल झाल्याच्या पहिल्या तासापासूनच ब्यूसननं वेड्यासारखे चाळे करण्यास सुरुवात केली. जेवणातल्या सूपनं तो चुळा भरू लागला. तुरुंगाच्या कोठडीची जमीन आणि भिंती चाटू लागला. तुरुंगातल्या कोर्टयार्डमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करू लागला.

एक दिवस तर पत्र्याच्या एका डब्यापासून तयार केलेल्या पात्यानं स्वतःला भोसकून घेण्याचा त्यानं प्रयत्न केला. त्याबरोबर लगेच त्याला एका 'स्ट्रेट जॅकेट'मध्ये जखडून ठेवण्यात आलं आणि नंतर विलिज्यू मेंटल हॉस्पिटलमध्ये त्याची रवानगी करण्यात आली. तिथं जाड काचेच्या एका भक्कम कॅबिनमध्ये त्याला बंदिस्त करण्यात आलं आणि त्या कॅबिनवर 'घातकी वेडा' अशी पाटी लटकवण्यात आली.

पण लवकरच ब्यूसन एकदम निवळला, शांत झाला. त्याच्यातली ही सुधारणा पाहून मेंटल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी त्याला ग्लासकॅबिनमधून मोकळा केला. सुधारलेल्या वेड्यांना पाय मोकळे करण्यासाठी–रोज सकाळी हॉस्पिटलच्या आवारात मोकळं सोडण्यात येत असे. ब्यूसनलाही ही मुभा देण्यात आली. ही सवलत ब्यूसनच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाची अशीच ठरली. एक दिवस हॉस्पिटलच्या आवारात फिरताना वेड्याचं सोंग घेतलेल्या आणखी एका ठगाशी त्याची गाठ पडली. कुरळ्या करड्या केसाच्या या तरुण ठगाचं नाव होतं रेने गिरियर. अंडरवर्ल्डमध्ये तो 'रेने द केन' म्हणून ओळखला जात असे. ब्यूसनप्रमाणेच हाही एक कुप्रसिद्ध डाकू होता. तुरुंगात शिक्षा भोगत असताना ब्यूसन-प्रमाणेच मुद्दाम वेडाचार करून तो विलिज्यू मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. ठगाला मिळाला ठग या न्यायानं ब्यूसन आणि गिरियरची चांगली गट्टी जमली आणि–

दोघांनी मिळून तिथून पळून जाण्याचा एक बिनतोड बेत आखला!

एमिलला एक भाऊ होता. त्याचं नाव जीन बाप्तिस्त ब्यूसन असं होतं. अंडरवर्ल्डमध्ये हा 'स्क्रूबॉल' या टोपण नावानं ओळखला जात असे. त्याची एक सोबतीण होती. विलिज्यू मेंटल हॉस्पिटलमध्ये येऊन ही बया एमिलच्या गाठीभेटी घेऊ लागली. आणखी एक बुटका पण विलक्षण ताकदवान इसम एमिलला भेटायला येऊ लागला. त्याचं नाव होतं रॉजर डेक्कर. तीन वर्षांपूर्वी एका तुरुंगात एमिलची या ठगाशी गाठ पडली होती. एमिलच्या भावाची सोबतीण आणि डेक्कर या दोघांनी एमिलला वरचेवर भेटून त्याच्या पलायनाचा आराखडा निश्चित केला. मग एक दिवस डेक्कर एमिलला म्हणाला, "स्क्रूबॉलशी सल्लामसलत करून आम्ही तुझ्या पलायनाचा मार्ग ठरवलाय. लौकरच आम्ही तुला इथनं बाहेर काढू! तो दिवस निश्चित झाला की मी तुला आगाऊ सूचना देईनच!"

व्हिलिज्यू हॉस्पिटलातील ज्या इमारतीत गुन्हेगार मनोरुग्णांना ठेवण्यात येत असे त्या इमारतीभोवती खोल खदक होते. या इमारतीच्या एका बाजूच्या खंदकापलीकडे एक उंच भिंत होती. या भिंतीपलीकडे एक स्टेडियम होतं. याच भिंतीच्या एका हाताला म्युनिसिपल दफनभूमि पण होती. २ सप्टेंबर १९४७ च्या रात्री स्क्रूबॉल आणि डेक्कर या दोघांनी–जवळच चालू असलेल्या एका बांधकामाच्या जागेवरून एक शिडी चोरली. त्या रात्री हेन्री रसॅक नावाचा आणखी एक गुंड त्यांना येऊन मिळाला. एका तुरुंगवासात याचीही एमिलशी दोस्ती झालेली होती.

मध्यरात्रीच्यासुमारास एक आल्फा रोमिओ गाडी त्या स्टेडियमच्या समोर येऊन उभी राहिली. आंद्रे लिओतार्द नावाचा एक चौथा गुंड त्या गाडीच्या स्टिअरिंगशी होता. चोहोकडे विलक्षण सन्नाटा होता. रात्रीच्या त्या नीरव शांततेत त्या आल्फा रोमिओ गाडीतून स्क्रूबॉल, डेक्कर आणि रसॅक हे तिघेजण बाहेर पडले. चोरून आणलेली शिडी त्यांनी स्टेडियमच्या भिंतीला लावली नि ते तिघे त्या भिंतीवर चढले. नंतर ती शिडी त्यांनी ओढून घेतली नि तिच्या साहाय्यानं ते त्या भिंतीपलीकडे उतरले. मधला खदक त्यांनी पार

## दोघांनी मिळून पळून जाण्याचा एक बिनतोड बेत आखला

केला. मग त्याच शिडीचा उपयोग करून पलीकडल्या वेलिव्हयू हॉस्पिटलच्या भिंतीवर ते चढले नि भिंतीपलीकडे उतरले. भिंतीपलीकडे एक खंदक होता. त्या खंदकात त्यानी शिडी लपवली. त्याच खंदकावर आडवा असा एक छोटा पूल होता. या पुलाखाली माजलेल्या गवतात ते तिघे पसरले नि तिथें दडून दिवस उजाडण्याची वाट पाहू लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता ब्यूसन इतर तिघा मनोरुग्णांसमवेत सकाळच्या फेरफटक्यासाठी हॉस्पिटलच्या आवारात आला. दोघा परिचारकांनी हॉस्पिटलच्या इमारतीचं मुख्य द्वार उघडून सर्व मनोरुग्णाना बाहेर काढलं. त्याच वेळी–

डेक्कर आणि रसॅक या दोघानी खंदकाबाहेर उडया मारल्या. त्यांच्या हातात पिस्तुलं होती. आवाराच्या मैदानातून धावत जात त्यांनी त्या दोघा परिचारकाना पिस्तुलाच्या धाकाखाली घेतलं. सुटका करणारे आपले साथीदार आलेले पाहून ब्यूसन त्यांच्या दिशेनं पळत सुटला. डेक्करनं त्याला एक पिस्तुल दिलं आणि तो त्याला म्हणाला, " चल पळ लौकर ! "

हातात पिस्तुल नाचवीत एमिल खंदकाच्या दिशेनं धावत सुटला. त्याच्यापाठी गिरियरही पळत सुटला. इकडे स्क्रूबॉलनं खंदकात लपवलेली शिडी काढून भिंतीला लावून ठेवली होती. हातात पिस्तुल घेऊन तो त्या शिडीपाशी उभा होता.

ब्यूसन आणि गिरियर हे दोघं शिडीवरून त्या भिंतीवर झरझर चढले. त्यांच्यापाठी डेक्कर, रसॅक आणि स्क्रूबॉल हे तिघेही वर आले. पाठची शिडी त्यानी ओढून घेतली अन् मग आदल्या रात्रीप्रमाणेच पण उलटघा क्रमानं ही सर्व गँग स्टेडियमची भिंत ओलांडून स्टेडियममध्ये उतरली. स्टेडियममध्ये त्या वेळी अग्निशामकदलाची सुमारे डझनभर माणसं कवाईत करत होती. एमिल आणि गिरियर हॉस्पिटलमधून निसटल्यामुळं तिथं एकच खळबळ उडाली होती. हॉस्पिटलचे रक्षक धोक्याच्या शिट्ट्या फुंकत होते. त्या शिट्ट्यानी स्टेडियममध्ये कवाईत करणारे अग्निशामकदलाचे लोक एकदम सावध झाले. एमिल आणि त्याच्या साथीदारांना शिडीवरून स्टेडियममध्ये उतरताना त्यानी पाहिलं आणि सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला. एमिल आणि त्याच्या साथीदारांना अडवण्यासाठी ते धावले; पण त्यांच्यावर चार पिस्तुलं रोखली गेल्यामुळं ते तट्कन थावले. एमिल आणि त्याच्या साथीदारानी आपला मोर्चा आता स्टेडियमलगत असलेल्या दफनभूमीकडे वळवला. जीव खाऊन ते त्या रोखाने धावत सुटले. दफनभूमीत दोन मजूर एक कबर खोदत होते. एमिस आणि त्याची गँग पिस्तुल रोखीत आलेली पाहताच त्यानी आपल्या हातातल्या कुदळी फेकून दिल्या आणि हात वर करून ते उभे राहिले. त्यातल्या एकानं दफनभूमीच्या फाटकाकडे निर्देश करत एमिलच्या गँगला बाहेरचा रस्ता दाखवला. त्वरेनं धावत एमिल आणि त्याचे साथीदार त्या फाटकातून बाहेर पडून रस्त्यावर आले.

बाहेर तयारीत असलेल्या लिओतार्दनं आपली आल्फा रोमिओ वेगानं त्यांच्याजवळ नेली. त्याबरोबर एमिल आणि त्याचे साथीदार भराभरा त्या गाडीत चढले. दुसऱ्याच क्षणी जोराचा आवाज करत ती गाडी सुसाट वेगानं विधून पसार झाली !

त्यानतर तासाभरानं पॅरिसमधल्या रु बिशा नावाच्या रस्त्यावरल्या एका इमारतीत ही सर्व गँग जमली. प्रत्येकजण वेगवेगळा आणि थोडचा थोडचा वेळाच्या अंतरानं त्या इमारतीत पोचला होता. इमारतीचे जिने चढून तिसऱ्या मजल्यावरच्या ५७ नं. च्या ब्लॉकपाशी ते सर्व पोचले. तिथं उघडचा दारात डेक्करची रखेली सुझानी फोरी त्याची वाट पाहत उभी होती. तिनं अंगात लो–कट् नाइटगाउन घातलेला होता. त्यामुळं तिच्या पुष्ट वक्षस्थळाचे उठावदार उभार दिसत होते. सस्मित मुद्रेनं तिनं त्या सर्वांचं स्वागत केलं नि त्यांना आत घेतलं.

एमिलनं आपल्या स्वातंत्र्याचा पहिला दिवस आपल्या मित्रमंडळीबरोबर गप्पा मारण्यात नि आपल्या पिस्तुलाची साफसफाई करण्यात घालवला. त्या दिवशी संध्याकाळी मद्याच्या बाटल्या फुटल्या. फेसाळलेल्या मदिरेनं चषक भरले गेले अन् आपल्या यशस्वी पलायनाबद्दल आणि पुन्हा एकत्र आल्याबद्दल त्या सर्वांनी आनंद साजरा केला. ड्रिंकपार्टी झाल्यानंतर एमिल उठला. त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं. पाठीमागे हात बांधून हा बुटका माणूस व्यग्र मुद्रेनं फ्राउंजमध्ये येरझाऱ्या घालू लागला. फेऱ्या मारता मारता मध्येच तो थांबला, आपल्या गँगवरून त्यानं नजर फिरवली आणि त्याच्या तोंडून अखेर शब्द बाहेर पडले,

'चला ! आता परत कामाला लागायचं !'

त्याच्या अधिकारदर्शक स्वरावरून तो त्या गँगचा बॉस होता हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नव्हती.

□

८ सप्टेंबरची संध्याकाळ. इटॉय् विभागातल्या ऑबर्ग डी अर्बाइस या भपकेबाज रेस्टॉरेंटमध्ये एका इसमानं प्रवेश केला. त्यानं पांढरा शर्ट, निळचा रगाचा सिल्कचा टाय आणि गडद निळ्या रंगाचा उंची सूट घातलेला होता. त्याच्या कपडचावरून तो अतिशय श्रीमंत असावा असं वाटत होतं. ज्या रेस्टॉरेंटमध्ये तो आला होता ते त्या विभागातलं सर्वोत्कृष्ट नि महागडं रेस्टॉरेंट होतं. गर्भश्रीमंत नि धनाढ्य लोकच तिथं येत असत.

रेस्टॉरेंटच्या अंतर्भागात गेल्यावर तिथल्या डायनिंगहॉलच्या एका हाताला असलेल्या कोपऱ्यातल्या एका निवात टेबलाशी जाऊन तो इसम स्थानापन्न झाला. खिशातून चष्मा काढून त्यानं आपल्या डोळ्याना लावला आणि टेबलावरल्या मेनूकार्डवरून नजर टाकून त्यानं जेवण आणि मद्य मागावलं.

डायनिंगहॉलमध्ये विखरून असलेल्या टेबलावर कित्येक उच्चभ्रू लोक उंची जेवणाचा आस्वाद घेत होते. हॉलच्या कोपऱ्यातल्या टेबलाशी बसलेल्या इसमाकडे कुणीच विशेष लक्ष दिलं नाही. बिझिनेसट्रिपवर पॅरिसला आलेल्या एखाद्या श्रीमंत वकिलागत तो भासत होता. कोण होता हा माणूस ? नि त्या उंची रेस्टॉरेंटमध्ये कशासाठी आला होता तो ? तो रुबाबदार इसम दुसरा–तिसरा कुणी नसून मॉसियर एमिल ब्यूसन होता! मालदार सावज हेरण्याकरता तो त्या रेस्टॉरेंटमध्ये आला होता. जेवण आटोपल्यावर आपल्याजवळच्या पॅडमध्ये बारीक हस्ताक्षरात तो काही तरी लिहू लागला. तेव्हाही कुणाचं त्याच्याकडे लक्ष गेलं नाही. जाणार तरी कसं ?

आपल्या धंद्यासंबंधीची टिपणं तो घेत असावा असंच कुणालाही वाटलं असतं...

दुसऱ्या दिवशी रात्री दहा वाजता चार माणसं ऑबर्ग डी अर्बाइस या रेस्टॉरेंटमध्ये शिरली. चौघांनी रेनकोटस् आणि हॅटस् घातलेल्या होत्या. त्यांना पाहताच रेस्टॉरेंटचा मॅनेजर त्यांचं स्वागत करण्यासाठी लगबगीनं पुढं झाला; पण–

एकाएकी तो जागीच थबकला. त्या चौघानी आपल्या रेनकोटात हात घालून रिव्हॉल्व्हर्स बाहेर काढली होती!

'स्टॅंड अप्!' डायनिंगहॉलमधल्या लोकांवरून आपली तीक्ष्ण नजर फिरवीत त्यांचा म्होरक्या– एमिल ब्यूसन– गरजला, 'सगळी-जणं उठा नि भिंतीकडे तोंड करून उभी रहा!' त्याच्या हातात एक .३८ पोलिस स्पेशल होतं नि ते त्यानं सर्वांवर रोखलं होतं.

त्या प्रकारानं भयविस्मित झालेले डायनिंगहॉलमधले लोक एक एक करत मुकाट्यानं उठले नि भिंतीकडे तोंड करून एका ओळीत उभे राहिले. गॅंगमधल्या प्रत्येक गुंडाकडे ठराविक काम सोपवलेलं होतं. बाहेर रस्त्यावर असलेल्या मोटारीच्या स्टिअरिंगव्हीलशी डेक्कर बसलेला होता. मोटार कोणत्याही क्षणी दामटता यावी म्हणून मोटारीचं इंजिन त्यानं सुरूच ठेवलेलं होतं. फ्रॅंसिस कॅर्लो नावाचा ब्यूसनचा एक जुना नि विश्वासू मित्र रेस्टॉरेंटच्या प्रवेश-द्वाराशी पहारा देत उभा राहिला. स्क्रूबॉलनं रेस्टॉरेंटच्या भटार-खान्याचा ताबा घेतला होता. रेस्टॉरेंटमधल्या गिऱ्हाइकांना नि इतर कर्मचारीवर्गाला रसॅकनं आपल्या पिस्तुलाच्या धाकाखाली घेतलं होतं. अशा बंदोबस्तात ब्यूसन पुढे झाला. त्याच्या डाव्या हातात रिव्हॉल्व्हर होतं. भिंतीकडे तोंड करून ओळीत उभ्या असलेल्या गिऱ्हाइकांची पाकिटं, अंगठ्या, घड्याळं नि बायकांच्या अंगावरचे मूल्यवान दागिने लंपास करण्यास त्यानं सुरुवात केली. जमवलेला माल तो आपल्या साथीदाराना देऊ लागला लौकरच त्याचे खिसे निरनिराळ्या किंमती जिनसानी टम्म फुगले! ओळीतल्या शेवटल्या सावजाला नागवल्यानंतर आपल्या साथीदाराकडे पाहून ब्यूसन गरजला, 'चला! निघा!'

त्याबरोबर रसॅक दाराकडे धावला. स्क्रूबॉल अगोदरच दारा-बाहेर पळाला होता. दाराशी थांबलेल्या कॅर्लोच्या अंगावरून जाताना रसॅक मूर्खासारखा ओरडला, 'फ्रॅन्सिस! लौकर चल!'

सर्वांच्या पाठीमागून ब्यूसन रेस्टॉरेंटमधून बाहेर पडला. चौघं जण घाईघाईनं मोटारीत शिरले. दुसऱ्याच क्षणी टायर्सचा कर्कश आवाज करीत ती मोटार सुसाट वेगानं धावू लागली आणि पाहता पाहता अदृश्य झाली. ऑबर्ग डी अर्बाइस रेस्टॉरेंटवर धाड घालून ब्यूसनची गॅंग विद्युत्गतीनं पसार झाली होती.

थोड्याच वेळात त्यांची मोटार रू कार्डिन या रस्त्यावर आली. तिथं एक अनपेक्षित अडथळा त्यांच्या मार्गात आला. ट्रॅफिकपोलीसचं एक स्क्वाड रूटिन चेकिंगचा एक भाग म्हणून रस्त्यावरल्या वाहनांची तपासणी करत होतं. तपासणीसाठी लोकानी आपली वाहनं थांबवावीत म्हणून स्क्वाडच्या गाड्या त्या रस्त्यावर मुद्दामच आडव्या-तिडव्या उभ्या केलेल्या होत्या.

पण तो अडथळा पाहून डेक्कर डगमगला नाही. ट्रॅफिकस्क्वाडच्या गाड्यामधून नागमोडी वळणं घेत घेत तुफानी वेगानं त्यानं आपली गाडी पुढं काढली. झंझावाती वेगानं घुसलेली डेक्करची गाडी पाहून ट्रॅफिक स्क्वाडच्या पोलिसांमध्ये एकच खळबळ उडाली. ते चहू दिशांना पांगले. आपलं सारं कौशल्य पणाला लावून ट्रॅफिक स्क्वाडच्या गाड्याच्या चक्रव्यूहातून डेक्करनं आपली गाडी बाहेर काढली आणि भन्नाट वेगानं पुढं दामटली!

त्याच सुमारास पॅरिस पोलिस प्रिफेक्चरचा एक गुप्तपोलिस त्या रस्त्यावर होता. त्यानं तो प्रकार पाहिला मात्र– आपल्या मोटार-सायकलवर टांग मारून वेगानं त्यानं डेक्करच्या गाडीचा पिच्छा पकडला. मोटारीत बसलेल्या ब्यूसनला पाठीमागून मोटारसाय-कलीचा आवाज ऐकू आला. त्यानं मागं वळून पाहिलं तेव्हा पाठलाग करणारा स्पीडपोलीस त्याच्या नजरेस पडला. एक शिवी हासडूनच त्यानं मोटारीची मागची काच एका दणक्यात फोडली आणि पड-लेल्या भगदडामधून– पाठी येणाऱ्या स्पीडपोलिसाच्या दिशेनं– आपलं पिस्तुल रिकामं केलं!

तितक्यात दुसरा एक स्पीडपोलिस मागून आला आणि त्याच्या गाडीचा पाठलाग करू लागला. डेक्करनं आपल्या मोटारीचा वेग वाढवला. त्या पोलिसानंही आपली मोटारसायकल वेगान दामटली. मधलं अंतर झपाट्यानं कमी होऊ लागलं. अचानक डेक्करनं आपल्या मोटारीला करकचून ब्रेक लावला. जोराचा आवाज करत त्याची मोटार थांबली. डेक्कर असं काही करेल याची मागून येणाऱ्या पोलि-साला कल्पना नव्हती. तो एकदम गडबडला. त्यानं मोटारसायकलीचे ब्रेक आवळले; पण त्याचं तिच्यावरील नियंत्रण सुटलं. ती एकदम गरॅकन फिरली नि तिनं उंच उसळी घेतली. तो पोलीस दाणकन् रस्त्यावर आदळला आणि त्याच्या अंगावर त्याची मोटारसायकल कोसळली!

मोटारसायकलीच्या धुडाखालून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असताना त्या पोलिसाला समोरच्या मोटारीतून एक गुंड बाहेर पडलेला दिसला. तो ब्यूसन होता नि त्याच्या हातात मशीनगन होती! दाणदाण पावलं टाकीत ब्यूसन त्या पोलिसाजवळ आला आणि त्याच्यावर मशीनगन रोखून त्यानं तिचा खटका दाबला; पण मशीनगनमधून गोळ्या उडाल्या नाहीत! दातओठ खात ब्यूसननं पुन्हा पुन्हा तिचा खटका दाबला; पण त्याचाही काही उपयोग झाला नाही! अखेर चिडून त्या पोलिसाचा नाद टाकून ब्यूसन आपल्या मोटारीकडे धावला. त्यानं मोटारीत उडी मारली. दुसऱ्याच क्षणी ती मोटार वेगानं पुढं निघाली भीतीनं हादरलेला तो पोलीस गटगटीत डोळ्यानी तो सर्व प्रकार पाहतच राहिला. केवळ नशिबामुळंच तो वाचला होता!

ब्यूसनच्या गॅंगची मोटार आता पोर्ट डी क्लिश विभागाच्या दिशेनं धावत होती. त्याच वेळी पहिल्या स्पीडपोलिसानं जो सुदैवानं जायबंदी झाला नव्हता– तिचा पिच्छा पकडला. डेक्करनं मोटारीचा

**रसॅक मूर्खासारखा ओरडला, 'फ्रॅन्सिस लौकर चल!'**

वेग वाढवला. मागच्या पोलिसानंही आपल्या मोटारसायकलची गती वाढवली. एका जीवघेण्या पाठलागास पुन्हा सुरुवात झाली. मधल अंतर कमी कमी होऊ लागलं. तो स्पीडपोलीस त्या मोटारीच्या बराच जवळ पोचला. अचानक ती मोटार बाजूच्या एका अंधाऱ्या रस्त्यावर वळली नि अदृश्य झाली. त्या स्पीडपोलिसानंही आपली मोटारसायकल त्या रस्त्यावर घातली.

डेक्करनं त्या रस्त्यावर मोटार वळवली खरी; पण काही अंतर जाताच मोटारीच्या हेडलाइटस्च्या प्रकाशात त्याला समोर एक आडवी भिंत दिसली तो रस्ता तिथंच संपला होता ! एक क्षणही वाया न दवडता सुरेख वळण घेऊन डेक्करनं मोटार मागं वळवली. मागून येणारा स्पीडपोलीस बेसावध होता; पण आता काय घडणार याची त्याला क्षणार्धात जाणीव झाली. तोवर डेक्करची मोटार जवळजवळ त्याच्या अंगावर येऊन ठेपली होती. मोटारसायकल सोडून चपळाईनं त्यानं रस्त्याच्या कडेला झेप घेतली. जिवाच्या भीतीनं त्याच्या हातून नकळतच ही प्रतिक्षिप्त क्रिया घडली होती. तो रस्त्यावर आदळत असतानाच त्याच्या मोटारसायकलीचा त्या मोटारीखाली अक्षरशः चुराडा होत असलेला त्याला दिसला ! मोटारसायकल चिरडली गेल्यानं धातू घासटल्याचा जोराचा आवाज झाला.

डेक्करनं मोटार थांबवली अन् वेगानं रिव्हर्समध्ये घेतली. त्या पोलिसाला मोटारीखाली चिरडण्याचा त्याचा बेत होता; पण त्या पोलिसानं वेळीच बाजूला लोळण घेतली म्हणून तो बचावला. दरम्यान स्क्रूवॉल आणि फ्रॉन्सिस कॅली या दोघांनी त्या रस्त्यावर गोळ्यांचा पाऊस पाडला. गोळ्यांच्या आवाजानं ती गल्ली दणाणून गेली. दुसऱ्याच क्षणी त्या मोटारीनं पुढं मुसंडी मारली अन् वेगानंच ती अदृश्य झाली. रस्त्यावर पसरलेला तो पोलीस हळूहळू उठून उभा राहिला. एवढी धुमश्चक्री होऊन अजूनही तो जिवंत होता !

मध्यरात्रीच्या सुमारास त्या पाची दरोडेखोरांनी ती मोटार एका एकाकी रस्त्यावर सोडून दिली आणि रु बुके रस्त्यावर त्यापालो या छोटघाशा बारमध्ये ते एक एक करून जमले. तिथं आरामात बसून मद्य घेत ते वेळ घालवू लागले. त्यांनी दरोडा घातल्यामुळं पोलिसांनी शहरातले प्रमुख रस्ते अडवले होते. पोलीस रस्ते मोकळे करीपर्यंत वाट पाहणं त्यांना जरूर होत. अखेर रात्री दोन वाजता वातावरण निवळल्यावर पायी चालत प्लेस ब्लॅश चौकात ते पोचले. तिथं त्यानी एक टॅक्सी केली नि रु बिशा रस्त्यावरल्या आपल्या नेहमीच्या गुप्त स्थळी ते निघाले.

तिथं पोचल्यावर तिथल्या किचनटेबलाभोवती ते सर्वजण गोळा झाले. प्रत्येकानं आपल्या खिशात जमा केलेली लूट त्या टेबलावर ओतली. पाकिटं ! अंगठ्या ! घड्याळं ! सोन्याचे अलंकार ! टेबलावरल्या प्रत्येक ढिगावरून फिरणारी एमिलची नजर रसॅकसमोर असलेल्या ढिगावर स्थिरावली. त्यातली काही तरी वस्तू गायब होती ! होय नक्कीच ! ऑबर्ग डी अर्वाइस रेस्टॉरॅटमध्ये एका श्रीमंत माणसाच्या हातातली मोठ्या हिऱ्याची एक मूल्यवान अंगठी रसॅकनं शीळ घालत काढून घेतल्याचं त्याला स्पष्ट आठवत होतं; पण ती अंगठी रसॅकसमोर असलेल्या ढिगात आता नव्हती !

एमिल काही बोलला नाही तो सर्व लूट त्यानं एकत्र केली नि शांतपणे तिचे वाटे करण्यास सुरुवात केली.

□

ऑबर्ग डी अर्वाइस रेस्टॉरॅटमधल्या दरोड्याच्या बातमीमुळं एखादा बॉबस्फोट व्हावा त्याप्रमाणं आम्ही हादरलो. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता मी आणि हिंदोनी ढोलबांच्या कॅबिनमध्ये शिरलो. स्थानिक पोलिसांच्या हाती आलेल्या पहिल्या माहितीप्रमाणं दरोडा घालणाऱ्या गँगचा म्होरक्या तीक्ष्ण, काळ्या डोळ्यांचा एक बुटका माणूस होता असं आम्हाला समजलं.

'शंकाच नको !' ढोलबा टेबलावर मूठ आपटत म्हणाले, 'हे ब्यूसनचंच काम ! दरोड्याची पद्धत, त्याचं वर्णन सर्व काही बरोबर जुळतंय. साक्षीदारानी 'फ्रॉन्सिस' नावाचा कुणी तरी गुंड त्याच्या बरोबर असल्याचं जबान्यांमध्ये सांगितलं. ट्रॉय, क्लेअरवॉ किंवा सॅन्ट तुरुंगामधला हा कुणी तरी त्याचा एखादा साथीदार असावा !'

या घटनेला सतरा दिवस होऊन गेले. दरोड्याच्या तपासाच्या कामात काहीच प्रगती झाली नाही. आमची प्रतिस्पर्धी डिटेक्टिव्ह एजन्सी–पॅरिस प्रिफेक्चर पण काही विशेष प्रगती करू शकली नाही. फक्त रेने गिरियर या गुंडाला पकडण्यात त्यांना यश आलं होतं. विलिज्यू मेंटल हॉस्पिटलमधून ब्यूसनबरोबर हाच पसार झाला होता. त्याची पुन्हा सॅन्ट तुरुंगात रवानगी करण्यात आली नि त्याला प्रथम तीन महिन्यांची एकांतवासाची शिक्षा देण्यात आली; पण तो तोंड उघडण्यास तयार नव्हता. ब्यूसनच्या गँगनं, दरोडा घालून निसटल्यानंतर, जिथं जिथं गोळागोळी केली होती तिथं तिथं कसून शोध घेण्यात आला; पण उडालेल्या काडतुसाच्या रिकाम्या टरफलांव्यतिरिक्त तिथं काहीही मिळालं नाही. ती टरफलं तपासणीसाठी पोलिसलॅबोरेटरीमध्ये पाठवण्यात आली. त्यातूनही काही विशेष असं निष्पन्न झालं नाही पद्धतशीरपणे दरोडा घालून मॉसियर एमिल गायब झाला होता. त्याचा काही माग लागू शकला नाही.

एक दिवस सकाळी आमच्या ढोलबांनी आपल्या कॅबिनमध्ये मला बोलावून घेतलं. "बॉनिक्' ते म्हणाले, "तुझ्यासाठी एक महत्त्वाची कामगिरी आहे. तिनं काही काळ तुला ब्यूसनचा विसर पडेल हे बाच ! "

त्यांनी मला एक कागद दिला. पॅरिसपासून ३७ किलोमीटर्स अंतरावर होनोरी इथल्या जेंडरमेरी ब्रिगेडकडून आलेला तो एक संदेश होता. त्यात म्हटलं होतं, "आज दिनांक २६ सप्टेंबर रोजी आन्द्रेसी इथल्या दू-फे जंगलात एका इसमाचं प्रेत आढळलं आहे. ओळख अजून पटू शकलेली नाही !"

तिकडे जाऊन मी एक नजर टाकून यावं असं ढोलबांचं म्हणणं होतं.

हिंदोनीला या कामाबद्दल मी थोडक्यात कल्पना दिली आणि एका फोटोग्राफरला बरोबर घेऊन 'सुरेट'च्या एका गाडीतून आम्ही लगोलग तिथे निघालो. आन्द्रेसीमधल्या त्या विवक्षित स्थळी आम्ही पोचलो. जंगलात आडबाजूला असलेल्या एका खळग्यात ते प्रेत उताण्या अवस्थेत पडलेलं होतं. डोळे विस्फारलेले होते. एक पापणी कीटकांनी अर्धवट खाऊन टाकली होती. त्या मृत इसमाच्या

अंगावर पांढरा शर्ट, लाल-निळ्या रंगाच्या पट्टयापट्टयांचा टाय अन् उत्तम तऱ्हेनं शिवलेला निळ्या रंगाचा सूट होता.

हिदोनीनं त्या मृतदेहाची प्राथमिक तपासणी केली आणि बाजूला पच्कन थुंकत तो म्हणाला, "कुणी तरी याच्या डोक्याच्या मागे गोळी घातलीय. कोणत्या तरी गँगमधला खुनाचा प्रकार दिसतो!"

आमच्याबरोबर आलेल्या फोटोग्राफरनं मृत इसमाच्या डोक्याच्या मागच्या भागाचा अगदी जवळून फोटो घेतला. नंतर त्या जागेची मापं घेऊन ती आपल्या नोटबुकात टिपून घेण्यात तो दंग झाला. मग अतिशय काळजीपूर्वक त्यानं त्या मृत इसमाच्या हाताच्या बोटांचे ठसे एका कागदावर घेतले.

त्यानंतर थोडया वेळानं तिथून जवळ असलेल्या एका रेस्टॉरंट-मध्ये आम्ही जेवण घेत होतो. तेव्हा 'जेंडरमेरीचा' एक माणूस तिथं आला. आपल्या खिशातून त्यानं एक पाकिट काढलं नि ते टेबलावर उलटं केलं. त्यातून एक पितळी बुलेट घरंगळत बाहेर पडली. "ही त्या मृत माणसाच्या डोक्यात सापडली!" त्यानं आम्हाला सांगितलं, "गोळी अगदी जवळून झाडली गेली असली पाहिजे असं मेडिकल एक्झामिनरचं मत आहे. गोळी खालच्या बाजूनं झाडली गेलीय् त्या अर्थी खुनी या इसमापेक्षा खूपच बुटका असावा!"

दुसऱ्या दिवशी सकाळी अगदी लौकर मी पॅलेस डी जस्टिस-मधल्या क्रिमिनल आयडेंटिफिकेशन ब्यूरोच्या ऑफिसात गेलो. इथल्या फायलीमध्ये चार लाखांहून अधिक गुन्हेगाराच्या बोटांचे ठसे साठवलेले आहेत. पाढऱ्या ओव्हरॉलमधल्या तिथल्या अधिकाऱ्या-जवळ मी माझ्याजवळचे बोटांचे ठसे असलेले कागद दिले. आपल्या भिंगानं त्यानं त्या ठशांच्या सूक्ष्म रेषांचं निरीक्षण केलं. प्रत्येक कागदावर काही आकडे लिहिले. नंतर चाकं असलेल्या शिडीवरून तिथल्या रेकॉर्डमध्ये त्यानं शोध घेतला. थोडया वेळानंतर एक फाइल काढून मला दाखवीत तो म्हणाला, "हा पट्ठा सापडला! नाव हेन्री रसॅक, जन्म ५ डिसेंबर १९०५ रोजी शॅरेंटनमध्ये. पुष्कळ आरोप आहेत! सॅन्ट तुरुंगातून नुकतीच याची सुटका झाली. तिथल्या फाइलमध्ये तुम्हाला त्याचा फोटो मिळेल!"

मी सॅन्ट तुरुंगाला फोन केला. तिथल्या रेकार्डस्क्लार्कनं त्याच्या फायली चाळून मला सांगितलं, "इथं त्याच्याविषयी विशेष माहिती नाही. मी तुम्हाला फक्त इतकंच सांगू शकतो की, २५१ नंबरच्या कोठडीत तो एप्रिल ब्यूसनबरोबर होता!"

"ब्यूसन?" तल्लख होत मी विचारलं.

"होय. विलिज्यू मेंटल हॉस्पिटलमधून जो नुकताच पळालाय तो!"

मी घाईघाईनं रु डी सॉस्सा रस्त्यावरच्या माझ्या ऑफिसमध्ये परतलो. तोवर हिदोनीनं रसॅकचा पोलिसफोटोग्राफ मिळवून ठेवला होता. मग एका गाडीन मी विलिज्यू मेंटल हॉस्पिटलवर गेलो. तिथं ब्यूसन ज्या दिवशी निसटला त्या दिवशी ड्यूटीवर असलेल्या दोघा रक्षकांना आणि एका परिचारिकेला मी रसॅकचा फोटो दाखवला. ब्यूसनला पळून जाण्यासाठी मदत करणाऱ्या इसमांमध्ये हा इसमही होता असं रसॅकचा फोटो पाहिल्यानंतर त्या तिघानी मला शपथेवर सांगितलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी बॅलिस्टिकस लेबॉरेटरीमध्ये गेलो. "तुम्ही आणून दिलेली बुलेट एका '३८' पोलिसस्पेशलमधून झाडली गेलीय. ऑबर्ग डी अर्बाइसच्या दरोडयाच्या वेळी झालेल्या गोळागोळीत सापडलेली रिकामी काडतुसं या गोष्टीशी जुळतात त्या अर्थी एकाच पिस्तुलानं या गोळया झाडल्या गेल्या असाव्यात हे स्पष्ट होतं!" तिथल्या ड्यूटीऑफिसरनं मला सांगितलं.

पॅरिस प्रिफेक्चरच्या तुलनेत मी एक पाऊल पुढं आघाडी मारली होती. आता अंडरवर्ल्डमधल्या माझ्या दोस्तांना भेटणं जरुरीच होतं.

दुपारी दोननंतर रु ब्लाड रस्त्यावर मला नेहमी भेटणाऱ्या एका पोरीची मी गाठ घेतली. तिचं नाव मॅगी होतं. ती दिसायला अतिशय सुंदर नि मादक होती. जवळच्या एका हॉटेलात शिरून आम्ही ब्रँडी मागवली. मद्याचे चषक आल्यावर आम्ही ते ओठाना लावले. जराशानं मी तिला म्हणालो, "हे बघ! मी अशा एखाद्या व्यक्तीच्या शोधात आहे, जी मला हेन्री रसॅक नावाच्या एका माणसाबद्दल काही माहिती देऊ शकेल. त्याचा खून झालाय!"

हे ऐकताच मॅगी खुर्चीत एकदम ताठ झाली. तिच्या चेहऱ्याचा रंग उडाला. "हेन्रीशी संबंध असलेली एक मुलगी मला ठाऊक आहे. गेल्या कित्येक आठवडयात मी त्याला पाहिलेला नाही; पण मी असं ऐकलं की दोघा गुन्हेगारांना मेंटल हॉस्पिटलमधून पळून जाण्यास त्यानं मदत केली. नंतर एका रेस्टॉरंटमध्ये दरोडा घालून त्यानं गोळागोळी केली असंही मला समजलं."

"हे सर्व तुला कुणी सांगितलं?"

"माझ्या एका मैत्रिणीनं. आपल्या घरी चौघा इसमाना आपण आश्रय दिला आहे असं तिनं मला सांगितलं. त्यातले दोघं भाऊ भाऊ असून पोलीस त्यांच्या मागावर आहेत असं ती म्हणाली. तिसरा तुरुंगातून फरारी झालेला तिचा एक बॉयफ्रेंड आहे आणि चौथा हा हेन्री होता!"

"तुझ्या त्या मैत्रिणीचं नाव काय?"

"सूझी...सुझानी फोरां!"

व्हाइस स्क्वाडच्या फायलीमध्ये शोध घेतल्यानंतर मला सुझानी फोरांचा पत्ता सापडला: ५७ रु बिशां. पॅरिस.

मी लगोलग त्या विभागात गेलो; पण तिथल्या दाट वस्ती असलेल्या इमारती आणि सभोवतालचे बकाल वातावरण पाहून तिथं एकटं फिरणं धोक्याचं आहे हे माझ्या लक्षात आलं.

ऑफिसवर परतून हाती आलेल्या सर्व माहितीचा साद्यंत रिपोर्ट मी आमच्या चीफना– ढोलबाना– ऐकवला. माझं निवेदन ऐकल्यावर स्वारी भलती खूष झाली. 'वॉनिक!' ते उत्साहानं मला म्हणाले, 'उद्या तू, मी आणि हिदोनी असे आपण तिघं तिथं जाऊ. ती जागा खणून काढण्याकरता तुला जरूर त्या सर्व गोष्टींची व्यवस्था उद्या होईल! या खेपेस त्या लुच्चाला आपण पकडूच! आता तो आपल्या

**या खेपेस त्या लुच्चाला आपण पकडूच!**

झातून सुटत नाही!'

पण दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्र वाचल्यानंतर आमचं 'प्यादं' पटावर माघारी आल्याचं माझ्या ध्यानात आलं. व्यूसनच्या भावाचा स्कूबॉलचा– निष्काळजीपणा आम्हाला अप्रत्यक्षपणे नडला होता. प्रकार असा झाला होता की आदल्या रात्री स्कूबॉल आपल्या फ्लॅटवर गेला होता. त्याच्या फ्लॅटवर पॅरिस प्रिफेक्चरच्या डिटेक्टिव्हाची पाळत होती. काही वेळानं तर आपल्या फ्लॅटमधून जेव्हा तो बाहेर पडला तेव्हा 'प्रिफेक्चरच्या' एका गुप्तहेरानं त्याचा पाठलाग केला. स्कूबॉलनं त्याला थेट र बिर्शा रस्त्यावरल्या आपल्या गुप्त स्थळापर्यंत नेलं. त्यानतर काही मिनिटांतच सशस्त्र पोलिसांनी खचाखच भरलेली एक व्हॅन ५७, र बिर्शा या ठिकाणी येऊन थडकली.

तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या सुझानी फोरानं आपल्या ब्लॉकची दर्शनी खिडकी उघडली तेव्हा खाली रस्त्यावर पोलिसांच्या बॅटऱ्यांचे प्रखर प्रकाशझोत इकडून तिकडे फिरताना दिसले. तत्क्षणी तिला धोक्याची जाणीव झाली आणि आपल्या घरात दडलेल्या तिघा 'पाहुण्या' कडे वळून घाबरलेल्या स्वरात ती ओरडली,

'इथनं तावडतोब पळा. लौकर! खाली पोलीस आलेत!'

ते ऐकताच स्कूबॉल आणि डेक्कर दाराकडे धावले; पण एव्हाना पोलिसांची पावलं दडदड जिने चढून वर येत होती! एमिल पाठच्या खोलीच्या खिडकीकडे धावला. एका झटक्यातच त्यानं ती उघडली आणि एक पाय बाहेर टाकून तो खिडकीवर चढला. काय करावं या विवंचनेनं तो क्षणभर घुटमळला. अचानक त्याच्या दृष्टीस मागच्या इमारतीचं छत पडलं. तो बसला होता त्या खिडकीपासून खाली सुमारे बारा फुटावर ते छत होतं. त्या छताच्या कडेकडेनं धावणारी– पावसाचं पाणी वाहून नेणारी जाड पन्हाळ– त्याच्या नजरेस पडली. आणि त्याचे डोळे चमकले, त्याच वेळी ब्लॉकच्या पुढल्या दारावर दोन दणदणीत थापा पडलेल्या त्याला ऐकू आल्या.

'पोलीस! लौकर दार उघडा!' मागून तीक्ष्ण स्वरात शब्द आले.

मागचापुढचा काहीएक विचार न करता खालच्या इमारतीच्या छपराच्या दिशेनं एमिलनं झेप टाकली. त्याची उडी अचूक पडली आणि त्याच्या बोटांना छपराच्या कडेला असलेली पन्हाळ लागली. पन्हाळीची कड घट्ट पकडून काही क्षण तो लोंबकळत राहिला. सुझानीच्या ब्लॉकमधून त्याला आता आरडाओरडा ऐकू येऊ लागला. नंतर झटापटीचे आवाज. ५७ नंबरच्या फ्लॅटमध्ये दणादण्णीस सुरुवात झाली होती. स्कूबॉल आणि डेक्कर पोलिसांशी झगडत असणार! छताला लोंबकळणाऱ्या एमिलच्या मनात आलं. सारी ताकद पणाला लावून इंचाइंचानं तो आपलं शरीर वर उचलू लागला. अखेरीस त्या छतावर चढण्यात त्याला यश आलं. त्या उतरत्या छपरांवरून चालत– छतावरल्या मोठ्या धुराड्याशी– तो पोचला नि त्याच्या आड दुबकला. सुझानीच्या फ्लॅटमधून– अंधारातून आरडाओरड्याचे आवाज त्याला अजूनही ऐकू येत होते...

प्रिफेक्चरच्या पोलिसांनी रात्रभर त्या भागात एमिलचा कसून शोध घेतला. ज्या इमारतीत सुझानीचा फ्लॅट होता त्या इमारतीमधली प्रत्येक खोली नि कानाकोपरा त्यांनी धुंडाळला. थोड्याशा धुमश्चक्रीनंतर स्कूबॉल आणि डेक्कर हे दोघे गुंड त्यांच्या हाती लागले होते; पण मॉसियर एमिल मात्र त्यांच्या हातावर तुरी देऊन नाहीसा झाला होता ...

काहीही असो पण या गोंधळामुळं माझ्या हातातोंडाशी आलेलं सावज निसटलं होतं एवढं मात्र खरं. या प्रकारानं आमचे ढोलबा जाम चिडले!

'छान हं! बॉनिक, छान!' खोचक स्वरात ते मला म्हणाले, 'झकास काम केलस तू! अशा तऱ्हेनं जर तुझी प्रगती चालू राहिली तर तुला चीफ डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर बनायला खरोखरच फार वेळ लागणार नाही. छान! चालू दे तुझे प्रयत्न असेच!'

आता मात्र ढोलबाचा मला राग आला. व्यूसनला पकडण्यासाठी मी पराकाष्ठेचे प्रयत्न करीत होतो, त्याच या प्राण्याला काहीच नव्हतं. 'हे बघा चीफ!' रागावून मी म्हणालो, 'प्रिफक्चरच्या वीस माणसांनी त्या जागेवर अचानक धाड घातली. त्या विभागातल्या म्युनिसिपल पोलिसांनाही त्यांनी या गोष्टीचा सुगावा लागू दिला नाही, यात माझा काय दोष? मी एकटा काय करणार होतो? अन् प्रिफक्चरचे इतके लोक तिथं जाऊनही व्यूसन त्यांच्या तावडीतून निसटला! त्याच्या अपयशाचं खापर माझ्या डोक्यावर का फोडता?'

'तेही खरं आहे.' थोड्या नरमाईच्या सुरात ढोलबा म्हणाले, 'पण आता आपण पुढं काय करायचं?'

'मी आता 'पॅलेस डो जस्टिस' इथं जाईन म्हणतो. तिथल्या मॅजिस्ट्रेटच्या परवानगीनं डेक्कर आणि स्कूबॉल याच्या उलटतपासण्या घेण्याचा माझा विचार आहे. त्यातुन काही निष्पन्न होतं का ते पाहू!' मी बोललो.

'ठीक! तुला जे योग्य वाटेल ते कर!' ढोलबा म्हणाले.

¤

दुपारी पावणेचारच्या सुमारास– मॅजिस्ट्रेटच्या परवानगीनं मी सॅन्ट तुरुंगात प्रवेश केला. या ठिकाणी मी वारंवार जात असे आणि दरखेपी, तुरुंगाच्या आतल्या कोटयार्डकडे नेणाऱ्या दगडी पायऱ्या चढून जात असताना, एक प्रकारची विलक्षण थरारक संवेदना मला जाणवत असे. इथं, या ठिकाणीच, पहाटेची रात्राडी छटा फुटण्यापूर्वी मृत्युदंड मिळालेल्या गुन्हेगाराची शिरं गिलोटीनखाली धडावेगळी केली जात असत! एका शिक्षेच्या वेळी फक्त एकदाच मी तिथं हजर राहिलो होतो. खुनाच्या आरोपाखाली मी पकडलेल्या एका तरुण जिप्सी गुंडाला तिथं गिलोटीनखाली देण्यात आलं होतं. गिलोटीनचं पातं सरदिशी खाली आलं होतं आणि रक्ताच्या सड्यात त्या गुंडाचं मस्तक धडावेगळं झालं होतं. मस्तक छाटण्याचा तो प्रकार इतका भयंकर असेल अशी माझी कल्पना नव्हती. त्यानंतर पुन्हा कधीही तो भयंकर प्रकार मी पाहिला नाही. कधीच नाही!

एकांतवासाच्या कोठडीतून, मी बसलो होतो त्या खोलीत, डेक्करला आणण्यात आलं. उंचीनं तो बुटकाच पण अतिशय बळकट होता. मारहाणीमुळं त्याचा चेहरा भलताच सुजलेला दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर बारीकसारीक जखमाही दिसत होत्या. प्रिफेक्चरच्या पोलिसांनी त्याला चांगलाच बुकलून काढलेला दिसत होता.

'डेक्कर! मी त्याला म्हणालो, 'मी प्रिफक्चरचा डिटेक्टिव्ह नाही त्यामुळं ऑबर्ग डो अर्बाईसमधल्या दरोड्याबद्दल मला काही

स्वारस्य नाही. त्यापेक्षाही एका गंभीर प्रकरणाच्या संदर्भात मी तुला भेटायला आलोय!'

त्यानं काही क्षण माझ्याकडे स्थिर नजरेनं पाहिलं. नंतर त्याच्या मुद्रेवर कुत्सित स्मित पसरलं. मी माझी ब्रीफकेस उघडली आणि तिच्यातून रसॅकच्या फोटोच्या प्रिंटस् काढल्या. अगदी सावकाशपणे त्यातला एकएक फोटो मी समोरच्या टेबलावर मांडू लागलो : गोळीनं रसॅकच्या डोक्यामागे झालेली जखम, गवतात पसरलेलं त्याच प्रेत, विस्फारलेले त्याचे डोळे, वेदनेनं वाकडंतिकडं झालेलं त्याचं तोंड.

ते फोटो पाहून डेक्कर काहीच बोलला नाही.

'हा तुझा दोस्त होता?' मी त्याला विचारलं.

काही न बोलता त्यानं मान दुसरीकडे वळवली.

'हे बघ डेक्कर! माझ्या हाती आलेल्या माहितीप्रमाणं या खुनाचा आरोप तुझ्या माथ्यावर मारला जाणार आहे.' मी म्हणालो.

'माझ्यावर?' डेक्कर एकदम ओरडला, 'तू खोटं बोलतोयस.'

'राहिलं!' मी बोललो, 'पण तुझ्यामुळं सुझानीही यात ओढली जाणार आहे हे लक्षात ठेव—

डेक्कर एकदम गर्रकन् वळला.

'सुझानी?' चमकून त्यानं विचारलं, 'तिचा काय संबंध?'

'होय! यातून तुझी सुटका नाही की तिचीही नाही! तिनं मला जे काही सांगितलन् तेच तिला कोर्टापुढंही सांगावं लागेल! ज्या ३८ पोलीस स्पेशलनं रसॅकचा खून झाला ते तुझं होतं असं तिनं मला सांगितलंय्. जोपर्यन्त नेमका प्रकार काय घडला हे तू मला सांगणार नाहीस, या कामात मला मदत करणार नाहीस तोपर्यन्त तुम्हा दोघांचंही जीवित धोक्यात आहे. तेव्हा आता काय ते तुझं तू ठरव!'

डेक्करची नजर एकदम खाली गेली. काही वेळ तो विचारमग्न झाला. अखेर त्यानं वर पाहिलं. नैराश्यपूर्ण स्वरात तो म्हणाला, 'ठीक आहे. सांगतो सारं काही. रसॅकला आपल्या गॅंगमध्ये ठेवणं एमिलला जड जाऊ लागलं होतं. तो चांगला तरणाबाड, उंच नि देखणा होता. सर्वच बाबतीत एमिलच्या उलट होता तो. ऑबर्ग डी अर्वाइसमध्ये दरोडा घालून पळून जाताना 'फ्रॅंकीइस' या नावाचा त्यानं मूर्खासारखा गौप्यस्फोट केला. गॅंगच्या दृष्टीनं घातकच गोष्ट होती ती. त्या रात्रीच्या दरोड्यातल्या लुटीतून हिऱ्याची एक मौल्यवान अंगठी त्यानं स्वतःपाशी ठेवून घेतल्याचा संशय एमिलला आला होता. ही त्याची सर्वांत मोठी आगळीक होती!

'२१ सप्टेंबरच्या रात्री एक फायदेशीर डल्ला मारायला जायचंय असं एमिलनं मला आणि रसॅकला सांगितलं. आन्द्रेसी इथल्या एका संग्रहालयातून वीस लक्ष किमतीची दुर्मिळ पेंटिंग्ज पळवण्याची ती कामगिरी होती. चोरलेल्या एका मोटारीतून आम्ही तिघं आन्द्रेसीकडे निघालो. दू फे इथल्या जंगलात आम्ही मोटार थांबवली आणि बाहेर पडलो. जंगलातल्या गवताळ जमिनीवरून आम्ही चालू लागलो. वाटेत एका ठिकाणी पॅंटची बटणं उघडत एमिल एका झाडासमोर उभा राहिला. रसॅकनंही तसंच केलं; पण तो एक सापळा होता. अचानक एमिलनं रसॅकच्या पाठीमागं उडी मारली. त्याच्या हातात त्याचं पिस्तुल आलं आणि रसॅकच्या डोक्यात त्यानं गोळी घातली. क्षणार्धात हा प्रकार घडून गेला!'

'मी काही स्वतःची बाजू मांडत नाहीये.' डेक्कर पुढे म्हणाला; 'पण या घटनेनं मला मोठा धक्का बसला. एमिल खुनी आहे हे मला ठाऊक होतं. पण बिलिज्यू हॉस्पिटलमधून पळून जाण्यासाठी मदत करणाऱ्या आपल्या एका मित्राचा अशा तऱ्हेनं विश्वासघातानं तो खून करील असं मला वाटलं नाही.'

'आता एक शेवटचा प्रश्न रॉजर!' मी त्याला म्हणालो, 'मग मी तुला त्रास देणार नाही. हा फ्रान्सिस कोण ते मला सांग!'

डेक्करनं खांदे उडवले आणि पुढं काही सांगण्यास नकार दिला. डेक्करचा कबुलीजबाब मी लिहून काढला होता. त्याच्या सहीसाठी मी माझं पेन आणि तो कागद त्याच्या पुढं केला. तो कागद न वाचतांच त्यानं त्यावर सही केली.

रसॅकच्या खुनाचं गूढ तर उलगडलं; पण दोघां प्रमुख गुंडाचं कोडं कायम होतं. व्यूसन आणि तो रहस्यमय फ्रान्सिस. हा फ्रान्सिसच मला व्यूसनचा माग देऊ शकेल अशी माझी खात्री होती; पण त्यासाठी हा फ्रान्सिस कोण हे प्रथम हुडकून काढणं जरुरीचं होतं.

□

रु बिर्शां इथून प्रिफेक्चरच्या पोलिसांना चकवून निसटल्यानंतर एमिल स्वस्थ बसला नाही. त्यानं पुन्हा एक नवीन गॅंग आपल्या भोवती जमवली आणि लुटालुटीस सुरुवात केली. त्याला पकडण्यासाठी मोठं जाळं लावण्यात आलं होतं; पण तरीही तो कधी पोलिसांच्या हाती सापडू शकला नाही. एखाद्या मायावी राक्षसाप्रमाणं तो अदृश्य होत असे; पण मला त्याला शोधून काढायचं होतं.

रु बिर्शां या एमिलच्या अड्ड्यापासूनच मी त्याच्या शोधास पुन्हा सुरुवात केली. तिथं एमिलचा अजूनही एक अस्पष्ट भाग तरळत होता. ५७ रु बीर्शां जवळच बार चालवणाऱ्या एका बाईनं मला एक महत्त्वाचा धागा दिला. सुझानी फोरॉनं कुणा तरी डेडे क्वार्टरॉन नावाच्या एका माणसाला फोन केल्याचं आपण ऐकलं असं या बाईनं मला सांगितलं.

पोलीसरेकॉर्डमध्ये या इसमाची ठराविक ठशाची माहिती होती : आन्द्रे क्वार्टरॉन. हा डेडे ल स्टिफनॉय् या नावानंही ओळखला जातो. जन्म २४ जून १९०१ सेंट इटाइन इथं. याच्याविरुद्ध सबळ असे पुरावे नाहीत. गॅंगस्टर म्हणून युद्धपूर्वकाळात त्यानं चिकार पैसा गोळा केला नि नंतर तो या धंद्यातून निवृत्त झाला.

त्या फायलीत असलेल्या त्याच्या पत्त्याचा जेव्हा मी शोध घेतला तेव्हा मला असं दिसून आलं की, ते घर त्याचं नसून त्याच्या एका रखेलीचं आहे. पॅरिसच्या पूर्वेस बॅगनो विभागात हे छोटं घर होतं. त्या घरावर मी पाळत ठेवली. कधी आंधळ्याचं सोंग घेऊन, तर कधी गॅस कंपनीचा अटेंडंट म्हणून तर कधी रंगाऱ्याचा वेष घेऊन त्या घरावर मी नजर ठेवून बसलो. दिवसामागून दिवस गेले. माझा तो उद्योग पाहून ढोलबा मला म्हणाले, 'तू चुकीचा माग धरून निष्कारणच आपला वेळ आणि श्रम वाया घालवतो आहेस बॉनिक्! या नसत्या उपद्व्यापापायी आपल्या कामात तू मागं पडत चाललायस. तू काही तरी शिस्तबद्ध योजना का आखत नाहीस?'

ढोलबाच्या या वक्तव्यामुळं त्या घरावर मी रात्रीची पाळत ठेवू लागलो. ढोलबांना या गोष्टीचा अर्थातच मी काही सुगावा

लागू दिला नाही. अखेर माझ्या दीर्घ चिकाटीचा उपयोग झाला. डेडेनं एक दिवस त्या घराला भेट दिली. तो जेव्हा तिथून परत निघाला तेव्हा त्याचा पाठलाग करण्यास मी सुरुवात केली; पण हाय रे दैवा ! एका ठिकाणी रहदारीच्या गदारोळात तो माझ्या हातून निसटला. या घटनेनंतर काही दिवस उलटले. एक दिवस एका कॅफेमध्ये माझा एक खबऱ्या मला भेटला. डेडे नुकताच हृदयविकारानं मरण पावल्याचं त्यानं मला सांगितलं. पुन्हा एकदा माझ्या हाती येत असलेला धागा सुटला !

पण मी धीर सोडला नाही. दुसऱ्याच दिवशी डेडेचा अंत्यसंस्कार असल्याचं मला माझ्या खबऱ्याकडून समजलं होतं. म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी मी इरी–सू–सी दफनभूमीत गेलो. तिथं थडग्यांच्या दगडांआड दडून डेडेचा अंत्यविधी मी पाहू लागलो. अंत्यविधीसाठी बरेच शोकग्रस्त लोक जमले होते. त्यापैकी पहिल्या ओळीत एक आडदांड माणूस रुमालात तोंड खुपसून रडत होता. या ढोल्यानं माझं लक्ष वेधून घेतलं.

डेडेचा अंत्यविधी पार पडल्यानंतर जमलेले लोक परतू लागले. काही तरी अनामिक संवेदनेमुळं, रुमालात तोंड खुपसून रडणाऱ्या त्या ढोल्याच्या मोटारीचा मी पिच्छा पकडला. पोर्त द सेंट क्लॉद विभागातून आम्ही जाऊ लागलो. शेवटी रु डी पॅरिस रस्त्यावरल्या एका भव्य इमारतीसमोर तो थांबला. मोटारीतून उतरून त्या इमारतीत शिरत तो अदृश्य झाला.

त्या दिवशी दुपारी हिदोनीबरोबर त्या इमारतीला मी भेट दिली. त्या इमारतीतल्या रहिवाशांजवळ चौकशी केल्यानंतर त्या ढोल्याचं नाव अँटनी बोर्गो असल्याचं आम्हाला समजलं. आपली बायको नि एक मुलगी यांच्यासह त्या इमारतीतल्या एका फ्लॅटमध्ये तो राहत होता. त्या इमारतीमध्येच एक ड्रायक्लीनिंगचं दुकान होतं. त्या दुकानातल्या धोब्याची आम्ही गाठ घेतली. इमारतीतल्या सर्वच रहिवाशांबरोबर त्याचा संबंध येत असल्यानं त्याच्याकडून जास्त माहिती मिळू शकेल अशी आमची अटकळ होती आणि ती खरी ठरली. बोर्गोच्या घरी त्याच्या बायको आणि मुलीव्यतिरिक्त आणखी कुणी राहतं का अशी त्या धोब्याजवळ आम्ही चौकशी केली तेव्हा त्यानं सांगितलं, ' हो. काही दिवसांपासून त्यांच्याकडे एक पाहुणा रहायला आलाय खरा; पण तो फारसा घराबाहेर पडत नाही. '

' त्याचं वर्णन सांग पाहू ! '

' अं. तसा बुटकोजीच आहे तो. राहतो मात्र रुबाबात ! त्याचे कपडेबिपडे टापटीप असतात. त्याचं एक वैशिष्टच म्हणजे त्याचे डोळे काळेभोर आहेत. नजर भेदक आहे. गडद रंगाच्या कपड्यांचं वेड दिसतंय स्वारीला. कारण नेहमी निळ्या–काळ्या सुटात तो वावरतो. ' त्या बडबड्या धोब्यानं आम्हाला माहिती पुरवली.

आम्ही एकदम तल्लख झालो. हे आमचंच सावज ! त्याचंच वर्णन हे ! शंकाच नको ! एमिल ब्यूसन !

फोनवरून ही बातमी ढोलबांच्या कानांवर घातली. त्यासरशी




उत्तेजित होत ते ओरडले, 'सापडला हरामखोर! त्याला सोडू नका. बॉनिक! छान काम केलंस! त्याला कल्पना येऊ न देता रस्त्यावर त्याच्यावर अचानक तुटून पड आणि त्याला धर; पण जपून! त्याला पिस्तुल काढायची संधी मिळाली तर मोठं हत्याकांडच होईल!'

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या इमारतीवर पाळत ठेवायची आणि एमिल त्या इमारतीतून बाहेर पडला की त्याला अचानक पकडायचा असा आम्ही बेत केला.

पण हे यश आमच्या नशिबात नव्हतं. इथेही प्रिफेक्चरचा एक डिटेक्टिव्ह मध्ये अडमडला आणि आमच्या हातातोंडाशी आलेला आलेला घास त्यानं हिरावून नेला! *अजाणतेपणी का होईना*; पण या अतिउत्साही डिटेक्टिव्हनं शेवटी नको तो पचका केलाच! त्याचं असं झालं: ज्या दिवशी सकाळी आम्ही एमिलला पकडायचा बेत केला होता त्याच दिवशी म्हणजे ३ फेब्रुवारी १९४८ रोजी प्रिफेक्चरचा हा तरुण डिटेक्टिव्ह रु डी पॅरिस रस्त्यावरल्या त्याच टोलेजंग इमारतीत शिरला. एका तरुण मुलीच्या खुनाचा तपास घेत होता हा प्राणी! मार्ली कॅनॉलमध्ये तिचा मृतदेह मिळाला होता. योगायोगाची गोष्ट म्हणजे मृत मुलगी बोर्गोच्या मुलीची मैत्रीण होती. बोर्गो कुटुंबियाबरोबर ती मुलगी एका डान्सपार्टीत पाहिली गेली होती. म्हणून बोर्गो कुटुंबाकडे तिच्यासंबंधी चौकशी करण्याकरता हा डिटेक्टिव्ह त्या इमारतीत पोचला होता. 'बोर्गो कुठे राहतात?' त्यानं तिथं चौकशी केली. पत्ता कळल्यावर तो या ब्लॉकपाशी गेला नि त्यानं दार ठोठावलं.

थोड्या वेळानं दार उघडलं गेलं. दारात एक रूपवान नि टंच तरुणी उभी होती. तिनं झिरझिरीत कापडाचा रॅप अंगाभोवती गुडाळला होता. त्यातून तिच्या शरीराची घाटदार वळणं आणि तिची पुष्ट वक्षःस्थळ दिसत होती.

'तुम्हाला त्रास दिल्याबद्दल माफ करा!' उघड्या दारातून आत शिरत तो डिटेक्टिव्ह त्या तरुणीला म्हणाला. सहजच त्याची नजर, मधल्या एका उघड्या दारातून, आतल्या खोलीत गेली. तिथे पलंगावर चादरीखाली कुणी तरी दडलं आहे असं त्याला दिसलं. तो डिटेक्टिव्ह त्या खोलीत गेला. त्यानं चादर दूर केली तेव्हा तिच्याखालून एक माणूस बाहेर पडला. अंडरपॅंटव्यतिरिक्त त्या माणसाच्या अंगावर काहीही नव्हत. ते पाहून तो डिटेक्टिव्ह त्याला म्हणाला,

'चल ऊठ! कपडे घाल आणि इथून चालता हो! तुझ्या गर्लफ्रेंडबरोबर मला काही महत्त्वाचं बोलायचंय!'

'होय साहेब!' पलंगावरून टुणकन उडी मारून काळ्या डोळ्याचा तो बुटका माणूस म्हणाला. अतिशय झरझर त्यानं कपडे चढवले नि तो दाराकडे निघाला.

'तुझं इथं काही राहिलं नाही ना?' त्या डिटेक्टिव्हनं करड्या स्वरात त्याला विचारलं.

'नाही साहेब!' तो माणूस म्हणाला नि घाईघाईनं दाराबाहेर सटकला!

घरात कुणी नसल्यानं त्या तरुण पोरीनं आपल्या त्या याराला आपल्याकडे बोलावलं असावं आणि त्याच्याबरोबर बेडरूममध्ये ती प्रणयाचे रंग उधळत असावी अशी त्या तरुण डिटेक्टिव्हची समजूत झाली होती; पण—

आपण नकळत घराबाहेर घालवलेला तो माणूस मॉसियर एमिल *ब्यूसन होता हे त्या खुळ्याला ठाऊक नव्हतं!'*

'प्रिफेक्चर'च्या त्या डिटेक्टिव्हनं अजाणता केलेल्या या विचक्यामुळं हातावर हात ठेवून वाट पाहात बसण्याव्यतिरिक्त आता दुसरं काहीच करता येण्यासारखं नव्हतं. कारण मॉसियर एमिल पुन्हा गडप झाला होता!

१० मे १९४८ रोजी सोशल सिक्युरिटीचे दोन कर्मचारी ड्रेव्हिल इथल्या एका पोस्टऑफिसमधून बाहेर पडले. त्याच्याजवळ दोन ब्रीफकेसेस होत्या व त्यात सत्तर हजार फ्रॅंक्सची रक्कम होती. ते पैसे त्यांनी पोस्टातून काढले होते नि ते आपल्या ऑफिसकडे निघाले होते तितक्यात—

सशस्त्र दरोडेखोरांच्या एका टोळीनं त्यांना अचानक गराडा घातला आणि त्याच्याजवळच्या ब्रीफकेसेस घेऊन ती टोळी एका मोटारीतून वेगानं पसार झाली. दरोडेखोरांच्या त्या टोळीत काळ्या डोळ्यांचा एक बुटका गुंड होता असं त्या दोघांनी नंतर पोलिसाना सांगितलं. हा गुंड अर्थातच मॉसियर एमिल होता हे उघड होतं!

त्यानंतर सोळा दिवसांनंतरची गोष्ट. तारीख होती २६ मे. सेंट जॉर्जेसमधल्या व्हिनी विभागात दोन पोलिसअधिकारी कसली तरी तपासणी घेत घराघरामधून फिरत होते. एका घरात अगदी अकल्पितपणंच त्याना ब्यूसन आणि त्याचा एक दोस्त आढळला. दोन विरुद्ध दोन अशी चकमक झाली; पण गोळीबार करून ते दोघं बदमाष त्या घरातून निसटले आणि शिताफीने पसार झाले. मात्र त्या घरात असलेली एक बाई पोलिसांच्या हाती सापडली. त्यांनी तिची झडती घेतली. तेव्हा तिच्या कोटाच्या एका खिशात त्याना तिचं ओळखपत्र सापडलं. त्याच्यावर तिचं नाव लिहिलेले होतं: मॅडम फ्रान्सिस कॅर्लो!

तो रहस्यमय नि अज्ञात 'फ्रान्सिस' कोण ते अखेर मला कळलं होतं!

**( कथेचा उत्तरार्ध पुढील अंकी )**

पुस्तके

# एका ग्रंथपालाचा कॅथार्सिस....

मी वाचनालय चालवण्याचा काटेरी मार्ग चोखाळायला २१ वर्षांपूर्वी सुरुवात केली. त्या वेळी मनात काही स्वप्ने होती. तरुण वयात जी जिद्द असते ती होती. चागले वाचनालय चालवण्याबाबतची माझी थोडी स्वप्ने साकार झाली; पण ती फक्त १० टक्के असतील.

मला २१ वर्षांत, सर्च लाइटच्या प्रकर्षाने एक गोष्ट जाणवली ती वाचकांची विविधता. त्याची वर्गणी देण्याबाबतची नियमित अनियमितता, त्याच्या वाचनाच्या आवडीनिवडी, त्याची पुस्तके वापरण्याची तऱ्हा, त्याची वाचनालयात वर्तणूक, बऱ्यावाईट पुस्तकाबद्दल त्याच्या प्रतिक्रिया, समंजस वाचक, डोळस वाचक, उद्धट वाचक, सहकार्य देणारा वाचक, असहकारी वाचक, गुणग्राहक वाचक, पैशाच्या गुर्मीने टेबलावर पैसे व कोरा चेक फेकणारा वाचक, पुस्तकांना, रद्दी समजणारा वाचक– असे इतके वाचकाचे नमुने आढळले की, लायब्ररी व्यवसायाच्या गडद काळ्या ढगाला कधीकधी चंदेरी रेषा, तर कधी आशेची तिरीप, तर कधी घोर निराशा या अशा चक्रात मी फिरत राहिलो. अजूनही ते चक्र तसेच फिरत आहे !

लायब्ररीचा धंदा मुळातच असा आहे की, त्याचा सचालक चटकन् बायर्स मार्केटमध्ये जाऊन बसतो. आता एकदा बायर्स मार्केटमध्ये गेल्यावर का तुम्ही सूचना करू शकता ? सुधारणा करू शकता ? नवनव प्रयोग करू शकता ? पुस्तक कसे हाताळावे याबद्दल वाचकाना सूचना करण्याचे धाडस करू शकता ? छे ! छे ! बायर्स मार्केटमध्ये हे असे करणे म्हणजे सरळ अपयशाला आमत्रण ! अहो, बायर्स मार्केट म्हणजे तुम्हाला नियतीकडून मिळालेले सुखाचे ( किंवा दु:खाचे ) तुकडे ! हवे असले तर घ्या नाही तर उपाशी मरा ! निकड असणारा नाक घासतो हा नियम आहे. त्याला कसला चॉइस आणि कसले चोचले !

एका नगण्य मुद्द्यावर मी सपशेल तोडघशी पडलो. काय होता तो मुद्दा ? पिशवीचा ! एकदा भर उन्हाळ्यात मी माझ्याच वाचनालयातून एक पुस्तक घरी घेऊन गेलो. पोचल्यावर पहातो तो हाताच्या घामाने व धुळीने नवेकोरे पुस्तक बरेचसे खराब झाले होते. प्रत्येक पावसाळ्यात आमच्या वाचनालयाची १५०–२०० पुस्तके कमी– अधिक प्रमाणात वाचकाकडून ने– आण करताना भिजतात. माझ्या मनात सहज विचार आला की पुस्तकांची ने–आण जर छोट्या प्लॅस्टिकच्या पिशवीतून केली व शक्य तेव्हा पुस्तके वाचून झाल्यावर ते प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवले तर पुस्तकाची खराबी बऱ्याच प्रमाणात कमी होईल. हा एवढासा मुद्दा, पण तेवढ्यावरून आमच्या काही वाचकानी वादंग केवढ माजवले ! 'हे अशक्य आहे !' 'मी फार बीझी असतो. मला ते जमणार नाही!' 'पिशव्या म्हणजे डोकेदुखी आहे. त्या नेहेमी हरवतात!' 'मला एवढी शिस्त जमायची नाही!' वगैरे अनेक प्रतिक्रया उमटल्या.

आधीच आमच्या वाचनालयाची वर्गणी जास्त. त्यात पुस्तक वापरायचे कसे याची सूचना आम्हाला काही वाचकाना परत परत करावी लागते. त्यामुळे मला वाटते काही वाचकाचा माझ्या बाततीत एक प्रकारचा Violent suppressed rage असतो आणि मग स्फोट होण्यास पिशवीसारखे निमित्त पुरते. असे काही वाचक मला psychic घेराव टाकतात. शक्य झालं तर मला lynch करायला सुद्धा ते मागेपुढे बघणार नाहीत आणि मग प्रथासाठी मी martyr व्हावे ही माझ्या मनातली सुप्त इच्छा पुरी होईल !

सटवाईने एखाद्याच्या भाळावर प्रचंड विरोधाभासाचे किंवा अपयशाचे रेघोटे ओढले, की मग हातचे मीठ सतत अळणीच होत असते. काही गोटात मी एक टायरंट ग्रंथपाल म्हणून ओळखला जातो. याचे दुसरे टोक म्हणजे काही पालक आपल्या मुलाना पुस्तकं वापरण्याबाबतची शिस्त मिळावी म्हणून फिनिक्समध्ये पाठवतात. विरोधाभासाचा आणखी एक नमुना म्हणजे 'फिनिक्स वाचनालयातील पुस्तकं अतिशय चागल्या स्थितीत असतात–' हे वाळवंटातील ओॲसिससारखे कानाला सुखद वाटणारे वाक्य मी पुष्कळ वेळा ऐकल आहे.

मला असे वाटते की, वाचकाला हवे असलेले पुस्तक चागल्या अवस्थेत देण्याची जर ग्रंथपालाची जबाबदारी असेल, जर वेगवेगळ्या विषयावरील पुस्तकाची माहिती वाचकाला देण्याचे ग्रथपालाचे आद्य कर्तव्य असेल तर मग वाचकाचे कर्तव्य काहीच नाही का ? पुस्तक केवळ प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून आणण्याइतकी शिस्त सुद्धा वाचकाने लावून घऊ नय ? लायब्ररीचा धदा हा बायर्स मार्केटमध्ये आहे. म्हणून शिस्त लावून न घेणे आणि नियमाचे उल्लघन करणे हा एक अक्षम्य भरडपणा आहे.

'पुस्तक ही एक अप्रतिम चीज आहे. ती वाचण्यासाठी आहे, आस्वाद घेण्यासाठी आहे, विचार करण्यासाठी आहे, धुंदी आणणारी आहे. पुस्तक चागल्या अवस्थत असेल तर वाचनाचा आनद द्विगुणित होतो, यासाठी हा सर्व खटाटोप.

स्वत: शिस्त न लावून घेता, 'पुस्तकं वाचलीच नाहात तर अगदा काराकरकरात राहतील,' असे म्हणणाऱ्यामध्य समजसपणा व डोळसपणा कमी असता हे उघड आहे. कारण कोणत्याही तळमळीच्या ग्रथपालाला पुस्तके वाचली जावीत असेच वाटत.

आता, पुस्तके प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवण्याच्या सूचनेवरून एखाद्या ग्रथालयाचा वॉटरलू होऊ शकतो हे मला कळल आहे. कारण सहसा वाचकाचा कल थोडाशी शिस्त अगी बाणवून घेण्यापेक्षा पुस्तक खराब करण्याकडच अधिक असतो !

माझ्याच काय; पण प्रत्येक वाचनालयाच्या वाचकानी याबाबत शातपण विचार करावा व निदान पावसाळ्यात तरी पुस्तकाची ने-आण प्लॅस्टिकच्या पिशवीतून करावी. थुकी लावून, प्रेशर देऊन, गलथानपणे पाने उलटू नयेत, काखेत पुस्तक ठवू नये, जीभाच्या पिशवीत, खाद्य पदार्थांजवळ,

उन्हात, धुळीत, लहान मुलांच्याजवळ पुस्तकं ठेवू नयेत, सायकलकॅरिअरच्या स्प्रिंगच्या टेन्शनमुळे, अणकुचीदार वायरमुळे पुस्तके खराब होतात. या व अशा बऱ्याच गोष्टी कित्येक वाचकांना अनेकदा सागून मी वाईटपणा पत्करला आहे.

काही विनोदी लेखक व व्यक्ती असेही म्हणतील की, पुस्तक एवढे जपल्याने ते वाचल्याचा खरा आनंद नष्ट होईल! पुस्तक अव्यवस्थितपणे वापरूनच वाचनाचा आनंद मिळतो हे म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. कारण पुस्तक चांगल्या अवस्थेत असताना वाचले तर वाचनाचा आनंद जास्त मिळतो असेच जवळजवळ सर्व वाचक म्हणत असतात. तर मग प्रत्येक वाचकाला असेच वाटते ना की, दुसऱ्या वाचकाने पुस्तक चागले ठेवावे? मग दारावरची वा टेलिफोनची घंटा वाजली की, खुणेसाठी कोपरा दुमडून किंवा पुस्तक पालथे टाकून पटकन् जायला वाचकाला स्वतःपुरता परवाना का बरं हवा?

एखादे चागले पुस्तक वाचकाला तासन् तास आनद देते. पुस्तक वाचून पिशवीत टाकण्यासाठी दोन-तीन सेकंद लागतात. जी वस्तू तुम्हाला रोज इतका आनंद देते, माहिती देते त्यासाठी काही वाचक 'दोन-तीन सेकंदही देऊ शकत नाहीत? हा काय न्याय झाला? हे काय ग्रंथपालाशी सहकार्य झाले? ग्रंथालयाविषयी निष्ठा झाली? मूळ मुद्दा प्लॅस्टिकच्या पिशवीचा नाही तर ग्रंथ काळजीपूर्वक हाताळावे हा आहे! ग्रंथ कसे हाताळावे याबद्दल जसजसे एक एक नियम आपण पाळू लागतो तसतसे आपले ग्रंथावरील प्रेम वाढत जाते. जशी तुम्हाला एकदा सायकल येऊ लागली, तुम्ही पोहोणे शिकलात की ते तुम्ही विसरत नाही, तसे एकदा का तुम्ही ग्रंथावर प्रेम करायला लागलात की त्याचा तुम्हाला कधीही विसर पडणार नाही! मला तर असे वाटते की, 'A thing of beauty is a joy for ever'–या पंक्तीत पुस्तक बसते. म्हणूनच प्रत्येक वाचकाने जर पुस्तकाला जपले व ग्रंथपालाला सहकार्य दिले तरच पुस्तक कायम सुदर राहू शकेल. यामुळे वाचकाला जे समाधान मिळेल ते पुस्तक अव्यवस्थितपणे वापरून, त्यातून हिरावून घेतलेल्या आनंदामुळे कधीही मिळणार नाही! पुस्तक बेजबाबदारपणे वापरून त्यातील आनंद घेणे म्हणजे पुस्तकांवर एक प्रकारचा रेपच!

ग्रंथप्रेमाव्यतिरिक्त ग्रंथ जपण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रंथांच्या फोफावलेल्या किंमती. पुस्तकांचे दर इतके वाढले आहेत की, ती उच्चमध्यमवर्गीयानाही परवडेनाशी झाली आहेत. अशा परिस्थितीत वाचकांना पुस्तके मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे ग्रंथालय. वाचकाची भूक भागवण्यासाठी प्रत्येक ग्रंथालयाची क्षमता वाढायला हवी व वाचकाने शिस्तीचे पालन करायला हवे. काळ बदलल्याने पुस्तके हाताळण्याच्या सवयीही बदलायला हव्यात. पूर्वी एखादे पुस्तक खराब झाले की, ८-१० रुपयात दुसरी कॉपी घेता येत असे. आता त्याच्या किती तरी पटीत अधिक किंमत मोजावी लागते आणि तरीसुद्धा एखाद्या जुन्या पुस्तकाची कॉपी मिळेलच याची खात्री नाही! आमच्या वाचनालयातील पुस्तकांमध्ये सर्व मिळून सुमारे ६०,००० वेगवेगळ्या विषयांवरील कात्रणे असतील. आम्ही ही सर्व कात्रणे पुस्तकाचे सर्क्युलेशन चालू असताना कोणत्याही वाचकाची शक्यतो गैरसोय न होता लावलेली आहेत. आधी स्टेग्नंट पुस्तकांना नियतकालिकाची कात्रणे लावणे हे जरा कठीणच. कारण नियतकालिके व पुस्तके याच्या आकारात फरक असल्याने नियतकालिकामधले किंवा वर्तमानपत्रातले कॉलमच्या कॉलम पुस्तकामध्ये चिकटवता येत नाहीत. म्हणून पुस्तकाच्या आकाराचे कोरे बाँडपेपर आम्ही आधी पुस्तकात चिकटवतो आणि त्यावर मग कात्रणे लावावी लागतात. कात्रणे लावताना पुस्तकाचे सौंदर्य तर नष्ट होत नाही ना, याबाबतच्या सूचना आम्हाला कामगारांना सतत द्याव्या लागतात. साधा डिंक लावल्याने सुरकुत्या पडतात म्हणून ४०-५० रु. चे फेव्हीकॉल वापरावे लागते. प्रत्येक पुस्तकावर अशी तासन् तास मेहनत घेतल्यानंतर वाचकांनी आमचे पुस्तक घरी किंवा ने-आण करताना प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवावे ही माझी अपेक्षा रास्त नाही काय?

एखादा वाचक अगदी कोरे पुस्तक पहिल्यादा नेतो आणि बऱ्याच वेळा खराब करून आणतो. एका वाचकाची पुस्तक खराब करायची क्षमता इतकी तर मग एका पुस्तकाचा निकाल लागायला असा कितीसा वेळ लागणार? या कटकटीत कधीकधी असे वाटते की, वॉटरप्रुफ, स्टेनप्रुफ, न फाटणारा कागद निघाला तर कायमचा हा प्रश्न सुटेल! भविष्यात तसा कागद कदाचित निघेलही; पण सध्याच्या कागदाचा गुणधर्म म्हणजे ठिसूळपणा, तो द्रव्य शोषणारा, मळणारा असतो. त्याच्या या गुणधर्मानुसारच आपण त्याना वागणूक दिली पाहिजे. वाचकाने निष्काळजीपणे पुस्तके वापरल्यामुळे आत्तापर्यन्त किती तरी पुस्तके त्यांच्या थडग्यात गेली असतील. सध्याच्या अफाट किंमती असलेल्या पुस्तकांची शेवटी अशी विल्हेवाट लागावी हे एक क्रिमिनल वेस्टेज आहे!

आपण ग्रंथाविषयी प्रदर्शन भरवतो. ग्रंथनिर्मितीला सहाय्य व उत्तेजन देतो, साहित्याविषयी सेमिनार भरवतो, मासिके काढतो, गप्पांचा कार्यक्रम ठरवतो, जाहीरात देऊन वाचकांना ग्रंथ विकत घेण्यास उद्युक्त करतो; परंतु ग्रंथाची काळजी कशी घ्यावी याबद्दल आपण काही केले आहे का? पाश्चात्य देशांत कदाचित याची गरज नसेल पण भारतात मात्र नितात गरज आहे. कोणताही ग्रंथपाल तुम्हाला सागेल की, भारतीय वाचकाला ग्रंथ कसे वापरावे याचे ज्ञान कमी आहे. जपानमध्ये तर एकदा एका वाचनालयात 'Dogs and Indians not allowed' अशी पाटीच लावली होती.

पुस्तके ही देशाची संपत्ती आहे. त्याना पूर्ण संरक्षण देणे हे प्रत्येक सुज्ञ माणसाचे कर्तव्य आहे. एकदा का पुस्तकाची निर्मिती प्रचंड प्रमाणात झाली की साहित्याबद्दल आपण पुष्कळ काही केले ही समजूत चुकीची आहे. पुस्तकांची निगा ठेवणे ही बाब पुस्तकनिर्मितीनंतरचा follow-up आहे. हा follow-up जर केला नाही तर साहित्याची एकांगी सेवा केल्यासारखे होणार आहे.

पाश्चात्य देशात ग्रंथ काळजीपूर्वक हाताळला जावा हे कदाचित ओघाने व सहज होत असेल, पण भारतात मात्र वाचकाने ग्रंथ कसे वापरावे याची मोहीमच प्रत्येक वाचनालयाने उघडली पाहिजे! मी तर असे म्हणेन की ग्रंथालयाला जसे नवनवीन ग्रथ घेण्याची

आवश्यकता असते व त्यासाठी प्रत्येक ग्रंथालयाचे जसे बजेट असते तसे बजेट ग्रंथ कसे हाताळावे याचा प्रचार करण्यासाठी सुद्धा असावे.

आपण आजारी पडलो की डॉक्टर सांगेल तसे करतो. नळ बिघडला की प्लंबरचा, वायरिंग बिघडले की इलेक्ट्रिशियनचा सल्ला घेतो; पण ग्रंथपालाने ग्रंथ कसे वापरावे याबद्दल सल्ला दिला की आपण त्याच्यावर चिडतो. त्याला दीडशहाणा म्हणतो, शिष्ट म्हणतो. आपापल्या क्षेत्रात प्रत्येक व्यक्तीला कित्येक अनुभव आलेले असतात. हे असे असताना वाचकांनी ग्रंथपालाच्या सूचना का कू न करता मानायला हव्यात. शेवटी वाचकाचे हित सहकार्य देण्यातच आहे.

कोणत्याही ग्रंथालयातील पुस्तके ही त्याची, संचालकाची किंवा मालकाची संपत्ती नसते. ती कोणी एखाद्या वाचकाचीही नसते तर सर्व सामूहिक वाचकांचा तो एक ट्रस्ट असतो. खाजगी ग्रंथालयाचा उपयोग अतिशय मर्यादित असतो; पण वर्गणीदार असलेल्या ग्रथालयाचा उपयोग अतिशय व्यापक असतो. खाजगी ग्रंथालयातील आणि वर्गणी ग्रंथालयातील पुस्तके वापरण्याच्या संकेतांमध्ये फरक असतो, ही जाण वाचकाने सतत जागती ठेवली पाहिजे.

ग्रंथ हाताळण्याबाबतच्या माझ्या सततच्या सूचनांमुळे फिनिक्सचा 'वॉटरलू होतो की काय ही शंका मी आधीच मांडली आहे. तसे झाले व वाचकांनी पुस्तके हाताळण्याच्या सवयी बदलल्या नाहीत तर तो वॉटरलू एकट्या फिनिक्सचा नसेल तर इतर ग्रंथालयांचा, ग्रंथाचा व ओघाने वाचकांचा सुद्धा असेल !

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

## हिचकॉकच्या कथा । कथा चवथी

### स्वैर अनुवाद । रवींद्र गुर्जर

# न मिळे ही मौज (त !) पुन्हा....

एकदा एका तरुण मनुष्यानं रोम शहराला भेट दिली. तो प्रथमच तिथं जात होता. तसा तो खेड्यातून आलेला होता; पण एक तर तो आता म्हणावा तितका तरुण राहिलेला नव्हता आणि या विशाल, सुंदर शहरात कोणी आपल्याला सहजासहजी वश होईल, अशी कल्पना करून घेण्याइतका तो खुळाही नव्हता. जीवन मिथ्या आहे हे एव्हाना त्याला कळून चुकलं होतं. काही आश्चर्यकारक घटना घडू शकतात हे जरी खरं असलं तरी त्यांची कसर भरून काढण्यासाठी असंख्य वेळा निराशा पदरी पडतच असते. दुर्दैव वाट्याला येण्याची शक्यताच जास्त—त्यापेक्षा काही विशेष न घडलेलं बरं. रोमसारख्या मोठ्या शहरात तर जपूनच राहायला हवं.

हा विचार करत तो एका भव्य वास्तूच्या पायऱ्यावर उभा होता. समोर गर्दीचा महापूर ओसंडत होता. वाहनांचे आवाज कानावर आदळत होते. सायंकाळ झाली होती. रस्त्यांवर एकदम दिवे लागले. नैसर्गिक प्रकाश धूसर झाला होता. वाहनांचे प्रखर दिवे वेगानं ये-जा करत होते. जवळच्या मोठ्या चौकातील कारंजाला वळसा घालून मोटारी दिसेनाशा होत होत्या. जाहिरातीचे निऑन लाइट्स डोळ्यात घुसत होते, सावल्यांचा नायनाट करत होते. बसेसच्या पिवळ्या खिडक्यांमधून, कुठे तरी उत्सुकतेनं, अधीरपणे जाणाऱ्या लोकांचे चेहरे दिसत होते. जणू या शहरातल्या प्रत्येकाची सायंकाळ विशेष अर्थपूर्ण होती. फक्त त्याला एकट्यालाच काही उद्दिष्ट नव्हतं.

या वेळी गावात एकाचीही सगत-सोबत नसलेली व्यक्ती केवळ आपणच असू; पण मुद्दाम शोध घेऊन साहस करता येत नाही— उलट ते दूरच पळतं. तेव्हा त्याबद्दल आशाच करायला नको. म्हणून तो तरुण पायऱ्या उतरून खाली आला आणि एका लहानशा टेकडीवर असलेल्या त्याच्या हॉटेलच्या दिशेनं चालू लागला. मद्याचे बार आणि खाद्यपेयांची दुकानं भरभरून चालली होती. रस्ते त्यामानानं अरुंद होते. तथापी संधि-प्रकाशात रस्त्यावर दुतर्फा असलेली झाडं फारच सुंदर दिसत होती. त्यामुळं त्याला अधिकच एकाकी वाटू लागलं.

पादचारी मार्ग नसलेल्या त्या निर्मनुष्य गल्लीतून जात असताना दूरवर समोर एका स्त्रीची आकृती त्याला दिसली. ती चढावरून उतरून त्याच्याच दिशेला येत होती. त्याची मरगळ क्षणार्धात दूर झाली.

ती जराशी जवळ आल्यावर त्याच्या लक्षात आलं की तिच्या अंगावरील कपडे उंची होते. त्यांची निवड चोखंदळ होती. तिची चालही डौलदार दिसत होती. तिचा चेहरा जरी अस्पष्ट होता, तरी ती सुंदर नसेल असं मानणं अशक्य होतं. तिच्या अस्तित्वामुळं त्याचं मन 'साहसा' बद्दल विचार करू लागलं त्या संध्याकाळी कमतरता होती ती याच गोष्टीची. ती अधिक जवळ येताच, का कोण जाणे पण तो उदास झाला. त्याला स्वतःचीच घृणा वाटू लागली. हात छातीशी घेऊन त्यानं नजर खाली वळवली; पण तत्पूर्वी एक ओझरता कटाक्ष समोर टाकलाच.

त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. तिच्याकडे बघत तो जागच्या जागी थबकला. त्याचा गैरसमज झालेला नव्हता. ती चक्क हसत होती. शिवाय तीही जागच्याजागी थबकली होती. तो लगेच सावध झाला. 'ही वेश्या असेल ?' पण छे-तिचं हसू त्या जातीचं नव्हतं; पण त्यात जिव्हाळा नक्की होता. त्याहून कमाल म्हणजे ती बोल लागली; "मी———खरं म्हणजे मी असं विचारता कामा नये———पण ही इतकी सुंदर सायंकाळ ——आणि तुम्ही एकटेच दिसता. अगदी माझ्यासारखेच———"

ती फारच सुंदर होती. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना; पण उत्तेजित झाल्यामुळं त्याच्यात हसण्याइतकी शक्ती आली. ते पाहून ती पुढे बोलू लागली. बोलाव की नाही या संभ्रमात, पण उच्चारलेले शब्द स्पष्ट — — —

"मला वाटलं — — — आपण — — — थोडी चक्कर मारली — — —"

त्या तरुणानं अखेर बोलण्याचा धीर केला.

"मला नक्कीच आवडेल. आमचं हॉटेल इथून दोनच मिनिटांच्या अंतरावर आहे."

ती पुन्हा हसली.

"माझं घर या इथेच आहे..." ती सूचकपणे म्हणाली.

दोघंजण मूकपणे चालत होते. थोड्या वेळापूर्वी तो तरुण त्याच रस्त्यावरून आला होता. एका वळणावर तिनं खूण केली. त्या जागी एक आलिशान प्रासाद उभा होता. बाहेरच्या बाजूला मोठी बाग केलेली दिसत होती. त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर सूक्ष्म चमक पसरली. तिची त्वचा मृदु-मुलायम होती. करड्या रंगाचे पण तेजस्वी डोळे, गडद भुवया आणि केसही काळेभोर. तिनं जवळच्या किल्लीनं बागेचा दरवाजा उघडला.

आतलं मुख्य प्रवेशद्वार एका नोकरानं मोठ्या अदबीनं उघडलं. ते दोघं मखमली गालीच्यावरून चालू लागले. एका भव्य दिवाणखान्यात दोघंजण आले. मऊ आसनावर ती दोघं स्थिरावली. समोरची संपूर्ण भिंत काचेची बनवलेली होती. त्यातून बाहेरची फुलझाडं दिसत होती. तेवढ्यात नोकरानं मद्याचे सुबक पेले समोर आणून ठेवले. त्या उंची मद्याची लज्जत काही औरच होती.

दोघेजण मनसोक्त गप्पा मारू लागले. त्यांच्या चित्तवृत्ती बहरू लागल्या. वातावरण धुंद बनलं. तो तरुण उच्च प्रकारच्या भावनात्मक पातळीवर जाऊन पोचला; पण मधूनमधून तो तिच्याकडे कुतूहलानं बघत होता.

तिच्या कटाक्षावरून आणि सूचक आविर्भावांवरून नक्कीच तिला अधिक जवळीक हवी होती. ती अगदी उघड उघड आव्हान करत होती. आपण काळजी घेतली पाहिजे, त्यानं स्वतःला बजावलं. त्यावर बराच विचार करून त्यानं निर्णय घेतला. तिचे आभार मानावेत आणि वेळेवर निघून जावं; पण तिनं त्याला इथे अडवलं. प्रथम हसून आणि नंतर चेहऱ्यावर खिन्न भाव आणून.

आपल्याकडून नकळत काही वेडीवाकडी कृती झाली असेल तर माफ करा, अशी विनती तिनं केली. 'आपली मुलाखत अगदीच अनपेक्षितपणे झालेली आहे. या वेळी तुम्ही माझ्या हेतूचा विपर्यास केलात, तरी त्यात आश्चर्य नाही; पण मी आज अगदीच एकटी होते आणि-...तुमची मला काय मोहिनी पडली कोण जाणे! कदाचित संध्याकाळच्या धुंद वातावरणाचा तो परिणाम होता.'—त्यामुळं आपला स्वतःवर ताबाच राहिला नाही!' वगैरे. तिच्या या मन:पूर्वक बोलण्याविषयी शंका घ्यायला जागाच उरली नाही.

त्याचं हे कित्येक वर्षांचं स्वप्न होतं. आता पाऊल मागं टाकायचं नाही. हा योग पुन्हा कधीच येऊ शकणार नाही. तो होशोहवास गमावून बसला होता. तिच्यावर त्यानं पूर्ण विश्वास ठेवला. त्यानंतर रंगत खरोखर वाढली. त्या दोघानी तिच्या घरीच स्वादिष्ट भोजन केलं. दिमतीला सेवकवर्ग धावत होता. नानाविध डिशेस तयार होत्या. त्याची चव वर्णनातीत अशीच होती.

ती सुंदर स्त्री अतिथी तृप्त झालेला पाहून कृतार्थ झाली. नंतर दोघंजण सोफ्यावर लगटून बसले. पुन्हा मद्याचे पेले हजर झाले. नोकर थोड्याच वेळात निघून गेले. हवेत गारवा होता. त्या भव्य हवेलीत स्तब्धता पसरली.

दोघांनी दृढ आलिंगन दिलं.

काही वेळानं ती हळूच उठली. त्याच्या हातात हात घालून त्या खोलीतून बाहेर गेली. दोघांनाही आता बोलण्याची आवश्यकता वाटत नव्हती. किती विलक्षण नि:स्तब्धता—त्याला जाणवलं. त्याचं हृदय धडधडू लागलं. आपल्या छातीच्या ठोक्यांचे प्रतिध्वनी हॉलमध्ये घुमणार, असं त्याला वाटलं.

दोघंही मंदपणे पावलं टाकत चालले होते. या भारलेल्या संध्याकाळी, विलक्षण उत्कट प्रसंगी विपरीत असं काहीच घडू शकणार नाही. अशा वेळी बोलायचं तरी काय आणि कशाला?

एका रुंद जिन्यावरून ते वरच्या मजल्यावर जाऊ लागले.

ती आपल्या शयनगृहात त्याला घेऊन गेली. तिथे प्रशस्त बिछान्याला चारी बाजूनी सुंदर पडदे लावलेले होते. पारदर्शक रेशमी गाऊन घालून ती गादीवर आडवी झाली. तिनं एक पाय पोटाशी घेतला होता.

त्यानं मोजक्या पण प्रभावी शब्दात आपलं प्रेम व्यक्त केलं. त्या प्रेमाची स्मृती चिरकाल टिकणार होती. त्यांची भेट होण्यामागे निश्चित काही तरी संकेत होता.

तिनंही सार्थ शब्दात त्याच्या प्रेमाला प्रतिसाद दिला. आता त्या दोघांच्या आड दुनियेतली कोणतीही शक्ती येऊ शकणार नव्हती. सगळं कसं जमून आलेलं होतं.

आणि तिनं आपल्या अंगावरील एकमेव झिरझिरीत वस्त्र हलकेच दूर केलं.

तो तिच्या शेजारी झोपला; पण तेवढ्यात जागीच थबकला. तिच्या ओठाजवळ नेलेले ओठ त्यानं मागे घेतले.

काही तरी चुकत होतं. विसंगती जाणवत होती. त्यानं कान दिले. तो विचार करू लागला—आणि त्याला उमगलं की चूक आपलीच आहे. बिछान्यावर रात्रीचा मंद दिवा लागलेला होता ते ठीकच होतं; पण खोलीच्या मधोमध असलेला प्रखर विजेचा दिवा बंद करायला तो विसरला होता. दाराजवळ त्याचं बटण असलेलं त्यानं पाहिलं होतं.

तो उठू लागला; पण लगेच घुटमळला. राहिला दिवा तर काय बिघडलं? तेवढ्यात तिनं पापण्या उघडल्या. तो दिव्याकडेच बघत होता. तिच्या लगेच लक्षात आलं.

तिचे डोळे चकाकले. ती कुजबुजली, 'प्रिय मित्रा, थांब! उठायचं कारण नाही.....'

आणि तिनं एक हात बाहेर काढला. त्याची लांबी हळूहळू वाढू लागली. बिछान्याचा पडदा बाजूला करून तो हात जमिनीवरून पुढे सरकू लागला. बिछान्यावरील तिच्या दंडाची जाडी बघता बघता वाढली.

शेवटी त्या हाताचा पंजा दरवाज्याशी पोचला.

पंजाची जाडजूड बोटं भिंतीवर चढली.

तिनं एका बोटानं दिवा बंद केला. त्याबरोबर खोलीचा कबजा अंधारानं घेतला! □

( मूळ लेखक : विलियम् सॅनसम )

चित्रपट । सदानंद बोरसे

# फटाकडी

## प्रेक्षकाला बधिर करणारा बार

तुम्ही विचार करू शकता का? फार नाही– थोडासासुद्धा चालेल. डोळ्यापुढे घडणाऱ्या गोष्टीची काहीएक तर्कसंगती लावण्याची ताकद तुमच्यात आहे का? या प्रश्नांची उत्तरे जर 'नाही' अशी असतील तर 'फटाकडी' हा खास तुमच्यासाठीचाच चित्रपट आहे; पण जर या प्रश्नांची उत्तरे 'हो' अशीच असतील ( जशी ती माझीही होती ); तर 'फटाकडी' हा चित्रपट पहा, तुमचा स्वतःबद्दलचा गैरसमज दूर होईल (जसा तो माझा झाला.)

या चित्रपटाच्या निर्मात्या सुषमा शिरोमणी यांनी यापूर्वी 'भिंगरी' या नावाचा एक चित्रपट काढला होता. त्यातील 'भिंगरी' कायम ठेवून व तिचे 'फटाकडी' असे बारसे करून स्वतःच्याच कथेवर हा नवीन चित्रपट त्यानी काढला आहे.

नारायण ( डॉ. श्रीराम लागू ) हा शेतकरी दामू सावकाराच्या ( निळू फुले ) विरुद्धचा खटला जिंकतो. त्याची जमीन त्याला परत मिळते; पण त्यामुळे चिडून दामू नारायणाचा खून करतो. नारायणच्या संसाराची वाताहत होते. त्याचा मुलगा शिरपा राणू दरोडेखोर ( यशवंत दत्त ) बनतो, मुलगी इंदी फटाकडी ( सुषमा ) बनते. येथपर्यंतचा भाग मी अत्यंत महत्प्रयासाने समजून घेऊ शकलो. पुढे मात्र फटाकडीच्या हंटरवाली उड्या, लेडी जेम्स बाँड फाइट्स, ब्रुस ली डाव इत्यादी इत्यादी इत्यादींमुळे डोके इतके ठोकले गेले की त्यातून डोक्यात शिरलेले काही तुकडे असे– बावळ्या (अशोक सराफ) नावाचा गृहस्थ फटाकडीच्या प्रेमात, फटाकडी एकदा की दोनदा राणूशी सामना करते, दामू सावकाराचा मुलगा प्रताप (रमेश देव) फटाकडीच्या मागे, बावळ्या खरा इन्स्पेक्टर, जत्रा, हाणामारी, मायलेकरांची म्हणजे लक्ष्मीबाई, राणू ऊर्फ शिरपा व फटाकडी ऊर्फ इंदी यांची भेट, समाप्त. यातून तुम्हाला जेवढे कळले असेल, त्यापेक्षा बरेचसे कमीच माझ्या डोक्यात शिरले आहे. हां, मध्येच एकदा केव्हा तरी आपल्या हिंदीवाल्या रेखाचा नऊवारीत एका हनिमन लावणीच्या तालावर एकदम फाकडू नाच आहे. त्या वेळी बसलेल्या कचाकच शिट्ट्यांमध्ये एक आपलीही होती.

या सगळ्या चित्रपटात इतर बऱ्याच प्रकारांप्रमाणे एक गोष्ट मला कळली नाही. सगळी पात्रे बाकीच्या वेळी भयंकर ढँटणँण् वागतात; पण ऐन मोक्याच्या प्रसंगी सगळ्यांची शस्त्रे गळून पडतात. उदा. १) वेळप्रसंगी दामू सावकाराला दम भरणारा नारायण, पाच–सात गड्यांशी हाणामारी करणारा नारायण, ताशी तीन इंच वेगाने पळणाऱ्या टांग्याला स्वतःला बांधून घेऊन फरपटत कसा जातो? २) ज्यूडो, कराटे, मुष्टियुद्ध इत्यादी सर्व मल्लविद्यांमध्ये पारंगत अशी फटाकडी मल्लिका प्रतापने तिला एका खोलीत कोंडल्याबरोबर त्याच्या हातापाया पडण्याइतकी गर्भगळित का बनते? ३) इतर वेळी सतत साथीदारांवर गुरकावणारा राणूजी दरोडेखोर सावकाराच्या गुंडांशी मारामारी करताना मात्र नेभळट, हतवीर्य का वाटतो? ४) बाकीच्या वेळी अत्यंत बेरकी खलनायकी करणारे दामू आणि प्रताप फटाकडीसमोर मात्र अजागळ आणि बावळट का बनतात? तर या किंवा अशाच अनेक प्रश्नांची उत्तरे सुषमा उवाच आणि डायरेक्टर दत्ता केशव उवाच अशी असावीत.

'भिंगरी' मध्ये वापरलेलाच मसाला लेबल बदलून 'फटाकडी'त वापरणे ओघाने आलेच. 'भिंगरीत' दहीहंडी फोडण्याच्या निमित्ताने सुषमाने स्वतःबरोबर मा. भगवानला नाचवले होते. 'फटाकडी'त हाच प्रकार गणेशोत्सवाच्या निमित्ताने केला आहे. (यात प्रेक्षकांचा जाऊ दे म्हणतो मी; पण निदान भगवानचा तरी विचार करावा.) भिंगरी ही तमाशात नाचणारी पोरगी मग काय– दे दनादन नाच अन् गाणी. फटाकडीतील फटाकडी कडकलक्ष्मी घेऊन फिरणारी की लगेच– 'कडकलक्ष्मीला घेऊन आले रूपानं मी फाकडी', 'देवी माझी, आई माझी, लक्ष्मी, ये ये ये' ही गाणी अन नाच, पुन्हा त्यात कडकलक्ष्मी, आसूड इत्यादींच्या निमित्ताने सूडाचे फटके, अन्यायावर आघात वगैरे सिंबॉलिकगिरी भरलेली. याशिवाय गणपती आणि रेखा होतेच. 'भिंगरी'तील मायलेकींच्या ताटातुटीप्रमाणे फटाकडीत तर मायलेकींच्या गंगायमुनांना लेकाची सरस्वतीही मिळाली होती.

या नाचगाण्यावरून आठवले, सध्या मराठी चित्रपटांमधील तमाशातून पिकनिक लावण्या, हनिमून लावण्या फारच बोकाळल्या आहेत. तशी याची सुरुवात पार 'एक गाव बारा भानगडी' पासून झाली. ( आठवा– 'राया आता रिक्षा होऊ द्या सुरू' आणि त्या वेळचा जयश्री गडकरचा शर्टपँटमधील नाच.) फटाकडीमध्येही 'कुठं कुठं जायाचं हनिमूनला, सांगा' अशी एक लावणी आहे. (जिद्द' मध्ये सुद्धा 'सख्या, चला पिकनिकला जाऊ' अशा अर्थाची एक लावणी अन् मग त्यात हॉटेल, कटलेट इत्यादी बरेच आधुनिक संदर्भ भरलेले आहेत. )

बाळ पळसुल्यानी चित्रपटातील आशा भोसल्यानी गायलेल्या 'कडकलक्ष्मीला घेऊन आले' आणि 'कुठं कुठं जायाचं हनिमूनला' या गीताना चालीही चांगल्या ठसकेबाज दिल्या आहेत.

चित्रपटाची ऑरवो कलरची रंगपंचमी हा एक अत्यंत विनोदी प्रकार होता. निळे आकाश क्षणार्धात करडे पडणे वा एकदम कृष्णधवलतेला स्पर्श करून येणे असे नानाविध चित्तचक्षुचमत्कार चित्रपटात घडतात. (असाच आणखी एक चमत्कार म्हणजे रेखाच्या नाचाच्या वेळी एका मंचकावरील दोन उश्यांपैकी एक अचानक थोडा वेळ अदृश्य होऊन पुन्हा अवतीर्ण होते.) चित्रपटातील गाव किंवा गाव म्हणून जे काय दाखवले आहे ते आणि फटाकडीचे पोषाख किंवा पोषाख म्हणून जे काय दाखवले आहे ते हे दोन विषय पुणे विद्यापीठाच्या पी. एच. डी. साठी घेतले गेले आहेत, असे ऐकले.

सगळा दारूगोळा ठासून भरलेल्या या फटाकडीचा बार प्रेक्षकाला उत्तम बधीर करणारा झाला आहे. □